.सं., संग्रह
विषय :.... निबंध
र. 702

निबंध — ८०२

नि- ८०२

# मार्क्सवाद व हिंदुस्थान.

अनुवादक—व. भ. कर्णिक.

५५६९

मार्क्सवादाबद्दलची आवड आजकाल आपल्या इकडील मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणांमध्यें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाढलेली दृष्टीस पडते. मार्क्सवादातील लेखांना व पुस्तकांना चांगली मागणी असून दिवसेंदिवस ती जास्त इत जाईल, असें म्हणण्यास हरकत नाहीं. एवढेंच नव्हे, तर देशांतील अनेक ऱ्या शहरांतून मार्क्सवादाचा अंगीकार केलेले बरेचसे बुद्धिमान् तरुण व त्यांचे असून ते देशामध्यें मार्क्सवादाचा प्रसार करण्यासाठीं अत्यंत श्रमसायास ीत असलेले दृष्टीस पडतात.

एवढें असूनही अद्याप देशांत मार्क्सवादाबद्दल आपलेपणा उत्पन्न झालेला सत नाहीं. अद्याप त्याला देशीय स्वरूप आलेलें नाहीं. अद्याप तो जनतेच्या र राहोच, पण सुशिक्षित समाजाच्याही विचारसरणींत भिनलेला, एकरूप पावला नाहीं. परदेशांतील एक अजब चीज, उसनें घेतलेलें एक परकीय तत्त्वज्ञान, पाश्चात्य शिक्षणानें हुरळलेल्या तरुणांचें एक नवीन खूळ, याच दृष्टीनें आज देखील जनता मार्क्सवादाकडे पाहते.

युरोपमध्यें तसें नाहीं. युरोपमधील बुद्धिजीवि वर्गाच्या विचारसरणींत मार्क्स- इतका भिनलेला आहे कीं, मार्क्सवादाच्या शत्रूंना देखील मार्क्सवादाच्या वंसासाठीं मार्क्सप्रणीत बौद्धिक हत्यारांचाच उपयोग करावा लागतो. भांडलदारी अर्थशास्त्राचें अलीकडील स्वरूप पाहिलें तरी त्यावर देखील पदोपदी ार्क्सवादाची छाया पडल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. मार्क्सच्या अनेक अर्थशास्त्रीय सेद्धांतांना, कुरकुरत कां होईना पण, भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञांना मान्यता द्यावी ागलेली आहे. युरोपमधील एकंदर जनतेच्या बौद्धिक जीवनांत मार्क्सवाद इतका ंतर्भूत झालेला आहे कीं तिच्या बौद्धिक जीवनाचें तें एक प्रधान अंग बनलें असून त्या जीवनाची अलिकडील सारी वाढ प्रामुख्येंकरून मार्क्सवादाच्याच ायावर होत आहे.

## जुन्या जीवनाच्या चिकित्सेंतून जन्मलेलें तत्त्वज्ञान.

युरोपमध्यें मार्क्सवादाचा इतका प्रसार झाला व त्याला जीं इतर अनेक मधुर फळें आलीं, त्याचें मुख्य कारण हेंच होय कीं, तिथें तो एकाद्या नवीन द्रष्ट्याचा दिव्य संदेश म्हणून जन्माला आला नाहीं, तर जुन्या विचारसरणीच्या, तत्त्वज्ञानाच्या, बौद्धिक जीवनाच्या टीकेंत ( criticism ) त्याचा जन्म होऊन, जुन्याच्या संघर्षांतून जुन्याहून वरचें असें नवीन तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, विचारसरणी, जगाकडे पहाण्याची दृष्टि म्हणून त्याची वाढ झाली. हेगेलचें तत्त्वज्ञान व अभिजात भांडवली ( classical ) अर्थशास्त्र यांच्या टीकेच्या रूपानें मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची व अर्थशास्त्राची वाढ झाली आहे. पुनरुज्जीवनाच्या काळापासून युरोपमध्यें जें बौद्धिक जीवन घडत आलेलें होतें त्याच्या पायावरच मार्क्सवादाची उभारणी झालेली आहे. त्या बौद्धिक जीवनाची पुढची पायरी—उत्क्रांत अवस्था म्हणून मार्क्सवाद उदय पावला व त्यामुळें मार्क्सवादाला त्या जीवनांत अंतर्भूत असलेल्या अशा सर्व राजकीय, सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक, इत्यादि सर्व कल्पनांची व विचारसरणींची, विचिकित्सा करावी लागली. या विचिकित्सेमुळेंच मार्क्सवादाचा त्या जीवनाशीं अभेद्य असा संबंध जडला व मार्क्सवाद त्या जीवनाला नवीन वळण व नवीन स्वरूप देऊं शकला. एखाद्या जीवननिरपेक्ष तत्त्ववेत्त्याचे स्वयंस्फूर्तीचे विचार, एवढेंच जर मार्क्सवादाचें स्वरूप असते तर सबंध युरोपखंडाच्या, एवढेंच नव्हे, तर सुसंस्कृत जगाच्या विचारसरणीवर व बौद्धिक जीवनावर जे मार्क्सवादाचे अक्षय परिणाम घडून आलेले दिसतात ते कधींही झाले नसते. मार्क्सवादाचें तें स्वरूप नव्हे. मार्क्सवाद ही एक जीवनाकडे पहाण्याची नवीन दृष्टि आहे; जीवनाचें सम्यक् ज्ञान करून देणारेंच नव्हे, तर त्याचें परिवर्तन करण्याचा मार्ग दाखविणारें एक नवीन तत्त्वज्ञान आहे; ठोकळेबाज सिद्धांताचे कडबुळें नसून विचार करण्याची एक नवीन पद्धत आहे. पण ही नवीन दृष्टि, तत्त्वज्ञान अगर विचार करण्याची पद्धत एकदम आपसुक जन्मास आलेली नसून, जुन्या दृष्टींतून, तत्त्वज्ञानांतून व पद्धतींतून वाढलेली आहे. त्या मान्या जुन्या गोष्टींची तर्ककर्कश छाननी करून मार्क्सनें त्यांचें वैय्यर्थ्य सिद्ध केलें, त्याच वेळीं त्याला आपल्या नवीन तत्त्वज्ञानाचा पाया घालतां आला. व मार्क्सवादाच्या या वैशिष्ट्यामुळें त्याचा सबंध युरोपभर झपाट्यानें प्रसार झाला.

आणि युरोपच्या वैचारिक जीवनामध्यें त्याला एवढें महत्त्वाचें स्थान मिळालें.

## येथील मार्क्सवादाचें उपरें स्वरूप.

हिंदुस्थानांत मार्क्सवाद हा परदेशांतून आयात केलेली एक चीज या स्वरूपांत आणला जात आहे. मार्क्सवादाचें हें स्वरूप जोंवर राहील तोंवर त्याचा परकेपणा, उपरेपणा कधींही जाणार नाहीं व हिंदी जनतेच्या बौद्धिक जीवनावर तो परिणाम करूं शकणार नाहीं. आज हिंदुस्थानांत मार्क्सवादाच्या बाबतींत साधारणपणें एवढेंच घडलेलें दिसतें कीं जुन्या हिंदु तत्त्वज्ञानावरील विश्वास उडालेल्या कांहीं तरुणांनीं नव्या मार्क्सवादाचा अंगीकार केलेला आहे. या मंडळींनें एक गुरु सोडून दुसरा गुरु पत्करला एवढेंच. बाकी तीच आंधळी गुरुभक्ति, तीच अविचारी श्रद्धा, तोच मानसिक कोतेपणा या नवीन गुरूच्या बाबतींत पतकरलेला दृष्टीस पडतो. अशा मंडळींच्या हातांत मार्क्सवाद हें एक ठोकळेबाज तत्त्वज्ञान बनतें, त्यांतील जिवंतपणा व लवचिकपणा नष्ट होतो, परिस्थितिसापेक्ष असें धोरण ठरविण्याची शक्ति त्यांच्यात उरत नाहीं. क्रांतिकारक असें सामाजिक तत्त्वज्ञान पतकरलें, पण त्या तत्त्वज्ञानाला जीवभूत अशी चिकित्सक बुद्धि जर अंगीकारली नाहीं तर तें तत्त्वज्ञान क्रांतीऐवजीं प्रतिक्रांतीलाच उपकारक ठरेल.

जिवंत कार्यक्षम तत्त्वज्ञान व कार्यपद्धति म्हणून मार्क्सवाद हिंदुस्थानांत यावयाचा झाला तर तो जुन्या हिंदु तत्त्वज्ञानावरील व विचारसरणीवरील टीकेच्या रूपानेंच हिंदुस्थानांत आला पाहिजे. मार्क्सवादामध्यें ठराविक सिद्धांतापेक्षां त्यानें दाखविलेल्या विचारपद्धतीचें महत्त्व अधिक आहे. या मार्क्सप्रणीत विचारसरणीप्रमाणें हिंदुस्थानच्या आजतागायतच्या इतिहासाचें, वाङ्मयाचें, तत्त्वज्ञानाचें, विचार संपत्तीचे परीक्षण करणें व अशा परीक्षणानंतर नवीन युगाला अनुकूल असा इतिहास, तत्त्वज्ञान व विचारसंपदा निर्माण करणें, हें प्रत्येक हिंदी मार्क्सवाद्याचें आद्य कर्तव्य होय. आमचे मार्क्सवादी हें कर्तव्य बजावतील त्याचवेळीं मार्क्सवादाचें परकेपणाचें, उपरेपणाचें स्वरूप नष्ट होऊन मार्क्सवाद हा युरोपप्रमाणेंच हिंदी जनतेच्याही बौद्धिक जीवनाचें प्रधान अंग होऊं शकेल.

## सदैव विकास पावणारें तत्त्वज्ञान.

हिंदुस्थानला जर कशाची गरज असेल तर ती मार्क्सच्या ठोकळेबाज सिद्धां-

तांची नव्हे किंवा मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची पोपटपंची करणाऱ्या पढतपंडितांचीही नव्हे. मार्क्सवादाच्या पद्धतीनें हिंदी तत्त्वज्ञानाची, वाङ्मयाची, इतिहासाची व विचारसंपदेची चिकित्सा होणें अत्यंत जरूरीचें आहे; व अशी चिकित्सा करणाऱ्या मार्क्सवाद्यांची आज हिंदुस्थानला गरज आहे. युरोपमधील एका महानुभव तत्त्वज्ञान्याचें विचार म्हणून मार्क्सवादाचा हिंदुस्थानमध्यें सार्वत्रिक प्रसार होणेंही अशक्य व हिंदी वैचारिक जीवनावर त्याचा इष्ट तो परिणाम होणें तर त्याहूनही अशक्य. हिंदुस्थानांतील परंपरागत जीवनावर, रूढींवर, कल्पनांवर व तत्त्वज्ञानांवर मार्क्सवादाचा झगझगीत प्रकाश पाडून त्यांच्या पकडींतून हिंदी मनाची सोडणूक करण्याचा प्रयत्न मार्क्सवाद्यांनीं केला पाहिजे. पण या कामाला मार्क्सच्या केवळ सिद्धांतांचें ज्ञान पुरेसें पडणार नाहीं. त्यासाठीं मार्क्सवादाचा पायाच अशी जी शास्त्रीय चिकित्साबुद्धि तिची अत्यंत गरज आहे. अर्थशास्त्रांतील अगर तत्त्वज्ञानांतील चारदोन सिद्धांत, एवढेंच मार्क्सवादाचें स्वरूप नसून वस्तुगत जगाच्या सम्यक् आकलनाची, निरीक्षणाची, पृथक्करणाची व परिवर्तनाची शास्त्रीय पद्धति हेंच त्याचें खरें मर्म होय, ही गोष्ट आमच्या मार्क्सवाद्यांनीं ओळखलीं पाहिजे. म्हणून युरोपमध्यें लागू पडलेले सिद्धांत जसेच्या तसे हिंदुस्थानमध्यें आणून चालणार नाहीं. हिंदुस्थानच्या परिस्थितीचें, बाह्य जगाच्या संघर्षामुळें उत्पन्न झालेल्या खळबळीचें, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अंमलाखालीं तयार झालेल्या नव्या धेडगुजरी सामाजिक परिस्थितीचें, यंत्रयुगाच्या धक्क्यामुळें कोलमडून पडणाऱ्या जुन्या हिंदी परिस्थितीला जुळेल असें धोरण ठरविणें, हेंच हिंदी मार्क्सवाद्यांचें खरें कर्तव्य होय. या पद्धतीनें मार्क्सवाद डळमळणार नाहीं; उलट तो अधिक सजीव व संपन्न होईल. कारण मार्क्सवाद हा एकदांच एखाद्या द्रष्ट्यानें त्रिकालाबाधित असा सांगितलेला वेदप्रणीत दिव्य संदेश नाहीं; तें सदैव विकास पावणारें तत्त्वज्ञान आहे. दर दिवशीं त्यांत नवीन नवीन भर पडत आहे व दिवसानुदिवस अधिकाधिक सुसंपन्न बनत आहे.

## नुसती पोपटपंची नको.

मार्क्सवाद हें एका नव्या युगाचें तत्त्वज्ञान आहे. यंत्रशक्तीमुळें उत्पन्न झालेल्या औद्योगिक युगानें एक विशिष्ट पायरी ओलांडतांच युरोपमध्यें हें तत्त्वज्ञान उदयाला आलें. यंत्रशक्तीवर चालणारे उद्योगधंदे ज्याअर्थी हिंदुस्थानांत सुरू

झाले आहेत त्याअर्थी त्यांतूनच उत्पन्न होणारें मार्क्सचें तत्त्वज्ञानही कुणी कितीही डोळेझांक केली अगर दडपशाही केली तरी, हिंदुस्थानांत प्रसृत होणारच. पण मार्क्सच्या पूर्वींही त्याच्या अगोदर होऊन गेलेल्या तत्त्वज्ञान्यांनीं सरंजामदारी आधिभौतिक विचारसरणींच्या विध्वंसनाचें जें कार्य युरोपमध्यें केलेलें होतें तें हिंदुस्थानांत अद्यापही व्हावयाचें आहे. १४ व्या शतकाच्या सुमारास युरोपमध्यें जी पुनरुज्जीवनाची लाट उसळली, तिचा पडसादही अद्याप हिंदी वैचारिक जीवनांत ऐकूं येत नाहीं. सरंजामदारी अगर त्याही पूर्वींची कृषि अगर गोपाल युगाला अनुरूप अशा श्रुतिस्मृतिप्रणीत संस्कृतीच्या कोंडवाड्यांत अद्यापिही हिंदी वैचारिक जीवन घुटमळत पडलेलें आहे. या कोंडवाड्यांतून त्यांची मुक्तता करणें हें हिंदी मार्क्सवाद्यांचें पहिलें कर्तव्य होय. कारण सरंजामदारी संस्कृतीचे पाश तोडण्याखेरीज साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या बीजारोपणाला अनुकूल अशी भूमिकाही हिंदुस्थानांत तयार होणें शक्य नाहीं. हिंदी साम्यवाद्यांपुढील कार्य अत्यंत जबाबदारीचें व परिश्रमाचें आहे. म्हणूनच माझी त्यांना अशी आग्रहाची विनंति आहे कीं, मार्क्सच्या सिद्धांतांची नुसती पोपटपंची करीत बसूं नका. हिंदुस्थानांतील जुन्या तत्त्वज्ञानांचा, धर्माचा, विचारांचा खोल अभ्यास करा व त्यावर मार्क्सचा झगझगीत प्रकाश पाडून त्याचें सद्यःकालीन वैयर्थ्य हिंदी जनतेला पटवून द्या. याच पद्धतीनें हिंदी जनता मार्क्सवादाभिमुख बनेल व तिच्या विचारक्षेत्रांत मार्क्सवादाचीं पाळेंमुळें खोल जाऊन मार्क्सवाद्यांना हिंदुस्थानांत वैचारिक क्रांति घडवून आणतां येईल.

---

नि.

**प्रतिभा** ( विशेषांक ता. ३ फेब्रुवारी १९३७ मधील लेखाचें पुनर्मुद्रण. )

# हिंदुस्थानचे नवजीवन.

## हिंदुस्थानच्या उन्नतीस विचारक्रांतीची जरुरी !

### अनुवादक—पां. वा. गाडगीळ.

ता. ३१ जानेवारी रोजीं भाई रॉय यांचें 'हिंदुस्तानचें नवजीवन' या विषयावर पुणें वेताळ पेठेंतील जेधे मॅन्शनमध्यें प्रि. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान झालें.

प्रास्तविक भाषणानंतर विषयास सुरवात करतांना ते म्हणाले.

" आजचा माझ्या व्याख्यानाचा विषय 'भारतीय नवजीवन' म्हणजे हिंदी राष्ट्राचा पुनर्जन्म हा आहे. प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत अशी वेळ येत असते कीं, ज्यावेळीं जुन्या रूढसंस्था समाजहिताचें कार्य करण्यास निरुपयोगी ठरून जुन्या परंपरेंवर टीकाप्रहार होऊं लागतात, ज्यावेळीं समाजाची पुनर्घटना करण्याची गरज उत्पन्न होते, थोडक्यांत बोलायचें म्हणजे ज्यावेळीं परंपरागत भावनांचीं व घटनांचीं मूल्यें बदलावीं लागतात, त्यावेळीं तें विशिष्ट राष्ट्र पुनर्जन्माच्या अवस्थेंतून जात आहे असें म्हणावें लागतें. कोणत्याही राष्ट्रानें मानवी संस्कृतींत कोणती भर घातली हें अमुक एक प्रकारचीं सांस्कृतिक मूल्यें कोणत्या परिस्थितींत एकाद्या समाजानें स्वीकारलीं यावरून ठरवावें लागतें. आमचें हें राष्ट्र फार प्राचीन आहे, आमचा इतिहास हजारों वर्षांचा आहे, भरतखंडानें अनेक प्रकारच्या संस्कृतींना जन्म दिला आहे. त्या संस्कृतींनीं केवळ हिंदुस्थानचाच इतिहास बदलला आहे असें नव्हे तर इतर राष्ट्रांच्या सांस्कृतिक विकासावरही त्याचा फार मोठा परिणाम झालेला आहे.

### हिंदुस्थानचें अर्वाचीन काळांतील मागासलेपण

आतां प्रश्न असा आहे कीं, आमचे प्राचीन विचार आणि आमचीं परंपरागत मूल्यें यावरच आपण समाधान मानून रहावयाचें कीं काय ? म्हणजे बौद्धिक

परिणतीच्या आमच्या प्राचीन कल्पना आमची यापुढें प्रगति करण्यास, जगांतील राष्ट्रांत आपलें योग्य स्थान मिळविण्यास आणि जागतिक संस्कृति-विकासाला मदत करण्यास पुऱ्या पडतील काय असा हा प्रश्न आहे. गेल्या सुमारें वीस पंचवीस वर्षांत हिंदुस्थानांतील बुद्धिप्रधान वर्गांत राजकीय प्रश्नांनी खळबळ उडविली आहे. हिंदुस्थानांतील विचारी लोकांपुढें राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न प्रामुख्यानें उभा आहे, अलीकडे प्रचंड राजकीय चळवळीच्या कक्षेंत बहु-संख्य समाजही आलेला आहे; पण ही राजकीय चळवळ एका अधिक व्यापक अशा चळवळीचा परिणाम आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. राजकीय स्वातंत्र्य हें कांहीं अंतिम ध्येय नव्हे, हिंदी लोकांना राजकीय स्वातंत्र्य अशासाठीं हवें आहे कीं, मानवी प्रगतीच्या मार्गावर त्यांना त्यामुळें पुढें पुढें जातां येईल. परकीय सत्तेच्या अडथळ्यानें आमची प्रगति खुंटली आहे. तुम्हांला माहीतच आहे कीं, १८ व्या शतकांत युरोपियन राष्ट्रांत विचारक्रांति झाली. नवीन बौद्धिक जीव-नाला चालना मिळाली. सामाजिक मूल्यें बदललीं. युरोपांतील या कालखंडास नवजीवन चळवळीचा महत्त्वपूर्ण असा कालखंड म्हणतात. १८ व्या शतकाच्या कित्येक शतकांपूर्वी आमचा पुष्कळच बौद्धिक विकास झालेला होता; पण ज्या-वेळीं युरोपियन राष्ट्रांची सांस्कृतिक प्रगति होतां होतां नवसंस्कृति निर्माण कर-ण्याची गरज त्यांस भासूं लागली त्यावेळीं त्या प्रचंड क्रांतिकारक चळवळींत भाग घेण्यास आम्हीं असमर्थ ठरलों. याचा परिणाम असा झाला कीं, प्राचीन काळीं हिंदी संस्कृतीनें हिंदुस्थानच्या बाहेर आपला प्रकाश पाडून युरोपच्या सांस्कृतिक विकासास मदत केली असतां अर्वाचीन काळीं मात्र जेव्हां युरोप मानवविकासाच्या आघाडीवर होते, ज्यावेळीं नवीन विचार व नवीन सांस्कृतिक मूल्यें युरोपांत निर्माण होत होतीं, त्यावेळीं त्यांचा आम्हीं आमच्या वैचारिक व सांस्कृतिक विकासास फायदा करून घेऊं शकलों नाहीं.

आतां आपण स्वतःसच असा प्रश्न विचारूं या कीं, ज्यामुळें आमच्या इति-हासांत ही दुर्दैवी घटना घडली तो अडथळा कशामुळें आला ? या प्रश्नाचें उत्तर आमच्या पूर्व इतिहासांतच शोधलें पाहिजे. हल्लीं आमच्यावर गेल्या दोनशें वर्षांपासून एका युरोपियन राष्ट्राचें राज्य आहे; पण त्यापूर्वीहि आम्हीं कांहीं स्वतंत्र राष्ट्र नव्हतों; आम्ही जित होतों. परराष्ट्राची सत्ता आमच्यावर होती

आणि परकी राष्ट्रांच्या ढवळाढवळीमुळें आमच्या सामान्यतः होऊं घातलेल्या सामाजिक विकासांत अडथळे आले. याचा परिणाम असा झाला कीं, आमचे जुने विचार, आमची जुनी सांस्कृतिक मूल्यें, आमच्या सामाजिक संस्था, या जुनाट झाल्या असून यापुढें प्रगति करण्यासाठीं नवे विचार, नव्या समाजसंस्था आणि नवीन सांस्कृतिक मूल्यें आपण निर्माण केलीं पाहिजेत. ही गोष्ट ज्यांच्या लक्षांत येऊं शकेल अशीं माणसें अथवा पंथ सामाजिक जीवनाच्या पृष्ठ भागावर येऊंच शकले नाहींत.

## ब्रिटिश अमलाखालील कुचंबणा.

युरोपांतील नवजीवनाची चळवळ ही हिंदुस्थान कित्येक शतकें या दुष्ट सामाजिक जडतेंत कुचंबत पडला असतां घडून आली. अशी चळवळ हिंदुस्थानला स्वतंत्रपणें निर्माण करतां आली नाहीं. पुढें जेव्हां इतर राष्ट्रांतही चळवळ सुरू झाली, त्यावेळीं हिंदुस्थानच्या दुर्दैवानें हे बाहेरचे विचार आम्हांस इकडे आणतां आले नाहींत, यामुळें अशा विचारांच्या साह्यानें नव्या संस्था निर्मिणें व नवीन सामर्थ्य संपादन करून आधुनिक राष्ट्र बनणें हें कार्य घडून आलेंच नाहीं. अर्थात् पुढें एकदां जेव्हां आणखी एक परकीय राष्ट्र येथें येऊन आमच्यावर सत्ता स्थापण्याचा प्रयत्न करूं लागलें त्यावेळीं हिंदी लोकांना या परकीय सत्तेस पुरेसा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नव्हतें. म्हणून राजकीय गुलामगिरीच्या गर्तेत आम्ही आणखी खोल गेलों. या राजकीय गुलामगिरीनें आमची मूळचीच असलेली दुष्ट राष्ट्रीय जडता अधिकच वाढली. ब्रिटिश अंमलाखालील गेल्या १५० वर्षांत हिंदी लोकांचा युरोपियन संस्कृतीशीं वरवरचा संबंध आला. इंग्रजांनीं हिंदुस्थानांत नवी संस्कृति आणली, टेलिग्राफ, टेलिफोन, रेल्वे व आणखी किती तरी गोष्टी आणल्या, अशा इंग्रजांच्या कर्तृत्वा संबंधाच्या वढाया आपण नेहमीं ऐकतों. पण इंग्रजांशीं संबंध न येतां आमची आम्हांसही प्रगति करतां आली असती तर आधुनिक संस्कृतीचें सुयश सर्वप्रकारें आम्हांस मिळवितां आलें असतें ही गोष्ट या वढाया सांगणारें लोक विसरतात. इंग्लंडांत एक काळ असा होता कीं, तेथेंही रेल्वे नव्हती. पण तेथें नवी रेल्वे व संस्कृति उभारण्यास कोणत्याही अधिक सुसंस्कृत राष्ट्राची अगर परकीय लोकांची गरज लागली

नाहीं. त्याचप्रमाणें या कार्यासाठी हिंदुस्थानांत इंग्रजांना येण्याचीही कांहीं गरज नव्हती. इतर कित्येक राष्ट्रांप्रमाणें आम्हींही ब्रिटिश सत्तेवांचून कित्येक रेल्वे बांधल्या असत्या; पण आम्हांस तसें करूं दिलें नाहीं. परकीय राज्यकर्त्यांनीं आधुनिक संस्कृतीचीं कांहीं वरवरचीं अंगें आपल्या कार्यासाठीं येथें सुरू केलीं, तरी पण जगांत जे आधुनिक प्रगतिपर विचार निर्माण झाले त्यापासून राष्ट्र या नात्यानें आम्हांस बाजूसच ठेवण्यांत आलें. यामुळें आपण येथें जिला आधुनिक संस्कृति म्हणतों तींत युरोपच्या आधुनिक राष्ट्रांतील उच्च संस्कृतीचा अंशही येऊं शकलेला नाहीं. विशिष्ट ऐतिहासिक कारणें आणि परकी सत्तेचा काच यांनीं आधुनिक मानवी विकासास आम्ही पारखे राहिल्यानें आपल्या प्राचीन श्रेष्ठतेकडे आम्ही आशाळभूतपणानें पाहून समाधान मानून घेऊं लागलों. सद्यःस्थिति दुःखमय असून निरुत्साह करणारी असल्यानें आम्ही प्राचीन इतिहासापासून स्फूर्ति मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम असा झाला आहे, कीं, आधुनिक जगांत चालू असलेल्या सांस्कृतिक विकासाहून आपला कांहीं वेगळा विकास होणें शक्य आहे असें आम्ही मानीत नाहींच, उलट हिंदुस्थान एकाकाळीं इतका उच्च संस्कृतीस पोंचला होता, व त्याचा बौद्धिक दर्जा इतका वाढला होता असें म्हणून आम्ही आमच्या पूर्व वैभवाकडे पहात हात जोडून स्वस्थ बसलो व या गोड कल्पनेंत समाधान मानून घेऊं लागलों आहों. या मनोवृत्तीमुळेंच आधुनिक पाश्चात्य संस्कृति ही पौर्वात्य संस्कृतीची शत्रु आहे असें समजण्याची संवय आम्हांला लागली. हिंदुस्थानची म्हणून कांहीं एक विशिष्ट संस्कृति असून ती अध्यात्मिक आहे आणि पाश्चिमात्य संस्कृति ही भौतिक आहे अशा तऱ्हेचा एक प्रसिद्ध उथळ सिद्धांत पुष्कळांकडून पुनः पुनः सांगितला जातो. जातां जातां मी यासंबंधीं येवढेंच सांगतों कीं, ही दुर्बल मनोवृत्ति म्हणजें किप्लिंगसारख्या साम्राज्यवाद्याच्या मतप्रचारास आम्ही नादानपणानें शरण गेलों आहोत, याचा स्पष्ट पुरावा आहे. "पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम, हीं दोन्ही भावंडें कधींही एकत्र येणार नाहींत" असें किप्लिंगनें म्हटलें आहे. पौर्वात्य राष्ट्रें ही अध्यात्मवादी आहेत आणि पाश्चिमात्य राष्ट्रें ही भौतिकवादी आहेत ही कल्पना म्हणजे किप्लिंगच्या साम्राज्यशाही तत्त्वज्ञानाचें ध्येयात्मक रूपांतर होय; असें कां व्हावें ?

## नवजीवन चळवळीचें वैशिष्ट्य

पौर्वात्य हे अध्यात्मवादी आणि पाश्चिमात्य हे आधिभौतिक असें आम्हीं कां मानावें ? कदाचित् ऐतिहासिक व इतर कारणांनीं आधुनिक मानवी विकासाच्या प्रवाहांतून आम्ही दूर राहिल्यामुळें ज्या बौद्धिक परिणतीनें इतर राष्ट्रें पुढें जाऊन मानवी प्रगतीच्या आघाडीवर पोंचली ती बौद्धिक प्रगति मिळविणें आम्हांस शक्य झालें नसावें. राजकीय पारतंत्र्यामुळें आलेला मागासलेपणा, होत आलेली आर्थिक पिळणूक व बौद्धिक कुचंबणा याचाच एकंदरींत हा परिणाम आहे. जर या दुःख-कारक परिस्थितींतून बाहेर पडावयाचें असेल तर ज्या प्रगतिपर संस्थांनीं आप-णांस मागें टाकलें आहे त्यांना आपण जाऊन गांठलें पाहिजे, हें करण्याचें मार्ग दोन. एक अगदीं आरंभापासून सुरुवात करून तीनशें वर्षांपूर्वी युरोपांत झालेल्या नवजीवनाच्या चळवळींतील प्रत्येक अनुभव पुन्हां स्वतंत्रपणें घेत घेत सर्व मार्ग स्वतः आक्रमण करणें अथवा अधिक समजूतदारपणें म्हणजे युरोपीयांच्याच अनुभवापासून धडा शिकून व कित्येक शतकांची वाटचाल टाळून इतर राष्ट्रांच्या बरोबरीला येणें. इतरांपासून शिकण्यांत कमीपणा वाटण्यासारखें कांहीं नाहीं. इतरांनीं आम्हांपासून बोध घेतला आहे, तेव्हां आपणही इतरांपासून शिकण्या-सारखें असेल तें कां शिकूं नये ? दुसऱ्यापासून आम्हांला कांहींही शिकावयाचें नाहीं असें मानणारा जो सांस्कृतिक अभिमान आहे तो चूक आहे. त्यानें आपली कोणीकडेच प्रगति होत नाहीं. सर्व प्रकारच्या विकासास तो अडथळा करतो. आतां युरोपांतील ज्या नवजीवन चळवळीनें मध्ययुगीन विचार नष्ट केलें आणि जास्तींत जास्त जनतेला अधिकाधिक स्वातंत्र्य देणारी राजकीय दृष्टि व सामाजिक चळवळी यांना उत्तेजन देणारी आधुनिक शास्त्रशुध्द विचारसरणी उत्पन्न करून वाढविली त्या ‘ नवजीवन चळवळी’चें सार काय होतें तें पाहूं ! इतिहासाकडे विवेचक दृष्टीनें पहाणें हें तें सार होय; आपल्या परंपरागत कल्पना, संस्था व प्राचीन विचारसरणी यांची कांटेकोरपणें तपासणी करून त्यांत आमच्या प्रगतीला उपयुक्त असें कांहीं आहे कीं काय हें पहावें किंवा जर सगळेंच्या सगळें निरुपयोगी आहे असें दिसून आलें तर त्यांतील केवळ केरकचरा असेल तो फेंकून द्यावा आणि प्रगतिपथावर आपल्या बरोबर काय घेतां येईल तें निव-

डावें. हें नवजीवन चळवळीचें वैशिष्ट्य आहे. आतां हिंदुस्थानांत जर आपणांस आधुनिक राष्ट्र म्हणून प्रगतिपथावर चालावयाचें असेल, आमच्यातील अज्ञान, भोळ्या समजुती व दुराग्रह इत्यादि सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्या गोष्टी जर दूर करावयाच्या असतील तर युरोपांतल्या नवजीवन चळवळींत त्यांनीं ज्या गोष्टी केल्या त्या आपणांसही केल्या पाहिजेत. केवळ जुन्याचीच जपमाळ घेऊन आपण जगूं शकणार नाहीं. ती आपणाला तोडावी लागेल. प्राचीन काळ ठार झाला, तो आपणांस गाडून टाकावा लागेल. जुन्यांची मढीं काळाच्या उदरांतच राहूं देत. पुढें जाण्याच्या इच्छेनें जर आम्ही मागें तोंड वळवून पाहूं तर आम्ही जागचेच हालणें अशक्य आहे, मग पुढें जाण्याची गोष्टच नको. पण प्राचीन काळाकडे पाठ फिरविण्यापूर्वी आपणांला प्रगतिपथावर मदत करण्यासारखें कांहीं त्यांत आहे कीं काय हें आपण पाहिलें पाहिजे. पण ही गोष्टसुध्दां जुनें ठेवणें आहे तसें जतन करून अथवा आमचा प्राचीन इतिहास हाच श्रेष्ठ मानून होणार नाहीं. त्यासाठीं प्राचीन इतिहासाचा विवेचक दृष्टीनें अभ्यास केला पाहिजे; म्हणजेच बौध्दिक क्रांतीची चळवळ केली पाहिजे. इतिहासानेंच ही गरज तीव्र केली आहे. कारण ही चळवळ पुरेशी वाढल्यावांचून आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींतील दुर्बलता कधींच नष्ट होणार नाहीं. आज मी आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या ध्येयवादाची चिकित्सा करूं शकत नाहीं. मी सध्यां येवढेंच म्हणतों कीं, गेल्या पंधरा वीस वर्षांत स्वातंत्र्याची चळवळ अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर पसरत आहे. तिच्यांत प्रचंड सामर्थ्य असल्याचें दिसून येत आहे. अधिकाधिक जनता स्वराज्याच्या ध्येयानें प्रेरित होत आहे: त्या ध्येयासाठीं झगडण्याची तयारी जनतेनें दाखविली आहे.

## आपल्या ध्येयवादांतील प्रतिगामिपणा.

पण तरीही—आपण वस्तुस्थितीकडे दृष्टि देऊन एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, १५ वर्षें झगडल्यानंतरही आपलें ध्येय पंधरा वर्षांपूर्वी होतें त्याहून अधिक जवळ आलें नाहीं. आम्ही दडपले गेलेलो असून आमचा प्रतिपक्षी जबरदस्त आहे अशी सबब सहज सांगतां येईल. पण तें समाधानकारक उत्तर नव्हे. आम्हांला जर या प्रश्नाचें उत्तर हवें असेल आणि आमच्या अडचणी दूर कर-

ण्याचा उपाय शोधावयाचा असेल तर आमच्या परंपरेंत व इतिहासांत आपण थोडें खोल गेलें पाहिजे. आमची अंगभूत दुर्बलता नष्ट होईपर्यंत आमची प्रगति होणार नाहीं. आमच्या राष्ट्रीय चळवळीच्या ध्येयवादांतही हीच अडचण दिसून येते. आमची राष्ट्रीय चळवळ ही पुढें पाहून चालली पाहिजे. आम्हांला राजकीय स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. हिंदुस्थान स्वतंत्र व संपन्न देश होऊन सुखी माणसाचें निवासस्थान होईल अशाप्रकारें हिंदी समाजाची पुनर्घटना करण्यासाठीं राजकीय पारतंत्र्याच्या शृंखला आम्हांला तोडून टाकावयाच्या आहेत. परकीय सत्तेनें निर्माण केलेल्या परिस्थितींत होणारी कुचंबणा थांबविण्यासाठीं आपणांस राजकीय स्वातंत्र्य हवें आहे. भाविकाळांत प्रगतीच्या आघाडीवर जाण्यासाठीं आम्हांस स्वतंत्र व्हावयाचें आहे. पण आपल्या राष्ट्रीय ध्येयवादावर आपण एकवार दृष्टि फेंकल्यास आपल्या राष्ट्रीय नवजीवन चळवळीच्या विरुध्द त्या ध्येयवादाची गति आहे हें आपणास दिसून येईल. हा ध्येयवाद आपल्या प्राचीन इतिहासाचा वडेजाव करतो. जुन्या परंपरा आणि जुन्या कल्पना ह्यांचा पुनरुच्चार आपणांस करावयाचा आहे. जुनीं ध्येयें पुन्हां लोकांपुढें आपणांस ठेवावयाचीं आहेत आणि केवळ आमच्याच राष्ट्रासाठीं आम्ही हें करूं पहात नसून जगांतील इतर राष्ट्रासही हाच संदेश आम्ही पोहोंचवूं इच्छितों. ज्यांना स्वतःचें रक्षण करतां येत नाहीं, त्यांनीं जगाचें काय रक्षण करावें, हें सुध्दां आमच्या ध्यानांत येत नाहीं. आधीं स्वतःचें रक्षण कसें करावें हें शिकूं या म्हणजेच आम्हांस दुसऱ्यचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतां येईल.

## पिछेहाटीचें धोरण सोडा.

महात्मा गांधींची आवडतीं तत्त्वें कांहींही असोत पण त्यांना क्रांतीचीं बीजें येथें रुजवितां आलीं हें खास. त्यांच्या तत्त्वज्ञानाचें मला महत्त्व वाटत नाहीं. पण मी एक गोष्ट सांगूं शकतों कीं, त्यांनीं जनतेत जागृति केली असून लोकांची प्रतिकारभावना वाढविली आहे. त्यांची अल्प संतुष्ट राहण्याची मनोवृत्ति नष्ट केली आहे. जडत्व मोडून खळबळ माजविली आहे. दैववादास डळमळावयास लावलें आहे. अंशतः कां असेना, पण बंड करण्याच्या प्रवृत्तीला त्यांनीं उत्तेजन दिलें असून हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीची प्रगति केली आहे. या सर्व गोष्टींनीं

बौद्धिक चळवळीस जोम मिळणार आहे. आमच्या राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीचें विशेष ध्यानांत घेण्यासारखें वैशिष्ट्य असें आहे कीं, आमची राजकीय स्वातंत्र्याची आधिभौतिक आकांक्षा ही त्या स्वातंत्र्याच्या चळवळीच्या भरभराटीस व यशस्वी विकासास अडथळा आणणाऱ्या ध्येयवादाशीं जखडली गेली आहे. जोपर्यंत मोटारीला उलट गति देण्याच्या खटपटींत आम्हीं आहोंत तोंपर्यंत पुढें जाण्याची अपेक्षा करणें व्यर्थ होय. जोंपर्यंत मागें घसरून जाण्याची प्रवृत्ति आपल्या ठिकाणीं आहे हें आपणांस माहीत आहे तोंपर्यंत आपणाला मोक्ष नाहीं. भूतकालाचा विध्वंस करून त्यावरच भविष्यकाल उभारला पाहिजे हें समजेल तेव्हांच मोक्ष आपल्या हातीं येईल. प्रगतीसाठीं हवी असणारी स्फूर्ति भूतकालांत मिळणार नाहीं.

लोक आपल्या भावि प्रगतीसाठीं भूतकाळांत स्फूर्तीचा शोध करीत, अशीं उदाहरणें मानवी इतिहासांत आणि युरोपियन नवजीवन चळवळींत सुद्धां घडून आलीं आहेत. पण ही आत्मवंचना होय. वर्तमान परिस्थितीचा नाश करण्यासाठीं तिचें केंद्र बदलण्यासाठीं अथवा तिच्यांत बिघाड उत्पन्न करण्यासाठीं भूतकाळापासून स्फूर्ति शोधण्याची कल्पना ही वर्तमानकाळाविरुद्ध बंड करण्याच्या इच्छेंत दिसून येते. पण आपणांस जर उज्ज्वल भवितव्य प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर त्यासाठीं वर्तमान व भूत या दोन्हीं काळांचा उच्छेद केला पाहिजे.

सामाजिक क्रांति ही वर्तुलाकार फिरत नाहीं ती पुढें पुढें जात असते. आम्हीं आमची वर्तमान विचारसरणी आणि हल्लींची श्रद्धा बदलली कीं, आमचा भवितव्याकडे जाण्याचा मार्ग आम्हीं निश्चित केला असें होईल. आमच्या भवितव्याकडे जात असतां आपणांस पुढें पुढेंच चाल करीत राहिलें पाहिजे. म्हणून जुन्यांतून मिळणारी स्फूर्ति व जुन्या कल्पना यांनीं वर्तमानकाळाविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति निर्माण होते; तरी पण याला पुनरुद्धार असें म्हणतां येणार नाहीं. तो एक नवजीवनाचाच प्रच्छन्न विचार म्हणतां येईल. आमचा सनातन ध्येयवाद हा जरी पुनरुद्धाराच्या स्वरूपाचा असला तरी तो नवजीवन चळवळीच्या सदराखालींच येतो. एक गोष्ट आम्हीं कायमची लक्षांत घेतली पाहिजे. आमचा प्राचीन काळ कितीही थोर असो, प्राचीन हिंदी लोक कितीही सुखी असोत

आपण त्याकडे आतां परत जाऊं शकत नाही. पुन्हां जुनें जीवित जगूं शकत नाहीं. असें आहे तर आपण भवितव्याकडेच तोंड करून उभें राहिलें पाहिजे आणि ऐतिहासिक अनुभवानें भूतकाळांत जर आम्हांस प्रगतीला उपयोगी असे उपयुक्त विचार सांपडतील तर प्रगतीसाठीं त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. पण भूतकाळांतील अनुभवानें आपण शिकलों आहों कीं, आपल्या प्राचीन इतिहासाचा चिकित्सक दृष्टीनें विचार करूनच भविष्य काळीं काय शक्य आहे तें पाहिलें पाहिजे. आज जीं माणसें राष्ट्रांच्या राजकीय चळवळींत प्रत्यक्षपणें गुंतलीं आहेत तीं विचारक्रांतीच्या झगड्यांत फारसा भाग घेतील अशी अपेक्षा आपण करूं नये. ती फक्त विचारांचें आचारांत रूपांतर करण्यास तत्पर राहतील. पण अशीं कांहीं माणसें आहेत कीं ती विचारी व व्यासंगी असून राजकीय चळवळींत प्रत्यक्षपणें भाग घेत नाहींत. त्यांनीं ही विचारक्रांति केली पाहिजे. ही विचारक्रांति झाल्यावांचून राजकीय चळवळ यशस्वी होणार नाहीं. आपल्या देशांत पुष्कळ बुद्धिवादी माणसें अशीं आहेत कीं, त्यांना आपल्या राजकीय गुलामगिरीची शरम वाटते. आपल्या आर्थिक व बौद्धिक मागासलेपणाबद्दल खेद वाटतो. थोडक्यांत म्हणजे आम्हा राजकारणांत पडलेल्या इतकेच तेही कळकळीचे देशभक्त आहेत. त्यांना प्रत्यक्ष स्वरूपाच्या राजकीय चळवळीस येऊन मिळण्यांत अडचणी आहेत. आमच्या राष्ट्रीय चळवळीच्या ध्येयवादांत कांहीं प्रतिगामी गोष्टीं घुसडण्यात आल्या आहेत हें त्यांना पसंत नाहीं. बुद्धिप्रधान व प्रगमनशील अशीं तीं माणसें असल्यानें या ध्येयवादांतल्या ज्या कांहीं गोष्टी आपणांस रानटी अवस्थेप्रत नेणाऱ्या आहेत त्या त्यांना आक्षेपार्ह वाटतात. पण अशा कांहीं विशिष्ट दोषामुळें आम्हीं या चळवळीपासून बाजूस आहों अशी सबब ते सांगतील तर ती त्यांची चूक होय. त्यांनीं पुढें आलें पाहिजे आणि हे दोष दाखविले पाहिजेत. पुढें येऊन राष्ट्रीय चळवळीस मदत करणें आणि बौद्धिक क्रांतीच्या चळवळींची प्रगति करणें हें त्यांचेंच काम आहे. कारण राजकीय चळवळींत त्यांचें पाय अडकलेले नाहींत.

## ईश्वराविरुद्ध बंड करा.

पण आमच्या नजीकच्या प्रश्नापासून किती तरी दूर असणाऱ्या प्रश्नांची

वाटाघाट हवीच कशाला, असा प्रश्न येथें उत्पन्न होईल. आपण आधीं राजकीय प्रश्न सोडवूं या. तो सुटला, येथें स्वातंत्र्य प्रस्थापित झालें म्हणजे आपण इतर प्रश्नांकडे वळूं. असेंहि कोणी म्हणेल. एक गोष्ट नक्की खरी आहे कीं, कांहीं एका मर्यादेपर्यंत भौतिक परिस्थिति सुधारल्यावांचून आणि आर्थिक उन्नति झाल्या-वांचून सामाजिक पुनर्घटना व हिंदी जनतेचा बौद्धिक विकास होणेंच शक्य नाहीं. आणि या गोष्टी आमच्या देशावर आमचीच सत्ता प्रस्थापित होऊन आमच्या प्रगतीस अवश्य अशी पुनर्घटना आम्ही येथें केल्यावांचून साध्य होणार नाहींत.

पण याही प्रश्नास दुसरी बाजू आहे. आमची इच्छाशक्ति व क्रियाशक्ति यां-मध्यें तर उभारणाऱ्या प्रतिगामी विचारसरणीची मगरमिठी सोडीत नाहीं तोंपर्यंत आपला नजीकचा राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यास आपण समर्थ होणार नाहीं. वेगळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे विचारक्रांति झाल्यावांचून राजकीय क्रांति होणार नाहीं. सर्व देशांत राजकीय व सामाजिक क्रांति होण्याचे आधीं वैचारिक क्रांति झाली आहे. हिंदुस्थानांतही तसेंच झालें पाहिजे. आम्हांला विचारांची जरूरी आहे, आम्हांला ध्येयेंही हवीतच पण ध्येयसिद्धीचा प्रयत्न करूं लागण्या-पूर्वी आपणाजवळ विचार पाहिजेत. विशिष्ट हिंदी लोकस्वभाव म्हणून जो म्हण-तात त्याचें वैशिष्ट्य तें कोणतें? आम्हांला असें शिकविण्यांत आलें आहे कीं, हिंदी लोक स्वभावतः वस्तुमात्राकडे आध्यात्मिक दृष्टीनें पाहणारे आहेत व युरोपियनांची दृष्टि आधिभौतिक आहे.

हें सर्व मोठें भव्य वाटतें. आमची विचारसरणी कांहीं मर्यादेपर्यंत धार्मिक आहे हें मला मान्य आहे. पण त्याचें कारण आमचे विचार शतकानुशतकें धार्मिक व सृष्टिमूलविषयक गोष्टींत गुंतलें होतें. खरोखर या धार्मिक वृत्तीचें सार काय आहे? सर्व भौतिक गोष्टींवर सत्ता चालविणारी व त्यांचें नियंत्रण करणारी कोणीतरी आतिसृष्टि शक्ति आहे असें मानणें हेंच तें सार होय. एकंदर जन-तेच्या दृष्टीनें म्हणावयाचें तर "दैववादी" या एका शब्दांत हिंदी लोकांच्या स्वभावविशेषाचें वर्णन करतां येईल. "ईश्वर" नांवाच्या आतिसृष्टि शक्तीनें सर्व भवितव्य ठरविलेलें असतें व तसेंच तें ठरतें अशी त्यांची श्रद्धा आहे. असेल ती वस्तुस्थिति बदलणें म्हणजे सृष्टिनियमाविरुद्ध व ईश्वराच्या विरुद्ध बंड करणें

आहे असें त्यांना वाटतें. धार्मिक भावनेचा हा अर्थ लक्षांत घेतला म्हणजे ती क्रांतिकारक भावनेच्या विकासाला अडथळा उत्पन्न करणारी आहे हें दिसून येईल. आपला राजकीय दृष्टिकोन बदलण्याचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून आत्मतुष्ट अशा परमेश्वराच्या सत्तेनें सर्व कांहीं घडून येत आहे ही कल्पना सोडली पाहिजे असें मी म्हणतों.

## भूतकाल हा भविष्याच्या मार्गांतील अडथळा.

आमचा ध्येयवाद व आमचा स्वदेशाभिमान हे आतिशय तीव्र धार्मिक स्वरूपाचे आहेत. पण आमच्या चळवळीचें सार क्रांति हें असून परकीय राष्ट्राच्या अंकितत्त्वापासून सुटका करून घेणें हें त्याचें ध्येय आहे म्हणून आम्हांला आजपर्यंत जी श्रद्धा पटविण्यांत आली त्या श्रद्धेंत क्रांति करणें, आमच्या अंगीं जडलेल्या संवयी पालटून टाकणें, जीवित व राहणी या संबंधींच्या सर्व कल्पना बदलणें, सारांश सर्व जुनी अध्यात्मनिष्ठा पालटून टाकणे हाच या चळवळीचा अर्थ आहे. जुन्या आध्यात्मिक निष्ठेचे आम्ही गुलाम व्हावयाचे कीं स्वतंत्र माणसाप्रमाणें आमच्या भवितव्याचे आम्ही विश्वकर्मे व्हावयाचे, हें आम्हांस ठरवावयाचें आहे. आमच्यावर सत्ता गाजवून हुकमत चालविण्याचा ब्रिटिश सरकारचा हक्क आम्ही मानीत नाहीं. त्याचप्रमाणें आमच्या जीवितावर सत्ता चालवून आमचें भवितव्य ठरविण्याचा ईश्वराचा हक्कही आम्ही मान्य करूं शकत नाहीं, आम्ही असें बंड उभारावें हें पाहून तुम्हा कोणास धक्का बसेल; पण आमच्या या चळवळींत अशा सरकारचें बंड अंतर्भूत आहे. हिंदी राष्ट्रीय पक्ष स्वातंत्र्यासाठीं झगडतो याचें कारण त्याला राजकीय स्वातंत्र्य हवें आहे. राजकीय स्वातंत्र्य अतिशय जलदीनें मिळविणें हें आमच्या चळवळीचें क्रांतिकारक वैशिष्ट्य आहे हे विसरतां कामा नये. हें राष्ट्रीय स्वातंत्र्याचें ध्येय लौकर सिद्ध होण्याइतके राजकीय झगड्यास यश येण्यासाठीं नवजीवनाची चळवळ म्हणजे सर्व भूतकाळ व परंपरा याकडे विवेचकतेनें पाहण्याची चळवळ अत्यावश्यक आहे. जीवितांतील प्रत्येक गोष्टीबद्दल आपला असलेला संकुचित दृष्टिकोन नाहींसा करून विवेचकतेनें प्रत्येक गोष्टींकडे पाहण्यास शिकणें हें जरूर आहे. ज्या वेळीं कोणीतरी आपणांकडे येऊन आपणांस सांगतों कीं, स्वातंत्र्यार्थ लढा, आपणाला जीवितांत

क्रांति करावयाची आहे त्या वेळीं आपणांस स्वातंत्र्यासाठीं कां लढावें लागतें, या लढ्याच्या चळवळींत आपणांस कां सामील व्हावें लागतें हे प्रश्न आपण विचारणें स्वाभाविक आहे. मला राष्ट्राची काय पर्वा? इतर लढवय्यांना मीं कां मिळावें? असे मी विचारीन. तुम्हांला शक्य झाल्यास माझ्याच सुखासाठीं मला तें करणें जरूर आहे, हें तुम्ही मला पटवूं शकाल. जर तुम्ही, माझ्या ठिकाणची बौद्धिक विकासाची उत्कंठा, मानव प्रगतीच्या परमोच्च पदवीवर चढण्याची माझी धडपड ही पारतंत्र्यामुळें अडविली जात आहे व मी स्वातंत्र्याच्या चळवळींत सामील झालो तर माझ्या प्रगतीच्या मार्गांतील अडथळे दूर होतील असें मला पटवूं शकाल तर राष्ट्रीय झगड्यांत सामील झालेंच पाहिजे असें मला वाटेल.

## हा स्वातंत्र्य मार्गच होय.

हे अडथळे दूर केले तरच आपणांला समाजाची पुनर्घटना करतां येईल. अशा तऱ्हेची पुनर्घटना ही बौद्धिक व भौतिक उत्कर्षाला अवश्य आहे. प्राचीन-काळीं आम्ही उच्च प्रकारच्या आध्यात्मिक पदवीस पोंचलों होतों. तेथून मध्य-युगांत गेलों व तेथून अज्ञानयुगांत गेलों. अज्ञानयुग युरोपांत थोडीं शतकें टिकलें आणि येथें दोन हजार वर्षे राहिलें आहे. ही मध्ययुगाची निशा, ही निष्क्रियतेची शतकें फार दीर्घ झालीं. अनेक शतकांची ही झांपड काढून टाकून मध्ययुगीन कल्पना झुगारून देऊन पुनर्जन्माच्या उषःकालाकडे तोंड वळविण्याची वेळ आली आहे. हा दृष्टिकोन लक्षांत घेतला असतां आम्हांस असें दिसून येईल कीं, आम्हीं कांहीं कोठल्या नव्या वाटेला लागलों नाहीं. लक्षावधि जनता ज्या स्वातंत्र्यमार्गावर प्रवास करीत आहे तोच हा मार्ग होय. स्वातंत्र्याच्या कार्यास पोषक अशी ही चळवळ असून अतिशय योग्य व चांगली आहे. कल्पना विशद करून घेणें हें आपल्या कृतीच्या निश्चयासाठीं आणि स्वातंत्र्य चळवळीच्या यशासाठीं आवश्यक आहे. ध्येयें ही उदात्त असतात पण विचारही तितकेच श्रेष्ठ आहेत. आमच्या पुढें उच्च ध्येयें असतील पण तीं कशीं प्राप्त करून घ्यावींत यासंबंधींचें विचार आपल्या जवळ नसल्यास त्या ध्येयांचा कांहींहीं उपयोग नाहीं. म्हणून नुसत्या उच्च ध्येयांनीं मोहून जाणें आपण बंद केलें पाहिजे. विवेचक दृष्टीनें विचार करण्यास शिकुन तसा विचार आपण केला पाहिजे. स्पष्ट विचार

आम्हांजवळ असतील तरच आपल्या ध्येयाप्रत जाण्याचा मार्ग आपल्याला स्पष्ट दिसेल. हे दोन मार्गांनीं साधेल; एक जे लोक आम्हांपुढें गेले आहेत त्यांच्यापासून शिकून. युरोपियन राष्ट्रें मानवी प्रगतीच्या आघाडीवर आज गेलेलीं दिसताव, याचें कारण त्यांच्या इतिहासांत असा एक काळ येऊन गेला कीं, परंपरेचें बंधन तोडण्याचें धैर्य त्यांनीं दाखविलें आणि नवविकासाचा मार्ग तयार केला. गेलीं दोनशें वर्षें जरी आम्हीं राजकीय गुलामगिरींत असलों तरी युरोपियन राष्ट्रांच्या रांगेंत आपण उभें राहूं शकलों नाहीं, आम्ही आमची संघटना होण्यास परंपरेचें बंधन तोडण्याचें धैर्य व बौद्धिक कुवत दाखविणें अत्यावश्यक आहे. आजवर आम्हीं तें दाखविलें नाहीं. आतां त्यावांचून राजकीय स्वातंत्र्य मिळणार नाहीं व उरलेलें आयुष्य गुलामगिरींत खितपत पडून काढावे लागेल. २०० अथवा ३०० वर्षें उशीरा कां होईना कधींच न करण्यापेक्षां इतक्या उशीरां तरी जगांतील नवें सामर्थ्यप्रवाह उपयोजून कांहींतरी उद्योग सुरू करूं या.

## युरोपीय नवजीवन चळवळीपासून स्फूर्ति.

दुसरा मार्ग म्हणजे हजारों वर्षांच्या शद्ब प्रामाण्याच्या बंधनांतून बाहेर पडूं या. आपल्या इतिहासावर, सामाजिक परंपरेवर, प्राचीन विचारसरणीवर, तत्त्वज्ञानावर, धार्मिक सिद्धांतावर आणि जीवितासंबंधीच्या आजच्या समजुतीवर आपण प्रखर टीकास्त्र चालविलें पाहिजे. कारण या टीकेनें हजारों वर्षांची भोळी श्रद्धा आणि अज्ञान नाहींसें होऊन स्वातंत्र्याचा नवप्रकाश आपणास दिसूं लागेल या नव्या ज्ञानानें आज जुन्या कल्पना आपल्या कार्यास निरुपयोगी आहेत हें आपणांस दिसून येईल. त्या जुन्या कल्पनांचा आपणांस कांहींही उपयोग नाहीं. त्यापासून स्फूर्ति अथवा कृतीस प्रेरणा मिळणार नाहीं. पण भूतकालावर अशी टीका करतां येण्यासाठीं पाश्चात्य नवजीवनाच्या चळवळीपासून आपणांस स्फूर्ति मिळविली पाहिजे. युरोपनंतर तीनशें अथवा चारशें वर्षांनीं येथें नवजीवनाची चळवळ सुरू होत आहे. युरोपमधील नवजीवनाच्या चळवळीच्या वेळीं नवसंस्कृतीचे जे परिणाम झाले त्यांपासून आपणांला स्फूर्ति मिळविणे उपयुक्त होईल. हळू हळू सरंजामी परंपरा आणि सकुंचित देशाभिमान ही आम्ही उल्लंघून जात आहों. आज समाजवादी विचारसरणी कार्ल मार्क्सचे सिद्धांत हे अधिकाधिक

बुद्धिजीवी वर्गाला पटूं लागले आहेत. आमच्या पुढें जे गेले त्यांच्यापासून शिकणें जरूर आहे, असें कांहीं सुशिक्षितांना कळूं लागलें असा अर्थ होय.

## मार्क्सवादाचा अपुरेपणा.

पण मला असें सांगितलें पाहिजे कीं, सुशिक्षितांत दिसून येणाऱ्या या प्रवृत्तीमुळें नव्या कल्पनाबद्दल व सोशॅलिस्ट तत्त्वज्ञानाबद्दल जनतेंत सहानुभूति उत्पन्न झाली आहे. तथापि या कल्पनांचा स्वीकार, करण्यांत अडचणी आहेत. एका वेगळ्या राष्ट्रांत उत्पन्न झालेली एखादी विचारसरणी आमच्या राष्ट्रांत येथल्या वेगळ्या परिस्थितींत पोचून ती तेथल्या सारखी वाढीस लागेल व तेथल्यासारखी फलदायी होईल अशी अपेक्षा करणें चूक होईल. पाश्चात्यांची विवेचक दृष्टि हीच आपणांस शिकण्यासारखी आहे. इतिहासाची तपासणी करण्याची विवेचक पद्धत व मानवी संस्कृतींचें प्रकार विवेचक पद्धतीनें पाहण्याची पद्धत येवढेंच आपणांस पाश्चात्यापासून शिकतां येईल. फार प्राचीन काळ सोडला तर आपल्या इकडे विवेचक दृष्टीचा पूर्ण अभाव आहे. आज आमच्या गरजा व आमची परिस्थिति ही लक्षांत घेऊन आपण आपली विवेचक दृष्टि चालविली पाहिजे. आधुनिक युरोपच्या सांस्कृतिक इतिहासापासून आपण या गोष्टी शिकल्या पाहिजेत. त्या दृष्टीनें मार्क्सवाद हा अपुरा आहे. नवजीवन चळवळीच्या अखेरच्या गेल्या दीडशें वर्षांत परिणति पावलेली विवेचक दृष्टि हीच मार्क्सिझम होय, म्हणून आपण मार्क्सिझम्च्या मागो माग गेलें पाहिजे. १८ व्या शतकांत जे मोठें तत्त्ववेत्ते झाले त्यांच्यापासून आपण स्फूर्ति मिळविली पाहिजे. जुनी विचारसरणी ज्यांनीं ठार केली, मध्ययुगीन कल्पना ज्यांनीं नाहींशा केल्या, धर्मगुरूंच्या जाचांतून ज्यांनीं युरोपला वांचविलें त्यांच्यापासून आपण स्फूर्ति मिळविली पाहिजे. प्राचीन रूढि, कौटुंबिक अभिमानाच्या कल्पना आणि मध्ययुगीन विचारसरणी यांचा निरास करावयाचा असल्यास त्या तत्त्ववेत्त्याकडे आपणांस वळलें पाहिजे. आम्हांला मध्ययुगीन कल्पनांशीं झगडावयाचें आहे. आणि ज्या क्रांतिकारक भावनांनीं युरोपांत मध्ययुग नाहींसे केलें त्याच कल्पना आपणही हातीं घेतल्या पाहिजेत. त्यानंतर युरोपियन संस्कृतीस जें स्वरूप आलें तें फक्त या नवजीवनाचा कळस होतें. त्या वेळीं युरोपांत असणाऱ्या परंपरा व

परिस्थिति आज आपल्या भोंवतालीं आहे म्हणून तेच उपाय करून त्या योगानेंच आपण आपले प्रश्न सोडविले पाहिजेत.

## विवेचकतेची जरूरी.

आज आपणांस काय दिसते. मार्क्सिस्ट विचारसरणी हें एक शब्दप्रामाण्याचें जंजाळ मानलें जातें. आम्हीं धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळें श्रद्धा ठेवणें हा आमचा स्वभाव आहे. खरोखर ज्या वेळीं आम्हीं क्रांतीची भाषा वापरतों व मार्क्सचीं ध्येयें सांगतों त्या वेळीं आम्हीं केवळ श्रद्धेनें बोलत असतो. जुन्या श्रद्धांच्या जागीं आम्हीं फक्त नव्या श्रद्धा आणल्या आहेत. एक शब्दप्रामाण्य जाऊन त्याजागीं दुसरें शब्दप्रामाण्य आलें आहे. त्याचा काय उपयोग ? आपण विवेचक झालों पाहिजे. प्रमाण मानलेल्या उक्ति बाजूस ठेऊन आपला आपण विचार करण्याचें धैर्य दाखविलें पाहिजे. विवेचक दृष्टीवांचून ज्याप्रमाणें जुन्या कल्पना आपण स्वीकारूं नयेत त्याप्रमाणें युरोपीय कल्पनांही आपल्या येथील परिस्थितीस जुळण्यासारख्या आहेत कीं नाहींत हें विवेचकतेनें पाहिल्यावांचून आपण स्वीकारूं नये. वर्तमान व भूतकाळ, त्याचप्रमाणें पूर्व आणि पश्चिम या दोहोंविषयींही आपण विवेचक राहिलें पाहिजे. युरोपमधील नवजीवन कालाचा इतिहास व त्याची परिणती म्हणजे मार्क्सवाद या दोहींचाही आपण अभ्यास करूं. या विवेचकांनाही नवजीवन चळवळीची मध्यवर्ति कल्पना होती. प्रत्येक गोष्टीविरुद्ध क्रांतिकारक टीका, प्रत्येक गोष्टीविरुद्ध बंड, प्रत्येकाची सूक्ष्म तपासणी याची आपणाला गरज आहे. आम्ही योग्य मार्गानें चाललों आहोत हें सिद्ध करणारीं लक्षणें जगांत दिसत आहेत त्यामुळें आम्हांला उत्तेजन वाटतें. नवजीवनाची चळवळ येथें सुरू झालीच आहे असें वाटूं लागतें. आमच्या बौद्धिक जीवनांत खळबळ उडाली आहे. गोड आध्यात्मिक जीवनांत आपले समाधान होत नाहीं. आम्ही चौकस होत आहों, अजून पूर्ण नाहीं, तरी हळूहळूं आणि थबकत थबकत आम्ही प्रश्न विचारू लागलों आहोंत. क्रांतीची भावना सर्व समाजांत पसरली आहे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. ज्यावेळीं अखिल जनतेला आहे ही समाजपद्धति व ही राज्यपद्धति ठीक नाहीं, असें वाटूं लागेल त्यावेळीं सद्यःस्थितींत पालट होईल. धार्मिक स्वभाव गेला, अध्यात्मवाद खलास

झाला, आणि आतां आम्ही " एंजल्स " धर्माविरुद्ध उठलों आहोंत. क्रांतीच्या क्षेत्रांत आम्ही " एंल्जस " आहोंत. सृष्टिमूलतत्त्वशोधनाच्या विषयांत आम्ही गुरफटलों होतों. स्वर्गाकडे आमची धांव होती. पण आतां नुसते बुद्धिमान् वर्गच नव्हे तर शतकानुशतकें अज्ञानांधकारांत असलेली मागासलेली जनताही विचार करूं लागली आहे, जीवितांत क्रांति करण्याचा आग्रह करूं लागली आहे. अखेर एकदाची क्रांति सुरू झाली, नवजीवनाची चळवळ सुरूं झाली, आपण ती पद्धतशीरपणें करूं या. जे बुद्धिमान् वर्ग राजकीय चळवळींत पडूं शकत नाहींत त्यांनीं बौद्धिक क्रांतीचें हें क्षेत्र आपल्या कार्यासाठीं निवडावें. आज नवजीवनाची चळवळ ही अखिल जनतेची चळवळ झाली असल्याकारणानें ती खास यशस्वी होईल. म्हणून हिंदुस्थानची पुनर्घटना व्हावी, त्याचा मागासलेपणा नाहींसा होऊन एक आधुनिक राष्ट्र व्हावें आणि जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तींत त्याला मानाचें स्थान मिळावें यासाठीं आपण नवजीवन चळवळीचें सामर्थ्य आणून घेऊन व सर्व शक्ति एकटून कार्य करूं या.

नि. ७०२
५५६९

# हिंदी राष्ट्रीयत्व

( हिंदी राष्ट्रीयत्वाच्या परंपरागत तत्वज्ञानाची समीक्षा )

अनुवादक—**तर्कतीर्थ**

इ. स. १९३७ च्या संयुक्त प्रांतीय युवक परिषदेच्या अध्यक्ष पदावरून भाई रॉय यांनीं केलेलें सितापूर येथील भाषण—

आपल्या देशाच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाच्या प्रसंगीं तुम्हीं ही परिषद भरविली आहे. हिंदी जनतेची स्वातंत्र्याची चळवळ जवळ जवळ वीस वर्षांच्या सतत झगड्यानंतर फलद्रूप होण्याच्या स्थितीला येऊन पोहोचली आहे. पुष्कळ वर्षांच्या चळवळीनें आणि प्रचारानें जनता अधिकाधिक संघटित होऊं लागली आहे. युगानुयुगे चालत आलेली जडता आणि निष्क्रियता ही जनतेनें झाडून टाकली आहे. बंडखोर वृत्तीनें त्यांच्यात चैतन्य निर्माण केलें आहे. एका शब्दांत सांगावयाचे म्हणजे हिंदुस्तान क्रांतीच्या प्रसव वेदनेंत आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ हा एक क्रांतीचाच प्रयत्न आहे. तरुण वर्ग राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या पुरोभागीं उभा आहे. तरुणांना ह्या लढ्यांतील क्रांतिकारक तत्वांची मात्र पूर्ण जाणीव अवश्य राहिली पाहिजे. ही जाणीव म्हणजे चळवळींच्या यशस्वितेची गुरुकिल्ली आहे.

मी राजकारणावर बोलावें अशीं तुमची स्वाभाविकपणेंच अपेक्षा असणार, मी नव्या घटनेवर अत्यंत तीव्र स्वरूपाची टीका करीन व ह्या गुलामगिरीच्या सनदेचे तुम्हीं तुकडे तुकडे करावें असें मी तुम्हांस सांगेन, हल्लींच्या पेचप्रसंगाचे विवरण करीन, गव्हर्नरांच्या सुलतानी वर्तनाचा निषेध करीन, साम्राज्य विरोधी एकजूटीचा उपदेश करीन अथवा समाजवाद व वर्गयुद्ध या विषयावर विद्वत्तापूर्ण प्रतिपादन करीन अशी तुमची अपेक्षा असेल. पण या बाबतींत मी तुमची निराशा करणार आहे. माझ्या व्याख्यानाच्या प्रारंभी हे तातडीचे प्रश्न थोडावेळ बाजूला ठेऊन या सगळ्या परिस्थितीच्या बुडाशी जाऊन मूलभूत प्रश्नांची तुमच्या परवानगीनें मी चर्चा करणार आहे. तुम्हीं शांतचित्तानें ऐकाल अशी अपेक्षा आहे.

हल्लींची राजकीय परिस्थिती मोठीशी उत्साहप्रद आहे असें मला वाटत नाहीं. या परिस्थितीच्या पोटी अनेक भवितव्यें साठविलीं होती. निवडणूकीत मिळालेला विजय म्हणजे सत्ता काबीज करण्याच्या नव्या प्रकारच्या लढ्याची नांदीच होती. राष्ट्रसभा फैजपूरच्या ठरावानें दिग्दर्शित केलेल्या मार्गाचे आक्रमण करण्याऐवजीं नव सुधारणावादाच्या मार्गाकडे झुकत आहे. परिस्थितीतील या अनपेक्षीत फरकामुळें चळवळीतलि अनुयायी वर्ग खरोखर गोंधळून गेला असला पाहिजे. अनिष्ट असलेल्या नव्या घटनेच्या भङ्गाची प्रतीक्षा करीत तो बसला होता. शत्रूच्या गोटात शिरून हल्ला करण्याच्या हेतूनें मंत्रिपदें स्वीकारणें जरूर होतें. आज घटनाभंगाचें नांव सुद्धां ऐकूं येत नाहीं. आमचे पुढारी गव्हर्नरांच्या वर्तणूकीचा बेसनदशीरपणा उघडकीस आणून कायद्यानें प्रस्थापित झालेल्या राज्याचे समर्थन करण्यांत गुंतलेले दिसतात. साम्राज्य सरकार कल्पनेबाहेर बावळट नसेल तर थोड्याच महिन्यांत राष्ट्रसभेचे प्रतिनिधी मंत्रिपदें स्वीकारून सनदशीरपणें कारभार हाकतांना दिसतील; दुसऱ्या आणि सरळ शब्दांत सांगावयाचें म्हणजे आजपर्यंत ज्या घटनेचा सर्वस्वी टाकाऊ म्हणून धिःकार केला, तीच घटना अल्पस्वल्प फायद्याकरता राबवताना दिसतील.

आपण ह्या अडचणींत कसें सांपडलों असा प्रश्न विचारवंताच्या मनश्चक्षूपुढें उभा राहील. या प्रश्नाचें उत्तर येथील जुन्या व रूढ राष्ट्रवादी तत्वज्ञानांत सांपडेल. कोणत्याही राजकीय चळवळीच्या तत्वज्ञानाचे स्वरूप ती चळवळ करणाऱ्या वर्गाच्या सामाजिक भूमिकेवर अवलंबून असतें. रूढ राष्ट्रीय तत्वज्ञानाची झाडून छाननी केल्यानें हल्लींच्या राजकीय विचारसरणीच्या दिवाळखोरीची कारणें उघडकीस येतलि.

## नवजीवन व क्रांति

हिंदी राष्ट्रीयवादाचें सामाजिक ध्येय कोणते ? असा सवाल जोपर्यंत धिटाईनें विचारला जात नाहीं व त्याचे निखालस उत्तर मिळत नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रीय चळवळीच्या राजकीय जबाबदाऱ्यांतील परस्पर विरोधी गुंतागुंत अधिकच वाढत जाईल. अमूर्त ध्येयवादानें निःश्चितपणा व निष्क्रियता मात्र वाढेल. खोटीं आश्वासनें देऊन संघटित केलेल्या जनतेची शक्ति भपकेदार चळवळीच्या देखा-

र्थ्यांत मात्र फुकट दवडली जाईल. सामाजिक ध्येय विषयक भ्रमाची छाया राजकीय दृष्टीला आंधळी करतें आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यरूपी ध्येयाकडे नेणाऱ्या गतीस पायबंद घालिते. राजकीय क्रांती हा सामाजिक क्रांतीचा पूर्वरंगच असतो. एवंच जीर्ण व डबघाईस आलेल्या सामाजिक संस्था पूर्णपणें उलथून टाकणें व त्या जागीं नवीन समाजसंस्था उभारणें हेंच राजकीय दृष्ट्या क्रांतिकारक असलेल्या राष्ट्रीय चळवळीचे ध्येय होय. नवजीवनयुक्त अशा नव्या समाजरचनेकरितां आजचें आर्थिक संबंध बदलून त्यांची पुनर्घटना करावयास पाहिजे. या आर्थिक पुनर्घटनेस न्याय्य व कायदेशीर पाठिंबा देणारी क्रांतिकारक राज्यघटना अस्तित्वांत यावयास पाहिजे, म्हणून अशी राज्यघटना हस्तगत करणें हें राष्ट्रीय चळवळीचे ध्येय होय. राष्ट्रीय चळवळींत या देशांतील सामान्य गरीब जनता भाग घेऊं लागली आहे म्हणूनच ती राजकीय दृष्ट्या क्रांतिकारक आहे असें म्हटलें पाहिजे. राष्ट्रीयत्वाची चळवळ सामाजिक प्रगतीच्या गरजेची सूचक आहे. आणि प्रगती म्हणजे पुढें नेणारी गति होय, भूतकालाच्या गर्तेत ढकलणें नव्हे. परंतु हल्लींच्या राष्ट्रीय चळवळींवर ज्या तत्वज्ञानाचा पगडा आहे तें राजकीय क्रांतीच्या ध्येयवादास घातक आहे, हल्लींची राजकीय चळवळ जोंपर्यंत प्रतिगामी तत्वज्ञानाच्या जोखडाला जोडली आहे तोंपर्यंत राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे यत्किंचित् ही प्रगती होणें अशक्य आहे कारण मानवी क्रियांवर मानवी विचारसरणीचे मोठेंच नियंत्रण असतें. मेलेल्या भूतकालांतील परंपरेवर श्रद्धा हेंच त्या तत्वज्ञानाचे ब्रीद आहे. प्रतिगामी विचारसरणी समाजांत दृढमूल करून स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयाला जुजबी व्यापाराचें स्वरूप आणलें आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या सामाजिक क्रांतीची अत्यंत गरज आहे, ही गोष्ट जर नाकबूल असेल तर राजकीय क्रांति ही एक शिळोप्याची गोष्ट ठरते. जनतेंत क्रांतीची जाणीव चेतवूनच राजकीय क्रांतीला पाठिंबा मिळूं शकतो, या गोष्टीची आवश्यकता राष्ट्रीय तत्वज्ञानानें जर मान्य केली नाहीं, तर राष्ट्रीय चळवळीला साम्राज्यशाहीशीं समेट करावा लागेल, एवढेंच नव्हे तर यापेक्षांही घाणेरडे स्वरूप राष्ट्रीय चळवळ धारण करील, ती हमखासपणें क्रांतिघातक स्वरूपही धारण करील, लब्धप्रतिष्ठितांच्या अवडंबरानें हतप्रज्ञ न झालेल्या व बुवाबाजीनें न भाळलेल्या लोकानांच वरील दोन्हीं परिणामांचें व प्रवृत्तींचें अनुमान सहज

करतां येईल. पूर्ण राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयामध्यें क्रांतीच्या ध्येयाचा नियमानें अंतर्भाव होत नाहीं. स्वराज्य हें जुन्या समाज संस्थेच्या संरक्षणाचें व जीर्ण संस्थांच्या पुनरुज्जीवनाचें जर साधन बनलें तर त्याला राजकीय क्रांती न म्हणतां क्रांतिघातक प्रतिक्रांतीच म्हणावें लागेल.

वाटेल त्या राजकीय बदलास क्रांति म्हणतां येणार नाहीं. कोणत्याही राजकीय स्थित्यंतराचें महत्व त्याच्या सामाजिक ध्येयावरूनच सिद्ध होत असतें. एखादें राजकीय स्थित्यंतर रक्तपातानें घडून आलें, एवढ्याच कारणावरून त्यांस क्रांति हें नांव शोभणार नाहीं. सामाजिक क्रांतीच्या घडामोडीशी हिंसा निगडित असल्यामुळें क्रांतीच्या कल्पनेला पुष्कळ वेळां हिंसेची जोड दिली जातें. सामाजिक प्रगतीच्या आणि लोककल्याणाच्या आड येणाऱ्या शक्तींना नेस्तनाबूद करावयाचें नसेल तर क्रांतीशीं हिंसेचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. सामाजिक विकासाच्या दृष्टीनें आवश्यक असलेले सामाजिक व राजकीय स्थित्यंतर जितकें भयानक आहे त्याहून क्रांति जास्त भयानक नाहीं.

सगळ्या साधनानीं, किंबहुना सशस्त्र बंड करूनही राजकीय स्वातंत्र्य मिळविल्यावर सामान्य जनतेस आजपर्यंत दुर्लभ असलेलें महत्वाचें राजकीय हक्क जर प्राप्त झालें नाहींत तर ते राजकीय स्वातंत्र्य क्रांतिदृष्ट्या कवडी मोलाचें होईल.

जुन्या ग्रामोद्धारांच्या ध्येयाची घोषणा करून अथवा मनुस्मृतीचा आदर्श पुढें ठेऊन साम्राज्यशाही उलथून पाडली तरी त्यांस ( प्रतिक्रांति ) क्रांतिघातच म्हणावें लागेल. असल्या प्रतिगामी सामाजिक ध्येयानीं आपली चळवळ पुढें जाणें जवळजवळ अशक्यच आहे हें एक सुदैवच होय. परंतु कांहीं आकस्मिक कारणांनीं अशा तऱ्हेची चळवळ जर यशस्वी झाली, तर त्यामुळें हिंदुस्थानास मनुस्मृतीच्या काळचीहि स्थिति प्राप्त होणार नाहीं, अथवा साधें ग्रामीण जीवनही प्राप्त होणार नाहीं; उलट अनियंत्रित फॅसिस्ट सुलतानी मात्र येथें स्थापन होईल, आणि या जुलमी सत्तेच्या स्थैर्याकरतां प्राचीन संस्कृतीच्या परंपरेचा पूर्णपणें फायदा घेण्यास जुलमी वर्ग मागेंपुढें पाहाणार नाहीं. ही नवी राजवट पाश्चात्य भांडवलशाहीचें दुष्टानुकरण करील. पावित्र्याचा आव आणून आजपर्यंत निषिद्ध मानलेल्या पण मनांतून इष्ट असलेल्या पाश्चिमात्य जडवादाचेंच अनुकरण केलें

जाईल. कारण पाश्चिमात्य भौतिकवाद म्हणजेंच भांडवलशाही होय. स्वाभाविक क्रमानें जगांत जेव्हां भांडवलशाहीचा उदय झाला तेव्हां प्रजासत्ताक स्वातंत्र्याची स्थापना झाली व सांस्कृतिक प्रगति झाली. तशी भांडवलशाही या राजवटींत राहणार नाहीं; दुसरें असें कीं असली राजवट म्हणजें प्रतिगामी सरंजामशाही व भांडवलशाही यांच्या संकरानें उत्पन्न झालेलें राक्षसी अपत्यच होय. एवंच परंपरागत राष्ट्रवाद्यांचें पूर्ण स्वराज्य अथवा रामराज्य कधीं काळीं अस्तित्वांत आलेंच तर तें अत्यंत घातकी स्वरूपाचें होईल. कारण स्वातंत्र्यवादी व क्रांतिकारक जनतेला तुडवणाऱ्या प्रतिगामी शक्तींच्या सहकार्यानें सामान्य जनतेची लूट करणें हेंच त्या सत्तेचें ध्येय राहील. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे हे रामराज्य सामान्य जनतेच्या लुटीचें राज्यतंत्र बनेल. ज्या विचारसरणीनें राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या लक्ष्यांत हमखास अडथळेंच पैदा केलें आणि जिचा समूळ उच्छेद न केल्यास पुन्हां अडथळें उत्पन्न होतील त्या विचारसरणीची छाननी करणें हा या टीकेचा उद्देश आहे. ह्या विचारसरणीत कसलीही उदात्तता, कल्याणमयता, उदारता व आध्यात्मिकता नाहीं हें पूर्णपणें उघडकीस येईपर्यंत अशीच टीका करावी लागेल. शीलवान व भूतदयातत्पर अशा प्रसिद्ध स्त्री पुरुषांनीं ही विचारसरणी उचलून धरल्यामुळें तिच्या जुन्या कीर्तींत थोडीशी भरच पडली आहे. म्हणून या विचारसरणीवर टीका करीत असतांना ती टीका अधिक संशोधनात्मक मूर्तिभंजक व दंभस्फोटक असली पाहिजे. दमदार शास्त्रीय बुद्धीचा आश्रय करून या परंपरागत सिद्धांतांचें व विचारसरणींचें छेदन केलें पाहिजे, व तर्कशुद्ध निर्णयापर्यंत पोहोचलें पाहिजे. याच पद्धतीनें ही विचारसरणी राष्ट्रीय स्वातंत्र्यास पोषक आहे कीं बाधक आहे याचा निर्णय करतां येईल. जर ही विचारसरणी बाधक ठरली तर धैर्यानें फेकली पाहिजे आणि जे आजपर्यंत त्या विचारसरणीचे समर्थन करीत होते त्यांनीं आमचें अनुकरण केलें पाहिजे. आचारास विचार हा मार्गदर्शक असतो म्हणून आपण विचारांची शुद्धि केली पाहिजे, तरच आपलें प्रयत्न सफल होऊं शकतील.

## लोकसत्ता व समाजवाद

अलीकडे आपणांस समाजवादावर लोकांनीं टीकेची झोड उठविलेली ऐकूं

येत आहे. त्या टीकेपैकीं कांहीं शहाणपणाची, कांहीं भंपकगिरींची, कांहीं मूर्खपणाची, व कांहीं उघड उघड भांडवलशाही पद्धतीची आहे. या आक्षेपांच्या मुळांशीं अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें पहा, हा हल्ला समाजवादावर होत नसून प्रजासत्ताक स्वातंत्र्यावर आणि सर्वसाधारण आर्थिक प्रगतीवर केला जात आहे. कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या प्रचारावर झालेला हल्ला खरोखर मुळांत समाजवादावर नसून प्रजास्वातंत्र्यावरच होता, ही गोष्ट तो पक्ष उघडकीस आणू न शकल्यामुळें त्या पक्षाच्या प्रचाराचे वजन अतिशय कमी झाले. समाजसुधारणेच्या पुरस्कर्त्यांनीं आजच्या हिंदुस्तानच्या परिस्थितींत प्रजासत्ताक स्वातंत्र्याच्याच भूमिकेचा स्वीकार केला पाहिजे. महत्वाची राजकीय व सामाजिक परिवर्तनें झालीं तरच प्रजासत्ताक स्वातंत्र्याची खरी स्थापना होईल; ह्यानेंच क्रांति अत्यंत जवळ येईल. आर्थिक पुनर्रचना आणि सामान्य जनतेचा सामाजिक बंधनांतून मोक्ष ह्या दोन गोष्टींच्या अगोदर राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ति व्हावयास पाहिजे हे जरी खरें असलें तरी राजकीय कार्यक्रमापासून निकडीच्या आर्थिक मागण्यावर उभारलेली चळवळ वेगळीं करतां येणार नाहीं. सगळ्या शहाण्या क्रांतिकारकांनीं प्रजासत्ताक स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांची भूमिका घेऊन पुढें येणें हीच गोष्ट आज यथायोग्य ठरेल. प्रजासत्ताक क्रांतीच्या कार्यक्रमांत राष्ट्रीयत्वाच्या सामाजिक व राजकीय अशा दोन्ही अंगांचा समावेश होतो; या सिद्धांताचा समाजवाद्यांनीं सामाजिक क्रांतीवरील निष्ठा ढळूं न देतां जर पुरस्कार केला तर प्रामाणिक पण मार्ग चुकलेल्या प्रतिपक्षास ते हतबल करतील; आणि त्या बरोबरच समाजरचनेंत मूलभूत फरक घडवून आणण्याच्या तत्वास डावलून नुसत्या राजकीय स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्यांच्या प्रमादास आळा घालतील; अशा योगानें समाजवादाचे शत्रू म्हणून असलेलें लोक लोकसत्ताक राज्याचे शत्रू आहेत ही गोष्ट उघडकीस आणता येईल.

हिंदुस्थानास वैभवाच्या आणि ज्ञानाच्या उच्च शिखरास पोहचावयाचे असेल तर हिंदी बहुजनसमाजास आर्थिक दैन्यातून व हीनसंस्कृतीतून मुक्त केले पाहिजे. हे ध्येय प्राप्त करून घेण्यांकरिता दोन साधनांची आवश्यकता आहे. (१) शेती हेंच हिंदुस्तानातील महत्वाचे उत्पादन साधन असल्यामुळें बांडगूळ बनलेली जमीनदार-

शाही नष्ट केली पाहिजे. ( २ ) आणि प्रजासत्ताक स्वातंत्र्याची स्थापना केली पाहिजे. प्रजासत्ताक राज्य हे जनतेच्या हातांतील अत्यंत परिणामकारक शस्त्र असते. संपत्तीच्या खाजगी मालकीचा नाश हा प्रश्नच सध्यां आपणांपुढें उद्भऊ शकत नाहीं. जमीनींच्या मालकीच्या आजच्या पद्धतींत क्रांतीकरणें एवढीच गोष्ट आज आवश्यक आहे, खाजगी मालकी या क्रांतीनंतरही राहूं शकतेच. जमीन ऐतखाऊ मालकाच्या हातांतून कसणाऱ्याच्या हातांत जाईल. या मागणीचा समाजवादांशीं विनाकारण संबंध जोडला जातो. जुनाट व निरर्थक बनलेल्या आर्थिक मालकीचें संरक्षण करण्याच्या हांवेमुळेंच प्रजासत्ताक स्वातंत्र्यास आज विरोध होत आहे. भांडवलशाही पद्धतीच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गांत देशांतील शेतकरीवर्गाचें वाढतें दारिद्र्य ही एक मोठी धोंड होऊन बसली आहे. देशाच्या आर्थिक उत्पादनास काडीचीही मदत न करणारा असा एक वर्ग शेतीच्या उत्पन्ना-पैकीं फार मोठा भाग फुकट खाऊन फस्त करीत आहे. साम्राज्यशाही दरवर्षी जितकी लूट करीत आहे तितकेंच उत्पन्न ह्या जमीन मालकांच्या खिशांत जात असतें. राष्ट्राच्या सर्वसाधारण सुस्थितीस या दोन्हीं पद्धतींच्या नाशाची गरज आहे. एकार्थी साम्राज्यशाही कमी अनिष्ट ठरेल, कारण केवळ स्वार्थी हेतूनें कां होईना, ती देशाच्या एका आर्थिक अंगाची थोडीशी वाढच करते; परंतु हल्लींची रूढ जमीनदारी पद्धत राष्ट्रांच्या सांपत्तिक विकासास वांडगुळाप्रमाणें अत्यंत विघातक आहे. कारण जमीनदारांच्या पदरांत पडणारें उत्पन्न ज्या पद्धतीनें जमिनींतून काढलें जातें ती परिणामीं मुळासच धक्का लावणारी आहे.

स्वराज्य असो अथवा परकीय राज्य असो, जोपर्यंत बहुजन समाजास राज्य-कारभारांत पूर्ण भागीदारी मिळणार नाहीं, तोंपर्यंत देशांत जुनाट मध्ययुगीन अवशेषांचा नाश करणारी शक्ति संघटित व्हावयाची नाहीं. कारण अशा स्थितींत एतद्देशीय भांडवलशाही प्रतिगामी सरंजामशाहीशीं संगनमत करील. एका बाजूस जरी असें दिसतें कीं अनुत्पादक जमीनदारीमुळें भांडवलशाहीच्या प्रगतीस पाय-बंद बसतो तरी दुसऱ्या बाजूनें असें दिसतें कीं सरंजामशाही समाजव्यवस्थेतील धार्मिक भोळेपणामुळें सामान्यजनता असंस्कृत व अडाणी राहून दैववादी बनतें आणि तिच्यांत कोणत्याही जुलमाचा प्रतिकार करण्याची हिंमत रहात नाहीं. परंपरागतराष्ट्रवादी तत्वज्ञांच्या स्वराज्यांत भांडवलदार जमीनदारांच्या बरोबरी-

नेंच लुटीचा भागीदार होईल. अशा स्थितींत बहुजनसमाज अडाणी, असंस्कृत व दुर्बल राहिल्यामुळें भांडवलशाहीस सुरक्षितता वाटेल व यामुळें जमीनदार-शाहीच्या अस्तित्वामुळें होणारा भांडवलशाहीचा तोटा भरून येईल. यावरून हिंदुस्थानांतील भांडवलदार वर्ग जमीनदाराइतकाच लोकशाही राज्याचा शत्रू कां आहे हें चांगलें सिद्ध होतें.

जनता हीच सार्वभौम सत्तेचें अधिष्ठान आहे, या सिद्धांताप्रमाणें एकदां जनतेस संपूर्ण राजकीय हक्कांची प्राप्ति झाली म्हणजे जनता राष्ट्राच्या आर्थिक निर्बंध विकासास उघड उघड विरोध करणाऱ्या शक्तींवर हल्ला चढवण्याची हातची सुवर्णसंधि गमावील काय? हिंदुस्थानसारख्या देशांतील, स्वतंत्र, सर्वाधिकार-संपन्न व सार्वत्रिक मतदान पद्धतीनें निवडलेल्या प्रतिनिधींनीं बनलेली लोकराज्य-समिति ( parliament ) अगोदर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पूर्ण भर देईल आणि मूलभूत फरक घडवून आणतां येईल अशा तऱ्हेचें ठराव प्रचंड बहुमतानें पास करून घेईल. आजपर्यंतच्या परंपरेनें वंद्य मानलेल्या रूढ सामाजिक व्यवस्थेस प्रजासत्ताक स्वातंत्र्य हा सगळ्यांत मोठा धोका आहे ही गोष्ट उघड आहे. म्हणून कोणत्याना कोणत्या तरी कारणांस्तव ज्यांचा ज्यांचा ह्या रूढ समाजव्यवस्थेंत हितसंबंध गुंतला आहे, ते सगळे एकजुटीनें प्रजासत्ताक स्वातंत्र्यास विरोध करीत आहेत. संकुचित दृष्टीच्या समाजवाद्यांनीं मूर्खपणानें आपण होऊन समाजवादाचा बागुलबुवा उभा केल्यामुळें या प्रतिगामी पक्षांना आपलें खरें स्वरूप झाकण्यांस चांगलेंच फावलें आहे.

## आध्यात्मिक ध्येयवाद

हिंदी राष्ट्रवादी जनतेच्या विचारसरणीवर व ध्येयवादावर ज्यांचा पगडा आहे असे पुढारी असें प्रतिपादन करीत असतात कीं, संपत्तीचा संचय करणें ही गोष्ट भारतीयांच्या स्वभावास पटणारी नाहीं; कारण ऐहिक भौतिक वैभव हें भारतीय संस्कृतीचें ध्येय नसून आध्यात्मिक विकास हें आहे. दारिद्र्य हा शाप किंवा दैन्य नसून, दारिद्र्य हा कल्याणमय गुण आहे; ही गोष्ट हिंदी संस्कृतीलाच समजूं शकतें अशी ते पुढारी शेखी मिरवीत असतात. हिंदी संस्कृतींतील उच्च तत्वांची योग्य अंमलबजावणी करून भारतीयांचें सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याचा

यशस्वी-मार्ग दाखविणारे म्हणून ज्यांची ख्याति झाली आहे अशा एका गृहस्थांचें म्हणणें मी येथें उधृत करतों. साहेबजी महाराज दयाळबाग ' हिंदी राष्ट्रापुढील प्रश्न ' या विषयावर भाषण करतांना म्हणाले, "प्रत्येक व्यक्तीची व प्रत्येक राष्ट्राची ध्येयें सर्वसमर्थ दयाघन ईश्वरानें वेळोवेळीं अगाऊच निश्चित केलेलीं असतात. परमेश्वरी आदेशानें जगांतील सर्व गोष्टी घडत असतात. परमेश्वरानेंच मानव-समाजापुढें अत्यंत हितप्रद ध्येयें ठेवलेलीं असतात." भारतीय तत्वज्ञानाशी व धार्मिक वाङ्मयाशीं परिचित असलेल्या माणसांस वरील वाक्यांत नवीन असें कांहींच दिसून येणार नाहीं. सगळ्या पौर्वात्य व पाश्चिमात्य धर्मांत, सगळ्या धार्मिक तत्वज्ञानांत, ईश्वरास्तिक्यवादी बौद्धिक विचारसरणींत, हेंच ईश्वराधीन नियतिवादाचें तत्व सांगितलेलें असतें. कोणताही आड पडदा न ठेवितां स्पष्ट शब्दांत हा जीवनविषयक दैववादच येथें मांडिला आहे. वरील प्रकारची, तत्व-ज्ञानाची सूत्रें म्हणण्यापेक्षां, केवळ श्रद्धागम्य असें विचार मांडल्यानंतर वरील सुप्रसिद्ध गृहस्थांनीं त्या विचारांच्या द्वारें इतिहासाचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले " ईश्वरी इच्छेनें प्रेरीत होऊन आर्यलोकांनीं हिंदुस्थानांत येऊन येथील असंस्कृत रानटी रहिवाश्यांस जिंकिलें." इतिहासांत आज मान्य झालेल्या हकीकतीकडे दुर्लक्ष करून व आधुनिक मानवजातिशास्त्रांतील शोधांची पर्वा न करतां, या गृहस्थांनीं आर्यांच्या संस्कृतिप्रसाराच्या हेतूची अघळ पघळ स्तुति केली आहे. मध्य आशियांतून आलेल्या जेत्या लोकांनी आपणाबरोबर उच्च संस्कृति आणिली आणि हिंदुस्था-नांतील मूळरहिवाश्यांस सुसंस्कृत केलें, ही कथा कल्पित ठरली असतां, तीच उराशी बाळगणें हें ऐतिहासिक असत्यकर्म आहे. गोरे लोक काळ्यांपेक्षां स्वभा-वतः श्रेष्ठ असतात, या समजुतीच्या मुळाशीं वरील कथाच आहे. या देशावर हल्ला करणारे मध्य आशियांतील भटके लोक येथील जनतेपेक्षां सुसंकृत नव्हते पण उजळरंगाचे होते; म्हणून गोरेपण-उजळपण अर्थात् वंशश्रेष्ठता हेंच सांस्कृ-तीक श्रेष्ठतेचें गमक या रानदांडग्या जेत्यांनीं ठरविलें: जातिसंस्थेच्या मूळ कार-णांपैकीं हें एक महत्वाचें कारण आहे. या मुळेंच समाजशास्त्रांतील मूलभूत सिद्धां-तांच्यामध्यें गोऱ्या मानववंशांच्या ठायीं स्वाभाविक गुणश्रेष्ठता असते असा सिद्धांत मानिला आहे. रंगावरून म्ह. वर्णावरून समाजांतील कर्तव्यांची विभा-

गणी व उच्चनीचतेचें तारतम्य ठरविलें गेलें. पूर्वी जितका काळेपणा जास्त, त्या मानानें कर्तव्य अथवा धंदा हीनदर्जाचा मिळत असे. " गोऱ्या मानवांच्या शिरावरील जबाबदारी " चा सिद्धांत पहिल्यांदा किप्लिंगनें शोधिला नाहीं; तो वैदिक सिद्धांत आहे. वेद हे ईश्वराच्या प्रेरणेनें निर्माण झाले असल्यामुळें प्रमादरहित व पूर्णप्रमाण आहेत; त्यामुळें ईश्वराच्या घरीं वंशश्रेष्टतेच्या, वर्णाच्या उच्चतेच्या किंवा जातिभेदाच्या सिद्धांताच्या पुरस्कर्त्यांनीं दैवीमान्यतेची सनद मिळविली. एका पुराणांत तर असें लिहिलें आहे कीं, पश्चिमदेशांतून श्वेतवर्णी देव हिंदुस्थानच्या उद्धाराकरितां येणार आहेत. कल्की अवतार गोऱ्या रंगाचा होणार आहे असें वर्णिलें आहे. एवंच आध्यात्मिक ईश्वरविषयक रूढ विचारांवर श्रद्धा ठेवल्यावर आपणास आपल्या सद्यःस्थितीतील दुःस्थितीबद्दल तक्रार करण्याचें कारणच रहात नाहीं; कारण आपल्या वैदिक समाजशास्त्रीय राजनैतिक वर सांगितलेल्या सिद्धांताप्रमाणें, व जें होतें तें ईश्वराच्या इच्छेनेंच होतें, या अध्यात्मशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें ह्या दुःस्थितीचें औचित्यच सिध्द होतें; हिंदुस्थानावरील ब्रिटिशांची सत्ता परमेश्वरी संकेताचेंच फळ आहे त्याबद्दल कुरकुरता कामा नये. ईश्वरी नियतीवर श्रध्दा असलेल्यांना प्रस्तुत राज्याविरुध्द बंड करण्याचा सक्त प्रतिबंधच प्राप्त होतो. अशा रीतीनें आध्यात्मिक विचारसरणी आमच्या राजकीय गुलामगिरीस शिक्का मोर्तब करतें.

ईश्वरवादी तत्वज्ञानाच्या मूळतत्वाप्रमाणें आमच्या राजकीय पारतंत्र्याच्या न्याय्यान्याय्यतेचा प्रश्नच उत्पन्न करतां येत नाहीं. कारण जगाच्या रहाटींत जी जी परिस्थिति प्राप्त होतें; ती तीं सर्वसमर्थ प्रभूनें अगाऊच ठरविल्याप्रमाणें घडत असल्यामुळें, ती योग्य व न्याय्य म्हणूनच स्वीकारिली पाहिजे. ईश्वरी नियतीवर प्रामाणिकपणें श्रध्दा असलेल्यांना भारतीय इतिहासाबद्दल हीच दृष्टि पत्करली पाहिजे. कारण वरील तत्वज्ञानाचा तर्कशुध्द निर्णय याशिवाय दुसरा निघूच शकत नाहीं. स्वातंत्र्याकरितां झगडणें हें पापकृत्य आहे. कारण तसें करणें म्ह. ईश्वरी इच्छेच्या विरुध्द बंड करणें होय, ही ईश्वरी नियतीच्या आड येण्याची दुष्ट महत्वाकांक्षाच होय. राष्ट्रीयत्वाचें जुनें तत्वदर्शन राजकीय महत्वाकांक्षांना दडपण्याचा प्रयत्न करितें.

गेल्या वीस वर्षांत राष्ट्राच्या शक्तीस संथपणें भरती येत असतां, ही राष्ट्रीय चळवळ कसें वसें भीत भीत एक पाऊल पुढें टाकते व पुनः दहा पावलें माघार घेते, कां या गोंधळून टाकणाऱ्या प्रश्नाचें उत्तर वरील प्रमाणें आहे. स्वातंत्र्याच्या ध्येयाकडें जोमानें कूच करण्याची महत्वाकांक्षा असलेल्या राष्ट्रीय तरुणांनीं किंवा जहालांनीं या वस्तुस्थितीला तोंड दिलें पाहिजे.

गेल्या २७ वर्षांत असा त्यागाचा समय अनेकदा आला होता कीं "हें प्रबळ सरकार वाकलें होतें;" पण त्या त्यावेळीं अनेक घोड चुका पुढाऱ्यांनीं केल्या. दे. बं. दासांनीं १९२०–२१ सालच्या चळवळींत पुढाऱ्यांच्या मूर्खपणावर अत्यंत कडक टीका केली. आजही पूर्वीप्रमाणेंच हें पुढारीपण अपेशी डाव खेळत आहे. हल्लीं चालू असलेल्या पेंचप्रसंगांतही कॉंग्रेसचे पुढारी राजकीय विचाराच्या दिवाळ-खोरींत निघालें आहेत; वस्तुतः आजच्या परिस्थितीच्या पोटीं अनेक क्रांतीकारक घटना घडून येण्याची शक्यता आहे. सत्ता काबीज करण्याकरितां कराव्या लाग-णाऱ्या निर्वाणीच्या लढ्यासाठीं सामान्य जनतेची संघटना वाढविण्याचें अवघड कार्य हातीं घेऊन पुढें कूच करण्याचें सोडून, नव्या सनदशीर राजकारणाकडे कॉंग्रेस झुकूं लागली आहे. हें अध्यात्मवादी तत्वज्ञानाचें राजकीय पर्यवसान आहे. ह्या तत्वज्ञानानें राष्ट्रीय चळवळीस प्रतिगामी सामाजिक विचारसरणींत अडकवून टाकिलें आहे; क्रांतीच्या लढ्याचा वारादेखील या चळवळीस सहन होणार नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न केली आहे.

## नवें सनदशीर राजकारण

कॉंग्रेसनें असहकारितेचा मार्ग सोडून देऊन अधिकार स्वीकारण्याचें ठरविल्या-मुळें कॉंग्रेसनें नव्या सनदशीर राजकारणाचें धोरण स्वीकारलें आहे; अशा शंकेनें राष्ट्रीय चळवळींतील जहाल लोकांत अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं कॉंग्रेसनें आजपर्यंत प्रत्यक्ष प्रतिकाराची भाषा जरी अनेकवेळां उच्चारली आहे, अथवा असहकारिता व कायदेभंग जरी केला आहे, तरी कॉंग्रेस बेसनदशीर राजकारण करणारी संस्था कधींच बनली नाहीं. लाहोरच्या स्वातंत्र्याच्या ठरावानें सुध्दां या बाबतींत मूलतः फरक झाला असें म्हणता येत नाहीं. कायदेशीर उपाय व सनदशीर उपाय यांत मुळींच भेद नाहीं. कारण त्या

उपायांनीं प्रचलित राजसंस्थेच्या कायद्याच्या मूलभूत सिध्दांतांचा भंग किंवा उच्छेद होत नाहीं. जेव्हां राष्ट्रसभा असहकारिता व कायदेभंग करीत होती, त्या वेळीं मुध्दां, राष्ट्रसभा आपल्या स्वराज्याच्या सनदशीर मार्गाला बांधली गेली होती. लाहोरच्या स्वातंत्र्याच्या ठरावानें या परिस्थितींत फरक पडूं शकत नाहीं असें कां याचें स्पष्टीकरण असें—

पहिली गोष्ट अशी कीं, असहकारिता हा देखील पूर्णपणें सनदशीर उपायच होय. जितराष्ट्रांतील प्रजा ही सरकारी नोकरीला बांधली गेलेली नाहीं. कारण नोकरी ही वेतनाकरितां आपखुषीनें करावयाची असतें. असहकारीतेच्या चळवळींत सांगितल्याप्रमाणें सरकारी नोकरी सोडणें किंवा इतर कोणत्याही रीतीनें सरकारास मदत (उदा० वकीली करणें) न करणें म्हणजे सरकारी कायद्याचा उच्छेद करणें असें कोणत्याही अर्थी होत नाहीं. लष्करभरती करणाऱ्या स्वतंत्रदेशाच्या नागरिकांना सक्तीची सेवा किंवा नोकरी नाकारतां येत नाहीं; नाकारल्यास ती मूल कायद्याची पायमल्ली होतें. अशा तऱ्हेची सेवेची मागणी हिंदी लोकांकडे हल्लींचे सरकार करूं शकत नाहीं; कारण आपण **नागरीक** नाहीं, आपण **रयत** अथवा प्रजाजन आहोंत. आपल्या राजकीय परिभाषेंत हें महत्वाचें कायद्याचें रहस्य पाहिजे तितकें कोणी स्पष्टपणें अजून मांडिलें नाहीं. चालू राज्यकारभार चालविण्याकरितां कांहीं कर देणें व कांहीं कायदे पाळणें एवढीच प्रजाजन या नात्यानें आपणावर जबाबदारी आहे. कायदेभंगामुळें वरील जबाबदारीची थोडीशी हेळसांड होतें एवढेंच. परकीयांचा कायदे करण्याचा हक्क अन्याय्य ठरवून तो हिसकून घेण्याचा अथवा एकंदरींत सगळया कायद्यांच्या अस्तित्वास आव्हान देण्याचा प्रश्न कायदेभंगाच्या चळवळींत नसतो. 'करबंदीच्या' मुद्यांतही कर वसूल करण्याच्या हक्काचा प्रश्न उपस्थित केला जात नाहीं. आजपर्यंत करबंदीच्या चळवळींत, "जबाबदारीच्या हक्कांशिवाय कर मिळणार नाहीं" हाही सुप्रसिद्ध उद्देश कधीं पुढें मांडला नव्हता. समजा हा उद्देश मांडला असता, अथवा त्याचा प्रचार व अंमलबजावणी केली असती तरी आधुनिक प्रचलित राज्यघटनाशास्त्राच्या नियमाप्रमाणें, व राज्यघटनेच्या विकासांतील ऐतिहासिक परंपरेप्रमाणें कायदेभंग हा सनदशीरच ठरतो. कांहीं झालें तरी 'सविनय' हें कायदेभंगाचें विशेषण कायदेभंगाच्या कार्यक्रमाची सगळी धार बोथट करतें; आणि बंडखोरी

प्रवृत्तीचा वास देखील मारून टाकतें. आम्ही कांहीं मामूली कायदे मोडूं पण कायदे करणाऱ्या आणि प्रस्तुत किंवा इतर कायद्याच्या रक्षणाची सगळी तरतूद करणाऱ्या सत्तेपुढें नमूं; असा **सविनय कायदेभंग** याचा अर्थ होतो. अहिंसेच्या ब्रीदानें ही गोष्ट उघड दिसतें कीं, असहकारिता किंवा कायदेभंग म्हणजे असनदशीर वर्तन नव्हे, विशिष्ट गाऱ्हाणी दूर व्हावी म्हणून केलेलें निषेध प्रदर्शनच होय.

मग राष्ट्रसभेनें स्वीकारलेल्या ह्या प्रतिकाराच्या राजकारणास सरकारनें बेसनदशीर कां ठरविलें ? सरकारला अशी भीति वाटूं लागली होती कीं, ही चळवळ ज्या मर्यादेंत चालली आहे, ती मर्यादा सोडून ही चळवळ भलत्याच थराला जाईल. ही भीति अकारण नव्हती. कोणत्याही सामान्यजनतेच्या चळवळीचें भयंकर पर्यवसान होणें त्या चळवळीचा अंगभूत स्वभावच असतो. राष्ट्रसभेची चळवळ अनेकदा या अंतिममर्यादेच्या बाहेर गेलेली आहे. परंतु याचा अतिरेक होणार नाहीं, याची तरतूद अगाऊच त्या चळवळींत केलेली आहे. त्या चळवळीच्या पाठीशी असलेल्या विचारसरणींनेंच ही तरतूद करून ठेविली आहे.

' सनदशीर ' उपाय व ' सत्यपूर्ण ' उपाय यांच्यांत वस्तुतः मुळींच फरक नाहीं. अध्यात्मशास्त्रांतील सत्यविषयक कल्पनेचा व्यवहारांत उपयोग केल्यानें विचारपद्धतींत चांगलाच गोंधळ माजवितां येतो व त्यामुळें राजकीय संधिसाधूपणास चांगलाच अवसर मिळतो. सनदशीर मर्यादेच्या कचाटींतून राष्ट्रसभेचें राजकारण बाहेर जाऊं नये याची हा नवा सत्यरूपी देव व ती जुनी अहिंसादेवता चांगलीच खबरदारी घेतें. येथें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, सत्यनिष्ठा क्रांतीच्या प्रेरणेस व क्रांतीच्या प्रयत्नास आडवी येतें असें केव्हांहीं म्हणतां येणार नाहीं. उलट क्रांतिकारकच सत्यस्थितीची पूर्ण जाणीव करून घेतात व अन्यायाची चीड येऊन रूढ ढोंगी परंपरेच्या उच्छेदार्थ प्रवृत्त होतात. परंतु राष्ट्रसभेच्या प्रतिज्ञेंत सत्याचा अंतर्भाव करण्यानें कसल्याही प्रकारची क्रांतिकारक प्रवृत्ति निदर्शित केली जात नाहीं. कारण हें ' सत्य ' ऐहिक अथवा चालू प्रत्यक्ष जीवनांतील वस्तुस्थितीशीं संबद्ध नाहीं. कारण हें सत्य म्हणजे अमूर्त अव्यक्त अध्यात्मशास्त्रीय कल्पनास्वरूपी आहे, त्याची व्याख्या करता येत नाहीं, आणि त्यामुळें तें कधींच आचरणांत आणतां येत नाहीं. हें सत्य कोणत्याही

सामाजिक व राजकीय परिस्थितीस पाठिंबा देऊं शकतें. एवंच या सत्याचा ईश्वरी आज्ञा म्हणून क्रांति हाणून पाडण्यास चांगलाच उपयोग होईल.

या देशांतील राजकीय परिभाषेंत ज्यास सनदशीर पद्धत असें म्हणतात, त्याचें क्रांतीचें भय व क्रांतीचा द्वेष हें सार आहे. जनतेच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणारी राजकीय सत्ता मागण्याच्या किंवा काबीज करण्याच्या हक्काची दिक्कत नसणें हा सनदशीर पद्धतीचा अर्थ आहे. राष्ट्रसभेच्या राजकारणांतून क्रांती-विरोधी परिस्थितीची अजून हकालपट्टी झाली नाहीं; याचें कारण हिंदी राष्ट्रीयत्वांतील सनातनी दृष्टिकोन व आध्यात्मिक विचारसरणी होय. विवेचक दृष्टीनें पहाणाऱ्यास हल्लींच्या राजकीय भयप्रद घटनांबद्दल कांहींच आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. सत्ता काबीज करण्याच्या क्रांतिकारक झगडण्याचा बहिष्कार घालणाऱ्या अत्यंत संकुचित राजकारणाचें हें तर्कदृष्ट्या अपरिहार्य असेंच पर्य-वसान होय. जर तुम्हास या नव्या सनदशीर राजकारणाची लक्षणें पाहून भय वाटत असेल तर आपल्या आवडत्या सामाजिक ध्येयांस व नव्या तत्त्वज्ञानास विरोधी अशा राजकारणी कारवाईस भुलून जाऊ नका. क्रांतीच्या राजकारणास क्रांतिकारक विचारसरणीची जोड द्यावी लागते. श्रद्धाजड राष्ट्रीय संप्रदायाचें प्रतिगामी तत्वज्ञान अगोदर झुगारून द्याल, तरच राजकीय स्वातंत्र्याकडे व सामाजिक पुनर्रचनेच्या ध्येयाकडे नेणाऱ्या मार्गाचें आक्रमण करण्यास तुम्हांस मोकळीक मिळेल !

## हिंदुस्थानचें अध्यात्मवादी स्वतंत्र वैशिष्ट्य

आपल्या प्राचीन विद्यांच्या व येथील मौलिक परंपरेच्या निर्झरांचें आकंठ प्राशन करण्याचें सोडून परदेशी परक्या भलत्याच कलुषित विचारसरणीनें भारून गेलेल्या क्रांतिकारक तरुणांच्या प्रवृत्तीची अराष्ट्रीय म्हणून निंदा केली जाते. हिंदी संस्कृतीच्या इतिहासाचें तज्ञ असें सांगत असतात कीं समाजविज्ञानासंबंधीचे ( राजनीति, अर्थशास्त्र, कायदा, नागरिक नीति इ० संबंधीं ) प्राचीन भारतीय ऋषींचें सिद्धांत म्हणजे अंतिमनिर्णय होत. मनुस्मृतीतील ज्ञानाचा अभ्यास करण्याऐवजीं उत्साही जिज्ञासू तरुण सामाजिक न्यायतत्वांचे द्रष्टे असलेल्या मार्क्स लेनिन सारख्या परकीयांकडून स्फूर्ति मिळवितात; हीं अत्यंत खेदाची गोष्ट समजली जाते. आपली आध्यात्मिक परंपराच भारतीय समाजास समाज

वादाचें सिद्धांत पचविण्यास व अंमलांत आणण्यास मदत करील असें खात्रीपूर्वक कित्येक लोक सांगत असतात. ते असें सांगतात कीं, एकंदरींत आम्ही हिंदी लोक समाजवादास कधीं भीत नाहीं. परंतु ही वस्तुस्थिति लक्षांत घेणें जरूर आहे कीं, ज्याच्यापाशीं आज चांगली दौलत आहे असाच हिंदी समाजांतील एक वर्ग समाजवादास चांगलाच भ्यायला आहे. साम्राज्यशाही व हा सुस्थितींत असलेला वर्गच सामान्य जनतेच्या दैन्यास, अज्ञानास व सर्वबाजूनें झालेल्या अधःपातास जबाबदार आहे. कारण त्याच्या सुस्थितीचा, जनतेची हीन स्थिति हाच पाया आहे. हा दौलतवाला वर्ग तर सोडाच पण स्वतःस राष्ट्रीय म्हणवणारे पुष्कळ पुढारीच तरुण वर्गांत पसरणाऱ्या समाजवादी प्रवृत्तींकडे पाहून कपाळास आठ्या चढवीत असतात. तरुण वर्ग रूढींची बंधनें तटातट तोडून टाकीत आहे, याचें श्रेय नव्या पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीकडे व दडपून टाकणाऱ्या आर्थिक परिस्थितीकडे आहे. हिंदुस्थानांत जनकासारखे परोपकारी राजे होऊन गेले हें जरी खरें मानिलें तरी आजच्या परिस्थितींत त्या पुराण कथेमुळें प्रसिद्धीस पावलेल्या उदार पितरांच्या सद्गुणांचा यत्किंचित् अंशही शिल्लक राहिलेला नाहीं. दुसरें असें कीं परोपकार हा एक सद्गुण असेल; पण तो कांहीं सामाजिक न्याय नव्हे. उलट उपकार घेणें म्हणजे जखमेवर अपमानाचा डाग देणें होय. समाजवाद म्हणजे भिक्षा घालणें नव्हे. हिंदुस्थानांत काय किंवा युरोपांत काय फार थोडे श्रीमंत उदारपणें भिक्षा किंवा दान देत असतात. वाटेल त्या मार्गानें मिळविलेल्या धनाचा एक अंश मात्र ते दान म्हणून देतात. उदाहरणादाखल सांगावयाचें तर मनुस्मृतीतील दानधर्माचा समाजवाद या आध्यात्मिक हिंदुस्थानापेक्षां जडवादी अमेरिकेंत फार मोठ्या प्रमाणांत आढळतो.

शास्त्रीय समाजवादाचें ध्येय हिंदुस्थानास अज्ञात नव्हतें, व मनूच्या विचारसरणींत मार्क्सचीं तत्वें अगाऊच अंतर्भूत झालीं आहेत, असें आपण मानूं या. हीं तत्वें जर तुमच्या शास्त्रांत आहेत तर ही सर्व परकी उसनी विचारसरणी आहे असें म्हणून तुम्ही ह्या विचारसरणीचा उगीच इतका द्वेष कां मांडिला आहे ? प्राचीन ऋषींनी जें सांगितलें, त्याचीच मार्क्सनें उजळणी केली आहे; हें जर खरें असेल तर मार्क्सच्या अभ्यासाचें या लोकांस इतकें वावडें कां ? प्रत्यक्ष मनुस्मृति वाचून समजत नाहीं; म्हणून तरुण मंडळी मनुस्मृतीचा मार्क्सनें केलेला

अनुवाद वाचतात, असेंच कां मानीत नाहीं ? कारण कांहीं झाले तरी तरुण योग्य मार्गावरच आहेत असें म्हटलें पाहिजे. मार्क्सपेक्षां मनूचें ज्ञान फार खोल व प्रगल्भ असेल तर कांहीं काळानें तरूण मंडळींच्या ही गोष्ट आपसूकच लक्षांत येऊन ते आपली चूक सुधारतील; कांहींसा फेरा पडेल इतकेंच. त्यांना कांहीं-वेळ अशीच संधि द्या, हे उथळखोर आपोआप मार्गावर येतील.

या चमत्कारिक दृष्टिकोनाच्या बुडाशीं एक महत्वाचें कारण आहे. खऱ्या समाज-वादाच्या प्रसाराचें भय हेंच मार्क्सवर बहिष्कार घालण्याचें कारण होय. याच्या मुळाशी नुसत्या समाजवादाचें भय नाहीं. कोणत्याही सामाजिक घडामोडीचा द्वेष या लोकांच्या पोटांत आहे कारण हिंदी जनतेची प्रगति व भरभराट ज्यावर अवलंबून आहे, असे सामाजिक व राजकीय फरक घडून येणें अत्यंत अनिवार्य आहे. यांत समाजवादाची स्थापना प्रत्यक्ष येत नाहीं. लोकसत्तात्मक क्रांति आजच्या स्थितींत अत्यंत आवश्यक आहे. मार्क्स व लेनिन सारख्या आधुनिक क्रांतिकारक तत्वज्ञांनीं प्रतिपादिलेली सामाजिक न्यायतत्वाची ध्येयें हिंदी तरु-णांच्या मनास खेचून घेतात व रूढीनें चालत आलेली मनूवरची श्रद्धा ढासळून टाकतात. याचें कारण असें आहे कीं लोकसत्तेच्या व समाजवादाच्या सिद्धांतात आणि हिंदी मध्ययुगीन सरंजामी पितृस्वामिक सिद्धांतात अर्थाअर्थी कांहीं साम्य नाहीं.

मनूच्या शास्त्रांत कितीही चांगलें गूण असलें तरी त्यांत समाजवादास जमणारें असें कांहीं नाहीं. ज्या परिस्थितींत समाजवादाची स्थापना शक्य होते अशी परिस्थिति परिपक्वदशेस आल्याशिवाय समाजवादी समाजव्यवस्थेची गरजच नसतें. पूर्वग्रहरहित मोकळ्या मनानें मनूचें वाचन केल्यास कोणासही असें दिसून येईल कीं, मनू एखाद्या नव्या समाजव्यवस्थेचा द्रष्टा नव्हता; तो केवळ त्यावेळीं रूढ असलेल्या समाजपद्धतीचें कसें तरी समर्थन करणारा होता. ती समाजपद्धति कोणत्या प्रकारची होती ? ज्यांत ब्राम्हण पुरोहित घराण्यांचें वर्चस्व होतें अशी ती पद्धति होती. ज्या समाजव्यवस्थेच्या रक्षणार्थ मनूनें नियम व कायदे केले तिचें स्वरूप त्या कायद्यावरून चटकन उघडकीस येतें. मध्ययुगीन सत्ताधारी पितृप्रधान घराणीं उदार असतील पण प्रजेस सत्तेची जबाबदारी देण्यास अनुकूल नव्हती. घटनेच्या दृष्टीनें त्यांचे अधिकार अमर्यादित होते. समाजवाद हें ध्येय त्यावेळीं

अज्ञात होतें. खाजगी संपत्तीच्या पितृप्रभुक व्यवस्थेवर उभारलेल्या समाजपद्धती-करितां मनूनें कायदे व नियम बांधिले. मनूच्या सामाजिक दर्शनाचें सार त्यानें केलेल्या धर्माच्या व्याख्येंत साठविलेलें आहे. मनूनें प्रतिपादिलेली हिंदूंची धर्म-विषयक कल्पना म्हणजे हिंदुस्थानानें जगास दिलेल्या संदेशाचें रहस्यच आहे असें सांगतात.

**धर्म**–ही सामाजिक व्यापाराची धार्मिक व नैतिक कल्पना होय. मनूनें अशी व्याख्या केली आहे—

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।
धीर्विद्या सत्यमक्रोधः दशकं धर्मलक्षणम् । मनु ६।९२

" संतोष, क्षमा, आत्मसंयम, परधनाचा अपहार न करणें, शुचिर्भूत राहण्याचें नियम पाळणें, इंद्रियांना दाबांत ठेवणें, शहाणपणा, परमात्म्याचें ज्ञान, सत्यनिष्टा, व क्रोध येऊं न देणें हें दशक धर्माचें लक्षण होय. "

हा सद्गुणांचा भव्य समुच्चय म्हणजे पुरोहितांच्या व खानदानी घराण्यांतील मालकांच्या अधिकारसंपन्न वर्गानें सहज व फायदेशीर व्हावा अशा रीतीनें प्रति-पादिलेला व आचरिलेला धर्म होय. वरील वर्गाशिवाय बाकीच्या समाजानें हा धर्म अमलांत आणणें म्हणजे आपणास पिळून काढणाऱ्या समाजपद्धतीस आप-णहून शरण जाणेंच होय. या प्राचीनत्वामुळें पूज्य व वंद्य झालेल्या देवतांचें थोडें जवळ जाऊन दर्शन घ्या: थोडी चिकित्सक दृष्टि असल्यास त्यांचें मातीचें पाय तेव्हांच ढोबळपणें दिसतील.

**संतोष**–ज्यांना असमाधान मानण्याचें बिलकुल कारण नाहीं त्यांना हा सद्गुण शिकविण्याची गरजच नाहीं. विशेष सवलतीचे अधिकार असलेल्या लोकांना या गुणाचें आचरण करण्यास कांहींच त्रास नसतो. कंगाल लोकांचें ठिकाणीं असंतोष धुमसत असणें स्वाभाविक आहे व तें न्याय्यही आहे. पण ही स्थिति म्हणजे वर्त-मान सामाजिक व राजकीय स्थैर्यास दत्त म्हणून पुढें उभा राहणारा हा धोका असतो.

धार्मिक कर्तव्य या नात्यानें आचरावयाचा हा सद्गुण समाधानाच्या तत्वा-पासून शोधून काढिला; याचें कारण असें आहे कीं, त्यामुळें सवलतवाल्या वर्गाचे स्थान शाबूत राहतें. हा सवलतदार वर्ग असंतोषाचें विशेष कारण नसल्यामुळें

समाधानीपणा आपल्या आचरणांत सहज उतरवूं शकतो व बाकीच्यांस आदर्शभूत होतो. सबलतवाला वर्ग बाकीच्या लोकांस आपल्या दुर्दैवास हटविण्याकरितां, भवितव्याचें नियंत्रण करणाऱ्या लहरी कोपिष्ठ देवांना प्रसन्न करण्याची दीनवाणी आशा लावून, सदरहू सद्‌गुणाची जोपासना करण्याचा सारखा टुमणा लावित असतो. हें करण्याचा त्याचा हेतू उघड आहे. हा सद्‌गुण म्हणजे वरिष्ठ वर्गाचे प्रतिष्ठितपणा मिरविण्याचें बिनकष्टाचें साधन आहे व त्यामुळें आत्मशुद्धि मिळविल्याची फुकटची मानसिक समाधानाची भावनाही प्राप्त होते. परंतु बहुजनसमाजास या सद्‌गुणाचे आचरण करण्यास अतिशय खडतर अभ्यास करावा लागतो, संतोषाची सवय लावून घेण्याकरितां खरा स्वार्थत्याग करावा लागतो.

**क्षमा**–ज्यांच्यावर वारंवार अन्याय होत असतो, त्यांनीं अमलांत आणला तरच हा सद्‌गुण आहे. याही सद्‌गुणाचा बोजा सामान्य जनतेवरच पडतो. वस्तुतः थोडया लोकांचे सबलतीचे हक्क व सत्ता अबाधितपणें चालूं राखण्याकरितां सामान्यजनतेवरच नेहमीं अत्याचार घडत असतो. परंतु समर्थासच औदार्याचा डौल मिरविणें परवडतें. त्यामुळें उपकृत झालेल्या वर्गाच्या कृतज्ञतेचा फायदा त्यास सारखा उपटता येतो. प्रामाणिकपणा दाखविण्याप्रमाणेंच क्षमा करणें हेंही व्यवहारदृष्टया उत्तम धोरण असतें; कारण त्यापासून चांगलेंच साधून घेतां येतें. परिस्थितीच्या जबरदस्त दडपणामुळें गुन्हेगारी टाळणें जेव्हां अशक्य होते, किंबहुना नैतिक दृष्टया समर्थनीय ठरते, तेव्हां झालेल्या गुन्ह्यांची क्षमा केली असें दाखविणें हा उदार सद्‌गुण नसून केवळ दांभिकपणाच होय. भुकेच्या आगीनें केलेली चोरी आम्ही माफ केली असें मिरविणें हा कांहीं सद्‌गुण नाहीं.

**आत्मसंयम**–ह्याचें शास्त्रोक्त रीतीनें बरोबर पालन करणें म्हणजे आत्मनाश करणें होय. संयम नीतिदृष्टया व समाजदृष्टया इष्ट व आवश्यक आहे. परंतु या नियमाच्या पालनाचें शास्त्रांत जोपर्यंत, मनुष्याचा, मनुष्य या नात्यानें जीवन चालविण्याचा व जीवनशास्त्रदृष्टया निसर्गतः अपरिहार्य अशा प्रजोत्पादनादिकांचा अधिकार स्पष्टपणें मान्य करीत नाहींत, तोंपर्यंत या सद्‌गुणाचा, जन्मसिद्ध अधिकाराचा पूर्णनिषेध, असाच अर्थ होतो. वाटेल तसें जनतेच्या शारीरिक व मानसिक जीवनावर निर्बंध लादून निर्माण केलेल्या सामाजिक स्थैर्यामुळें समाजांत शांतता व व्यवस्था निर्माण होते; पण त्यामुळें जनतेची भावी प्रगति थांबते.

आत्मसंयमाच्या सद्‌गुणामुळें जनतेची प्रापंचिक सुस्थितीबद्दलची महत्वाकांक्षा मरते व त्यामुळें जनता खालावत जातें. राष्ट्राची आर्थिक प्रगति सामान्य जनतेच्या भोगक्षमतेच्या वाढीवर, म्हणजे अधिकाधिक उपभोग साधनें वापरण्याच्या प्रवृत्तीच्या वाढीवर, अवलंबून असतें: हें एक अर्थशास्त्राचें मूलतत्व आहे; हें अनुभवानें सिद्ध झालें आहे. हें भांडवलशाहीनें मान्य केलें आहे. परंतु भांडवलशाही पूर्वीचें अर्थशास्त्र हें पूज्य पुरोहितांच्या, वडिल घराण्यांच्या, किंवा सरदार जहागिरदार इत्यादि सरंजामदारांच्या मालकी हक्कावर उभारलेले असते. त्यांत संपत्तीच्या उत्पादनाच्या वाढीला खुंटवणारी फार बंधनें असतात. त्या स्थितींत एकंदर उत्पन्न थोडें होत असल्याकारणानें श्रमजीवी वर्गाच्या साध्या राहणीमुळें व समाधानी वृत्तीमुळेंच वरिष्ठ वर्गास वैभव भोगता येते. जनतेस पिळण्याच्या व लुबाडण्याच्या पापकृत्यास नैतिक आधार या संयमाच्या सद्‌गुणामुळें मिळतो. जनतेस आत्मसंयमाचा धडा दिला नसता म्हणजे जनतेस नुसत्या शरीरधारणास आवश्यक अशा साधनांवाचूनही राहण्याची सवय लावली नसती तर त्यांच्या श्रमाचा नफा वरच्या वर्गांच्या हातात साठला नसता. ज्या समाजव्यवस्थेचा ऐतखाऊ लोकांची मालकी हा पाया असतो, त्या समाजाच्या अर्थशास्त्राचा मूळसिद्धांत ‘ संयम ’ हा नैतिक व धार्मिक स्वरुप धारण करतो.

**अस्तेय**–ह्या सद्‌गुणानें खाजगी संपत्तीच्या पावित्र्याबद्दल आदरबुद्धि उत्पन्न होतें. मनूस समाजवादाचा आद्यद्रष्टा मानणें हें कसें भ्रामक आहे, तें यावरुन चांगलेंच उघडकीस येतें. समाजवादी तर बाजूस राहोत पण नुसत्या साध्या समाज सुधारकासही मनुस्मृतींत त्यांना इष्ट असें उदात्त विचार व प्रगतिपर तत्वें फार सांपडत नाहींत. वस्तुतः मनु हा हिंदी मध्ययुगीन वर्गसत्तेचा कायदेकार होता. पुरोहितवर्ग व त्यांचे दोस्तवर्ग यांचे सबलतीचे हक्क सुरक्षित राखण्याची हत्यारें म्हणजे त्याचे कायदे व नियम होत. हिंदुस्थानांत अत्यंत उशिरा उदयास येणाऱ्या नवजीवनास योग्य परिस्थितीची भूमिका निर्माण करण्याकरितां मनूच्या शिकवणीचें खंडण हिंदुस्थानानें अवश्य केलें पाहिजे म्हणून मार्क्सचेंच अराष्ट्रीय अनुयायी बनण्याची जरूरी नाहीं. उदाहरणार्थ इतिहासाचे एक हिंदी प्रोफेसरच काय म्हणतात तें पहा. “ मनुस्मृतीचा या नव्या युगांत आपणांस कांहीं उपयोग नाहीं. सरंजामदारी जमान्यांतील सरंजामदारवर्गाचा व जेत्यांचा

हा कायदा आहे. वर्गवैषम्य, विशिष्टवर्गांना स्वतंत्र सवलती, व मुभा ही मनूच्या समाजरचनेची व न्यायाची पार्श्वभूमि आहे. क्षत्रियराजे ( अमीर उमराव ) आणि पुरोहितवर्ग हे ऐहिक व पारलौकिक हिताचे बाबतींत समाजाची जबाबदारी बाळगणारे व शूर म्हणून वंद्य मानिले जात होते; राजकारणाशी संबंध नसलेल्या वर्गांपैकीं व्यापारी, कारागीर, मजूर, शेतकरी, कुळें, दास व एकंदर जित लोक यांना सामाजिक समतेचे किंवा वरील वर्गांच्या बरोबरीचे यत्किंचितही हक्क नव्हते. खाजगी संपत्तीच्या पावित्र्याची, आनुवंशिकतेची, वंशपरंपरागत हक्काची आणि वर्गरचनेची कल्पना, त्या समाजपद्धतीचा नैतिक पाया आहे. राजाचे ईश्वरांशत्व आणि जमिनीच्या मालकांचे व धार्मिक पुरोहितांचे मनावर व बाह्य जगावर वर्चस्व हे त्यांच्या राजशास्त्राचे सिद्धांत आहेत. या पैकीं कोणत्याही गोष्टींत या नव्या युगाच्या ज्ञानाचे किंवा भावनेचे सादृश्य मुळींच नाहीं. " ही गोष्ट ज्यांत नैतिक धैर्य व बौद्धिक प्रामाणिकपणा आहे असाच मनुष्य सांगत आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमि लक्षांत घेऊनच मनूच्या शास्त्राचें त्यानें सार आकलन केलें आहे. शाश्वतसत्याच्या वेदांतीश्रद्धेच्या खोड्यांत अडकून तो हतबुद्ध झाला नाहीं. भूतकालीं जें चांगलें गुणयुक्त व उपयुक्त होतें त्याच्यात कालमानानें कांहीं फरक झाला नाहीं, असें समजून वाटेल त्या उच्च ज्ञानाच्या भूमिकेंत नेऊन त्यास बसवावें हें युक्त नव्हे. हिंदुविश्वविद्यालचे प्रो. पुणतांबेकर एवढेंच वरील प्रमाणें विधान करून थांबलें नाहींत. ते धैर्यानें पुढें जाऊन, जे ' मनुस्मृतीकडे पुनः परत चला ' असें सांगत सुटतात त्यांच्या हेतूंची छाननी करतात. मी त्यांचे म्हणणें येथें विस्तृतपणें उधृत करतो.

" आजकाल, नव्या प्रजासत्ताक मूलग्राही किंवा क्रांतिकारक तत्वज्ञानांच्या हल्ल्यांत, आमचे रूढिनिष्ठ पुराणमतवादी समाजव्यवस्थेच्या व सामाजिक प्रगतीच्या स्वतःच्या विचारसरणीच्या तत्वज्ञानाकडे ओढले जात आहेत; अर्थात त्यांचें तत्वज्ञान दोषांवर कसेंबसें सारवण घालणारेंच असतें; केवळ धनिक व विशिष्ट सवलती भोगणाऱ्या वर्गांच्या विशिष्ट उच्च दर्जाचें समर्थन करण्याकरितां त्याची वाढ झाली आहे. परंतु नवयुगाच्या प्रभावी शक्तीमुळें त्यांचे पुरस्कर्ते प्रतिगामीपणा सारखा टिकवूं शकणार नाहींत. इतर साधारण वर्गांच्या बऱ्याच नकारी ते खुषीनें मान्य करावयास तयार आहेत. मात्र त्यांना त्यांच्या आर्थिक अधिका-

राचा व सामाजिक विशिष्ट स्थानांचा उपभोग घेण्यास प्रत्यवाय येतां कामा नये. त्यांच्या धनास व मनास जर धक्का पोंचत नसेल तर ते व्यक्तिविषयक अधिकारांचा, उदाहरणार्थ शेतकरी व कामकरी यांचें हक्कांचा, कैवार घ्यावयास तयार आहेत. पूर्वपरंपरागत नीतितत्त्वांचें व समाजव्यवस्थेचें संरक्षण करण्यापेक्षां त्यांचे लक्ष स्वतःचें व स्वतःच्या दौलतींचे संरक्षण कसें करावें, यांत गुंतलें आहे. म्हणूनच ते खाजगी मालमत्तेवर विशेषतः जमिनीवर व्यक्तीच्या अनिर्बंध हक्काचा, अनुवंशिक मालकीच्या वर्तमान कायद्याचा, वंशपरंपरेचा, कराचा, तसेंच वर्गभेद पद्धतीच्या तत्त्वाचा, पुरस्कार करतात. स्वतःच्या बापजाद्यांच्या, जुन्या संस्थांच्या, व रूढींच्या मुळाशीं असलेल्या इतक्या वर्षांच्या अनुभवानें पारखलेल्या शहाणपणावर त्यांची फार भिस्त आहे. समाजाच्या, धर्माच्या व राज्यव्यवहाराच्या पुनर्घटनेकरितां स्वीकारलेल्या प्रजासत्तेची व बुद्धिवादाची नवखी व प्रयोगावस्थेतेंत असलेली तत्त्वें व साधनें त्यांना अविश्वसनीय वाटतात. त्यांचा व्यक्तीच्या विचारशक्तीवर व तर्कदृष्टीवर भरवसा नाहीं. प्राचीन ज्ञान, संस्था व संस्कृति यांत त्यांच्या दृष्टीनें कांहींएक गूढ भरलें आहे, कांहींएक गुप्त आहे, कांहींएक चैतन्यमय असें आहे, शाश्वत किंवा सनातन असें कांही एक छपून राहिलें आहे. देशांतील विशिष्ट संस्थांचा व कायद्यांचा विरोध व भंग करण्याचा हक्क त्यांना मान्य नाहीं. कसल्याही तऱ्हेची क्रांति त्यांस पटत नाहीं. त्यांना भूतकालाशीं फारकत अनिष्ट वाटते. पुराणमतवादी रूढिनिष्ठांच्या पुढें, मुद्दाम रंगवून कल्पनारम्य बनविलेलें सरंजामदारीयुग हाच खराखुरा आदर्श आहे. वंशपरंपरागत चालत आलेल्या खानदानी सरदारांच्या शहाण्या राज्यकर्त्यावर्गाचें महत्व त्यास फार वाटतें. ईर्षा, योग्यता व समता यांच्यावर उभारलेल्या प्रजासत्ताक पद्धतीचे ते वैरी आहेत. ज्ञातिसभा, स्थिर वहिवाटलेल्या सवलती आणि मध्ययुगीन समाजांतील दर्जा त्यांना फार पसंत पडतो. ”

जी विचारसरणी व संस्कृति आपण आजपर्यंत प्रेमानें जतन करून ठेविली आहे, आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीवर जिचें वर्चस्व आहे, तिच्यावर असा भयंकर दोषारोप आहे. खरोखर जे या परंपरेवर निष्ठा ठेवणारे आहेत तेच सगळ्या प्रागतिक आणि क्रांतिकारक विचारांच्या विरोधास प्रवृत्त झाले आहेत. त्यांना लोकमतेची मुळींच पर्वा नाहीं. त्यांना कसल्याही प्रकारची क्रांती नको.

म्हणूनच वरील प्रकारच्या विचारसरणीचा प्रभाव पडलेली कोणतीही राजकीय चळवळ चक्रव्यूहांत सांपडून तिची गति कुंठित व्हावी यांत कसलेंच आश्चर्य नाहीं. आपल्या राष्ट्रीय चळवळीची हीच गत झाली आहे. जर आपल्या राष्ट्रीय चळवळीची इष्ट ध्येयाकडे प्रगति करावयाची असेल तर आपल्या पुष्कळ पुढाऱ्यांनीं आतांपर्यंत सांगितलेल्या, मागें खेचणाऱ्या विचारसरणीचा बीमोड केला पाहिजे. आपणांस आत्मपरीक्षणाचें धैर्य पाहिजे. गोड थापा व खरें ढिंग यांतील तारतम्य ओळखतां आलें पाहिजे. आपणांस जर कसल्या गोष्टींची उणीव असेल तर याचीच होय. पूर्वरूढी विरुद्ध बंडाचें निशाण उभारणें हें क्रांतिकारक तरुणवर्गाचें अंगीकृत कार्य आहे. जर हे शौर्य तुमच्या ठिकाणी असेल तरच राजकारणी दिवाळखोरांच्या चिखलांतून स्वातंत्र्याच्या लक्ष्यास बाहेर काढूं शकाल. हल्लींच्या अडचणींतून बिनधोक बाहेर पडावयाचें असेल तर भूतकालाविरुद्ध बंड करा! व भविष्यकाळावर विजय मिळवा!

युरोपची ज्या मार्गानें सामाजिक व राजकीय प्रगति झाली, त्याच मार्गानें हिंदुस्थाननें कां जावें असा प्रश्न लोक नेहमीं विचारीत असतात. हिंदुस्तानच्या ठायीं अशी गूढ विशिष्ट आश्चर्यकारक आत्मशक्ति आहे की त्यामुळें राजकीय व सामाजिक प्रगतीचा एक और उपाय शोधून काढतां येईल, आणि आजपर्यंत इतिहासाचे अनुभवानें निश्चित केलेलें नियम खोटे ठरतील, अशी एक निराधार समजूत या प्रश्नाच्या बुडाशीं आहे. भारतीयांचे ‘ कांहीं एक वैशिष्ट्य आहे ’ या खुळ्या समजुतीमुळें हिंदुस्थानची राष्ट्रीय चळवळ बुद्धिवादी विचारपद्धतीच्या फायद्यांना अंचवलेली आहे. या समजुतीमुळें आपण नव्या शास्त्रीय विचारांच्या प्रवाहांपासून दुरावलो आहोंत. हिंदुस्थानानें यूरोपच्या राजकीय व सामाजिक सुधारणेच्या मार्गाचें अवलंबन काय म्हणून करावें? असा सवाल टाकणें म्हणजे, हिंदीजनतेनें मध्ययुगीन अंधकारातून बाहेर कां पडावें? अज्ञानाची गोड झापड हिंदी जनतेनें कां सोडावी? बुद्धिवाद, ज्ञान व माणुसकीचे हक्क यांची हिंदी जनतेस मुळींच गरज नाहीं. आहे त्या स्थितींत तिला समाधान आहे. पण इतिहासाचे कायदे मोडतां येत नाहींत. गुन्हेगारास शिक्षा भोगावीच लागते. हिंदुस्थानास तशी शिक्षा भोगावी लागली आहे. हिंदी जनतेनें आळस झाडून, राहि-

लेली सफर पुरी करण्याकरितां, पुरा दम भरून दौंड केली पाहिजे. राजकीय स्वातंत्र्याचें नजिकच ध्येय गाठण्याकरितां याशिवाय दुसरा उपाय नाहीं.

जुने राष्ट्रीय लोक 'अध्यात्मवाद' हें हिंदुस्थानचें मोठें वैशिष्ट्य म्हणून फार शेखी मिरवीत असतात: खरोखर त्याच अध्यात्मवादानें आधुनिक वैज्ञानिक सुधारणेची सांस्कृतिक आणि स्वातंत्र्यपद अंगें झुगारून दिलीं आहे. बौद्धिक विचारसरणी व मनुष्याच्या मूलभूत हक्काची गरज यांस अध्यात्मिकविचारसरणींत स्थानच नाहीं. आधुनिक सुधारणेंतील भौतिक वादांचा हीन परिणाम म्हणजे भांडवलशाही होय. ही भांडवलशाही मात्र या अध्यात्मवादास चालते. कांहीं दिवसांपूर्वी समाजवादावर वादविवाद झाला होता. त्यांत पुष्कळ राष्ट्रीय लोकांनीं भाग घेतला होता. मुद्दा असा होता कीं, हिंदुस्थानचा आर्थिक प्रश्न समाजवादाच्या स्थापनेशिवाय सुटणार नाहीं. त्याला सगळ्यांनीं कोणत्याना कोणत्या कारणास्तव विरोध केला. एक वक्ते असें म्हणालें कीं, समाजवादाचा भौतिक वादाशीं संबंध असल्यामुळें व आमच्या संस्कृतीस भौतिकवादाचें वावडें असल्यामुळें हिंदुस्थान समाजवादाचा कधींहि स्वीकार करणार नाहीं. दुसरे गृहस्थ म्हणाले कीं, खाजगी मालमत्तेविषयींच्या प्रेमाचीं मुळें आमच्या सांस्कृतिक परंपरेंत फार खोलवर गेली आहेत म्हणून हिंदुस्थान समाजवादाचा स्वीकार करणें शक्य नाहीं.

समाजवाद वस्तुतः सगळ्या खाजगी संपत्तीला विरोध करीत नाहीं. संपत्तीच्या उत्पादनाच्या साधनावरील खाजगी मालकीचा नाश करणें हा खरा मुद्दा आहे. हा खाजगी मालकीचा प्रकार मनुष्यानें मनुष्यास पिळून काढण्याचें साधन आहे. हाच वरिष्ठ वर्गानें दडपलेल्या समाजपद्धतीचा पाया आहे. स्वार्थ, लोभ, अत्याचार आणि सगळ्या तऱ्हेचे अनैतिक दुर्गुण यांचें हीच समाजपद्धति मूळ आहे. म्हणून समाजवादाचा विरोध करणें म्हणजे एका माणसानें दुसऱ्या मनुष्याची पिळवणूक करण्याच्या अधिकाराचें समर्थन करणें होय. ज्यास धोका आहे, त्याचेंच समर्थन केलें जात आहे. मनुष्यानें मनुष्यास पिळून काढण्याची जितकी साधनें आहेत त्या सगळ्या साधनास समाजवादाचा धोका आहे. उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकी व त्यामुळें भांडवल, कारखाने, यंत्रें इत्यादि सगळी लुटीची साधनें होत. 'हिंदी समाजरचनेचा असा एक विशेष आहे कीं, त्यांत उत्पादनाच्या

साधनांवरील खाजगी मालकीमुळें मनुष्यानें मनुष्याची पिळणूक करणें ही गोष्टच अशक्य आहे, ' अशी एक समजून चालित आहे, पण ती अत्यंत भ्रामक आहे. खाजगी मालकीचा आदर हिंदी संस्कृतीच्या अंतरंगांत खोल रुजला आहे असें जर म्हणावयाचें असेल तर, पाश्चिमात्य संस्कृतीइतकीच हीही संस्कृति आध्यात्मिक किंवा जडवादी आहे, असेंच मान्य केलें पाहिजे. असें जर आहे तर आपण मानवी प्रगतीचा मार्ग अडवून कां ठेवावा? मानवजातीनें संपादिलेल्या दौलतीस कां डावलावें? आणि सामाजिक कुचंबणेच्या मागासलेल्या अवस्थेंत राहून पिछेहाट कां करुन घ्यावी? तर मग आपण बौद्धिक गुलामगिरींतून मुक्त होऊं या व त्याचबरोबर राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ति करुन घेऊं या !

## क्रांतिकारक राष्ट्रीयत्वाचा कार्यक्रम.

चालू परिस्थितींत राजकीय व विशेषतः आर्थिक मूलभूत फरक घडवून आणण्याविषयीं दिवसेंदिवस अधिकाधिक जाणीव उत्पन्न होत आहे. या वाढत्या जागृतीशीं सामना करण्याकरितां समाजवादाच्या व साम्यवादाच्या बागूलबोवाचा भीति दाखविली जात आहे. वस्तुतः प्रजासत्ताक क्रांतीनेंच आपणास आज पाहिजे असलेले हे मूलभूत फरक घडून आले आहेत असें इतिहास सांगतो. समाजवादाशीं जें वैर कांहीं लोकांनीं मांडलें आहे, त्यांत ढोंगीपणा आहे. त्यांचें खरें वैर प्रजासत्ताक स्वातंत्र्याशीं आहे. क्रांतिकारक मूलभूत फरक घडवून आणण्यांत कांहीं लोकांकडून जो विरोध होतो तो विरोध केवळ अमूर्त कल्पनांशीं नसावा. येथे आज अजिबात अस्तित्वांत नसलेल्या अशा विशिष्ट परिवर्तनाशीं हें वैर सुरू झालें आहे. समाजवादाची स्थापना होण्यासाठीं अगोदर एका सामाजिक क्रांतीची गरज आहे. ऐतिहासिक विकासक्रमाप्रमाणें पुढील मूलभूत बदल फार पूर्वीच घडून येणें आवश्यक होतें. आतांतरी त्याबद्दल दिरंगाई करतां कामा नये; तो बदल म्हणजे जमीनीची मालकी जमीन करणाऱ्या शेतकऱ्याकडे गेली पाहिजे हा होय. हा समाजवाद नव्हे. ही एक सामाजिक क्रांति आहे. ह्या फरकामुळें केवळ शेतकऱ्याचेंच हित होणार आहे; एवढेंच नव्हे तर एकंदरींत सगळ्या देशाची आर्थिक प्रगति त्यावर अवलंबून आहे. याशिवाय राष्ट्राची आर्थिक परिस्थिति सुधारणेंच अशक्य आहे. ही गोष्ट येथें पुनः बजावून

सांगितली पाहिजे कीं, हा समाजवाद नव्हे. कारण यांत जमीनीची खाजगी मालकी नाहींशी होत नाहीं. बांडगूळ बनलेल्या वर्गाच्या हातांतून उत्पादन करणाऱ्या वर्गाच्या हातांत जमीन देणें, एवढाच याचा अर्थ आहे. म्हणून बागूलबोवामुळें गोंधळून जाऊं नका.

समाजाच्या पुनर्घटनेचा प्रश्न इतक्यांत उत्पन्न करणें बरें नव्हे, असें कित्येक प्रतिपादन करतात ते असें कारण सांगतात–"अगोदर आपण सगळ्या शक्ति राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याच्या कठिण कार्यांत एकत्रित करूं या एकदां हिंदी जनतेस राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालें म्हणजे मग ती जनता आपला सामाजिक प्रश्न आपसांत सोडवील."

या स्तुत्य प्रांजलपणाचा इतकाच परिणाम झाला कीं, राष्ट्रीय स्वातंत्र्याकरतां झगडणाऱ्या शक्तींचें जबरदस्त व संघटित लष्कर बनण्याऐवजीं त्यामध्यें विस्कळितपणा व बेबंदशाही मात्र माजली. आपल्या स्वीकृत कार्याचें महत्त्व ओळखणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या ठिकाणीं इतका प्रांजलपणा असू नये. हा प्रांजलपणा म्हणत नसतात. हे केवळ खेदजनक बुद्धिमांद्याचें लक्षण आहे. जनतेला विशिष्ट ध्येयाकडे नेतां येते. शून्याकडे नव्हे. जनतेस आपण कोठें जात आहों हें बरोबर समजलें पाहिजे. सामान्य जनता ही चळवळीचा प्राण आहे; ती कळत न कळत ज्या गोष्टीकरितां रात्रंदिवस धडपडत असते त्या गोष्टीमध्यें आणि चळवळींतील सामाजिक दृष्टिकोन व तत्वज्ञान यामध्यें जेव्हां अत्यंत विरोध उत्पन्न होतो, म्हणजे जेव्हां ध्येयांत एकंदरींत एकवाक्यता राहत नाहीं अशावेळीं चळवळीच्या उद्देशांतील व ध्येयांतील मूलभूत प्रश्नांच्या चर्चेस व पुरस्कारास पुढारी बगल देतात. अशा उद्वेगजनक स्थितींत अव्वल दर्जाचें ढोंग हे प्रचाराचें एकमेव मार्गदर्शक तत्त्व बनते; आणि चळवळींत निव्वळ बुवाबाजी माजून चळवळ भ्रष्ट होते. पुढारी जनतेची वंचना करतात आणि त्यापैकीं ज्यांना ही गोष्ट कळत नाही ते आपलीच फसवणूक करून घेत असतात.

राष्ट्रसभा जनतेस खात्रीनें साहाय्य करणार आहे असें वारंवार सांगण्यांत येते, परंतु जनतेची दुस्थिती नाहींशी करण्यास कोणते उपाय योजणार याचें अजूनपर्यंत स्पष्टीकरण केलें नाहीं. ऐक्य बिघडूं नये म्हणजे आपमतलबी धनि-

कांना भीति वाटूं नये म्हणून सामाजिक पुनर्घटनेच्या सगळ्या योजना बाजूला टाकल्या आहेत. आपमतलबी धनिकांना नाखूष करतां कामा नये. ही स्वराज्य प्राप्तीची अट आहे असे मानले जात आहे. याचा अर्थ असा होतो कीं स्वातंत्र्याचें ध्येय धनिकांकडे गहाण टाकलें आहे. या धनिकांच्या ध्येयनिष्ठेची मोठ्या अट्टाहासानें बढाई मारली जाते. भविष्यकालीं पुढील परिस्थितींत श्रीमंतांच्या हितसंबंधास बाध येणार असेल तर श्रीमंतांनीं स्वराज्याकरितां काय म्हणून सहाय्य करावें? उलट असेंही म्हणणें त्यांना क्रमप्राप्तच आहे व तसें ते म्हणतातही. अशा रीतीनें स्वराज्याची राजकीय घटना कशा तऱ्हेची राहील व स्वराज्यांतील समाजरचना कशी राहील याबद्दल अत्यंत मुग्धता ठेविल्यामुळें त्याबद्दल गैरसमज कायम राखिला जात आहे. वरील प्रश्न जर ऐतिहासिक विकासक्रमाच्या अनिवार्य घडामोडीच्या ज्ञानाच्या प्रकाशांत सोडविले नाहींत व रूढ राष्ट्रवादाच्या सनातनी पुढाऱ्यांनीं त्या बाबतींत मौन धारण करून त्या प्रश्नांची विल्हेवाट लावली आहे असें मानिलें तर जनतेचें भवितव्य धोक्यांत आहे असें खुशाल समजावें.

समाजवादी कार्यक्रमाचा विरोध करीत असतां, आमच्या पुढाऱ्यास लोकसत्तात्मक क्रान्तीच्या स्पष्ट निश्चित कार्यक्रमाची दिशा जनतेस दाखवितां आली नाहीं. जर समाजवादास उघडपणें विरोध करून व लोकसत्तात्मक क्रांतीबद्दल मूकवृत्ती धारण करून आपल्या पुढाऱ्यांनीं सगळेंच बाद करून टाकिलें, तर शिल्लक काय राहिलें? रूढराष्ट्रवादी पुढाऱ्यांच्या स्वराज्यांत हिंदुस्थानांत लोकसत्ताक राज्यपद्धतीपेक्षां अत्यंत प्रतिगामी स्वरूपाची राज्यघटना आजचे पुढारी अस्तित्वांत आणतील. लोकसत्तात्मक राज्यक्रांतीच्या द्वारें जे जुनाट आर्थिक संबंध नष्ट केल्याशिवाय राष्ट्राची नवी आर्थिक प्रगति व राष्ट्राचा सर्वांगीण उत्कर्ष होणें शक्य नाहीं, ते आर्थिक संबंध कायम राखण्याचा प्रयत्न हें आपले राष्ट्रीय पुढारी करतील. रूढ राष्ट्रवादाच्या आध्यात्मिक तत्वज्ञानानें हा राजकीय कार्यक्रम अगदीं बांधून टाकला आहे. या पुढाऱ्यांच्या स्वराज्यांत राजकीय बाबतींत बाह्यात्कारी फरक मात्र होईल. जे जुनें पुराणे आर्थिक संबंध जनतेच्या दारिद्र्यास, कष्टास, अज्ञानास व अवनतीस मूलतः कारण आहेत, त्या आर्थिक

संबंधाच्या पायावर उभारलेली सामाजिक-आर्थिक पद्धति तशीच कायम राखतील. हें चित्र या पेक्षांही अधिक अमंगळ आहे. वर्गयुद्धाच्या भयंकर द्वेषाचें रूपांतर फॅसिस्ट सर्वाधिकारांत होण्याचा अधिक संभव आहे. रूढ राष्ट्र-वादाचें स्वराज्य हिटलरराज्य बनणार आहे, रामराज्य नव्हें. रामराज्य केवळ पुराणातलें पुराणांतच राहील त्याला खरें अस्तित्व कधींच येणार नाहीं.

हें अमंगळ चित्र आपल्या चळवळींतील अध्यात्मवादाचा न्यायसिद्ध परिणाम आहे. परंतु इतकें असूनही, परिस्थितींत क्रांतिकारक प्रवृत्तीचा जोर इतका जबरदस्त आहे कीं, ती पुढाऱ्यास त्याप्रमाणें सामाजिक-राजकीय कार्यक्रम स्वीकारणें भाग पाडीत आहे. गेल्या कांहीं वर्षांत जनतेनें केलेल्या चळवळींत एका बाजूस परिस्थिति प्राप्त क्रांतीची तीव्र आकांक्षा व दुसऱ्या बाजूस जीर्ण भ्रांतिमय मागासलेलें तत्वज्ञान यांच्यांत झगडा सुरू आहे.

सन १९२९ मध्यें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें पुढीलप्रमाणें जाहीरनामा काढला आहे.

"भारतीय जनतेच्या भयंकर दारिद्रयास व विपत्तीस केवळ परकीय सत्तेनें चालविलेली लूटच कारण नाहीं; तर ही लूट सतत चालू ठेवण्याकरितां परकीय सत्तेनें मुद्दाम कायम राखलेली समाजाची जुनी आर्थिक रचना होय. जनतेचें दारिद्र्य व विपत्ति नष्ट करण्याकरितां आणि जनतेची परिस्थिती सुधारण्याकरितां वर्तमान आर्थिक रचनेंत क्रांतिकारक परिवर्तन करणें अत्यंत जरूर आहे." हें सामाजिक पुनर्घटनेचें ध्येय, बहुजन समाजाच्या हातांत संपूर्ण राजकीय सत्ता प्राप्त झाल्याशिवाय साध्य होणार नाहीं जनतेनें स्थापन केलेलें जनतेचें सरकारच राष्ट्रीय संपत्तीवर घातक, बोंडगूळ बनलेल्या, उत्पादनाच्या दृष्टीनें निरुपयोगी झालेल्या आर्थिक पद्धतींतून राष्ट्रीय अर्थशास्त्रास मुक्त करील. फैजपूरच्या कॉंग्रेसनें हा प्रश्न सोडविला आहे. सत्ता काबीज करण्याकरितां करावयाच्या निर्वाणीच्या लढ्यासाठीं जनता संघटित करण्याचें महत् कार्य फैजपूरच्या कॉंग्रेसनें आपल्यापुढें ठेविलें आहे. परंतु दुर्दैवानें राजकीय स्वातं-त्र्याच्या किंवा सामाजिक पुनर्घटनेच्या मार्गांत आपलें पाऊल यत्किंचितही पुढें पडत नाहीं. याचें कारण जुनी विचारसरणी होय.

जुन्या प्रतिगामी तत्वज्ञानानें आपले हात करकचून बांधून टाकिले आहेत. क्रांतिकारक प्रयत्नास अडथळा करणाऱ्या नैतिक नियमांनीं व धार्मिक ध्येयांनीं आमच्या राजकीय प्रयत्नास अडचण उत्पन्न केली आहे. राजकीय प्रश्न सोडविण्यास योग्य अशा मार्गांत जोपर्यंत आपणांस प्रतिबंध केला जात आहे तो पर्यंत राजकीय प्रश्नाचा नुसता काथ्याकूट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण चक्रकापत्तींत ( Vicious Circle ) सांपडलों आहोंत. इकडे कॉंग्रेसच्या हांकेस अधिकाधिक जनता ओ देत आहे व दुसरीकडे आपण क्रांतिकारक सामुदायिक प्रयत्नाच्या मार्गापासून भ्रष्ट होत आहों. साम्राज्यशाहीनें स्वतःचें डळमळलेलें आसन स्थिर करण्याकरितां आपल्यावर नवी घटना लादली आहे. ही घटना म्हणजे साम्राज्यशाहीचें कपटजाल आहे. ही घटना मोडण्याची प्रतिज्ञा करून गेल्या कायदेमंडळाच्या निवडणुकींत राष्ट्रसभेनें जनतेस मत देण्याची प्रार्थना केली होती. अशाच तऱ्हेची घटना मोडण्याची जनतेची आज्ञा मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या वेळीं मिळाली होती. या दोन्ही प्रसंगीं स्वयंनिर्णयाचें लोकसत्तेचें मूळभूत तत्व हेंच अधिष्ठान होतें. हिंदी प्रजेवरील राज्याचे कायदे करण्याचा ब्रिटिश पार्लमेंटनें स्वतः लुबाडलेला अधिकार आपणास अमान्य आहे, हें आपल्या घटनाविरोधाचें रहस्य आहे. हें एक बंड आहे. याची पुढील पायरी म्हणजे दडपलेल्या हिंदी जनतेचा दडपणाऱ्यांच्या विरुद्ध बंड करण्याचा पवित्र हक्क शाबीत करणें, ही होय. घटना समितीची मागणी हा या बंडाचा झेंडाच होय. या झेंड्याखालीं हिंदी जनतेस एकत्रित करण्याचा आणि पायरीपायरीनें स्वयंनिर्णयाचा हक्क शाबीत करण्याकरितां कराव्याच्या लढ्यांत जनतेस पुढें नेण्याचा निश्चय आपण जाहीर केला आहे. १९२८ सालापासून सुरूं असलेल्या चळवळीचा हाच अर्थ आहे. क्रांतिकारक मागण्यांच्या पायावर उभारलेल्या चळवळीनंतर आपण आज कोठें उभे आहोंत? खरोखर वस्तुस्थिती समजून घेण्याचें धैर्य आपणांस पाहिजे-

राष्ट्रसभावाले नवी घटना मोडण्याच्या इरायानें नव्या घटनेच्या अनुसारानें निर्माण झालेल्या कायदेमंडळांत शिरले आहेत. राष्ट्रीय सभेनें याच इरायानें कायदेमंडळांत शिरण्याचा निर्णय केला आहे. यापुढील धोरण घटनाभंग हें राहिलें नाहीं. असे कांहीं राष्ट्रसभेवाले आहेत कीं, संधि मिळाल्यास, घटना

राबवण्यास ते तयार आहेत. गव्हर्नरांनीं ढवळाढवळ न करण्याचें आश्वासन दिल्यास राष्ट्रसभावाल्यांस जनतेचें पुष्कळच कल्याण करणें शक्य आहे. असें पुष्कळ राष्ट्रसभावाल्यास वाटतें. असे कांहीं कॉंग्रेसवाले आहेत कीं, ज्यांस असें वाटतें कीं नव्या घटनेप्रमाणें जनतेनें निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातीं पुष्कळच सत्ता आली आहे. त्यांना अशी आशा आहे कीं, गव्हर्नरांना असलेले जादा अधिकार, घटना राबवितां राबवितां निरुपयोगी बनतील. असें हें सर्व अत्यंत अमंगळ व भयानक आहे. १९२८ सालापासून आतांपर्यंत जें धोरण धरलें होतें त्याचा परित्याग असा या विचारांचा अर्थ होतो. १९२८ सालापासून आतांपर्यंत राष्ट्रसभेनें हिंदी जनतेचें राजकीय भवितव्य ठरविण्याचा ब्रिटिश पार्लमेंटास अधिकार नाहीं, असें आव्हान दिलें होतें. फैजपूरच्या राष्ट्रसभेच्या ठरावाच्या चिंधड्या केल्या जात आहेत. सत्तेचें क्रमाक्रमानें संक्रमण होणार आहे, अशा निराधार आशेच्या धुक्यांत, राजकीय स्वातंत्र्य प्राप्तीकरितां अविश्रांत युद्धच केलें पाहिजे, अशी दृष्टि लुप्त झाली आहे. क्रांतिकारक जनता संग्रामाच्या विचार सरणीवर नव्या सुधारणावादाच्या अंधकाराचे ढग जमू लागले आहेत. घटना समितीच्या मागणीवर उभारलेल्या नव्या लढ्याच्या युगाचा प्रारंभ होण्याचे ऐवजीं, निवडणुकींत मिळविलेल्या विजयामुळें सहकारिता व शांति यांचे युग सुरू होणें संभवनीय आहे. जोपर्यंत हिंदी जनतेची साम्राज्यशाही लूट करीत आहे तोपर्यंत शांति नांदणें शक्य आहे काय? सहकारिता करावयास योग्य असें कांहीं निमित्त नव्या घटनेत सांपडावें काय? मला वाटतें कीं, असें कांहीं नाहीं. माझे विचार म्हणजे तुमच्याच विचारांचे व भावनांचे प्रतिध्वनि होत. जर खरोखर तुमचे विचार व तुमच्या भावना अशाच असतील तर नव्या सुधारणावादाचा जोरानें निषेध करणें हें तुमचें कर्तव्य आहे. तरुणांनीं विभूतिपूजा सोडली पाहिजे. नुसत्या जहाल बडबडीनें क्रांतिकर्तव्याच्या जबाबदारींतून ते मुक्त होऊं शकणार नाहींत. जनतेस राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याकरितां व जनतेस सामाजिक बंधनांतून मुक्त करण्याकरितां करावयाच्या लढ्याच्या पुढारीपणाची आज्ञा पालनाकरितां धैर्यानें पुढें आलें पाहिजे. या कामाची योग्यता प्राप्त करून घ्या. विचार सरणीची शुद्धि ही पहिली गरज आहे. म्हणूनच मी माझ्या व्याख्यानाचा बराच भाग या मूलभूत प्रश्नास वाहिला

५५६९ नि. ८०५

आहे. हा मुद्दा मी चांगल्या रीतीनें समजावला आहे अशी मला अपेक्षा आहे. तरुणास माझा एकच संदेश आहे; तो म्हणजे बंड करा. रूढी, अंधश्रद्धा, शब्दप्रामाण्य व बौद्धिक गुलामगिरी यांच्याविरुद्ध बंड करा. दूरवर परिणाम घडवून आणणाऱ्या एका महत्वाच्या बंडाचें म्ह० सामाजिक बंडाचें विचारपूर्वक पाठबळ न मिळाल्यामुळें आपलें साम्राज्यशाहीविरुद्ध चाललेलें बंड अयशस्वी होत आहे. तुम्ही सामाजिक बंडाचे ध्वजाधारी पहिल्यांदा बनाल, तरच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा अधिक यशस्वितेनें चालविण्यास लायक व्हाल. जीर्ण तत्वज्ञानाशीं व प्रतिगामी सामाजिक विचारसरणीशीं ज्यांचें लग्न लागलें आहे अशा लोकांपेक्षां, तुम्ही सामाजिक बंडखोर बनलांत तर, राजकीय लढा चालविण्यास अधिक समर्थ व्हाल.

राष्ट्रसभा पक्ष या नात्यानें नव्या सुधारणावादाशीं अंधळेपणानें संबंध जोडीत आहे. कारण, हिंदी जनतेच्या भरभराटीस व प्रगतीस आवश्यक असलेल्या सामाजिक क्रांतीची आकांक्षा या पक्षाच्या राजकीय कार्यक्रमांत विचारपूर्वक प्रतिबिंबित झालेली नाही.

हा नवसुधारणावाद्यांचा अधःपात, त्याचीं कारणें नष्ट झाल्याशिवाय, टळणार नाहीं. राष्ट्रीय क्रांतीचा कार्यक्रम स्पष्ट व मूर्त स्वरूपांत मांडणें जरूर आहे. लोकसत्तेच्या ध्येयानेंच, साम्राज्यविरोधी लढा, प्रेरित व्हावयास पाहिजे. क्रांतिकारक सामाजिक विचारसरणीच्या पाठिंब्यानेंच राष्ट्रीय चळवळ यशस्वी होईल. राष्ट्रीय चळवळीनें सामाजिक क्रांतीस पाठिंबा दिला पाहिजे. कारण त्यावर लोकसत्ताक स्वातंत्र्याची स्थापना अवलंबून आहे. लोकसत्ताक स्वातंत्र्य, डबघाईस आलेल्या जुन्या सरंजामदारी पितृप्रधान समाजधर्माचे अवशेष झाडून टाकल्यावर अस्तित्वांत येईल. हे अवशेष साम्राज्यशाहीशीं साटेलोटे संबंध जोडल्यामुळे वांडगुळासारखे तग धरून राहिले आहेत.

हिंदुस्थानच्या आर्थिक प्रश्नाचें उत्तर भूतकालाच्या पुनरुद्धाराच्या काल्पनिक दिव्ययुगानें किंवा भांडवलशाही औद्योगिक युगाच्या स्वप्नानें मिळणार नाही. आधुनिक उद्योगधंदे तर वाढविले पाहिजेतच राष्ट्रीय संपत्तीचें श्रम हेच एक साधन आहे. श्रमाची उत्पादन शक्ति जितकी अधिक वाढते, त्यामानानें राष्ट्रीय

संपत्तीची वाढ होत असते. हातधंद्यांच्या ऐवजी आधुनिक यांत्रिक उत्पादन-पद्धति दाखल करणें ऐतिहासिक क्रमाप्रमाणें जरूरीचें आहे. राष्ट्रीय भरभराटीस याशिवाय अन्य उपायच नाहीं. आर्थिक भरभराटीशिवाय सांस्कृतिक विकास असंभवनीय असतो. नवीन प्रचंड उद्योगधंद्याच्या वाढीस पुष्कळ अडथळे आहेत ते दूर केले पाहिजेत. हेच राष्ट्रीय लोकसत्ताक क्रांतीचें दुःसाध्य कार्य आहे.

हिंदी समाजाचा शेतकरीवर्ग हा पाया आहे. हिंदी शेतकरीवर्गाच्या आर्थिक दैन्यास कारण असलेले अवजड बोजे नाहींसें करण्याचें कार्य सामाजिक क्रांतीच करूं शकेल. राष्ट्रीय लोकसत्ताक क्रांतीचें हें महान् ध्येय साध्य झालें तरच नव्या उद्योगधंद्याच्या त्वरित विस्ताराचा पाया घातला जाईल. प्रगतीच्या व भरभराटीच्या राजमार्गात राष्ट्रास नेण्यास कशाची जरूरी आहे? शेतकीतील क्रांति म्हणजे जमीनीची मालकी, बांडगूळ अल्पसंख्यांक आयतोबांच्या हातांतून, उत्पादन करणाऱ्या बहुजनसमाजाच्या हातीं जाण्याची आवश्यकता आहे; या करितां जुन्या आर्थिक संबंधांत मुळापासून बदल करण्याचे उपाय अंमलांत आणावयास पाहिजेत. तात्पर्य, श्रमाच्या फळाचा मोठा भाग शेतकऱ्यास मिळेल अशी तरतूद केली पाहिजे. यांत समाजवादाचें असें कांहींच नाहीं. पण यास कट्टर समाजवादी उचलून धरील व त्याकरितां लढेल.

समाजवाद किंवा कम्यूनिझममध्यें उत्पादनाच्या साधनांच्या सामुदायिक मालकीचा मुख्यतः अंतर्भाव होतो हें मी अगोदरच सांगितलें आहे. परंतु उत्पादनसाधनांची सामुदायिक सामाजिक मालकी अस्तित्वांत येण्यास, अगोदर उत्पादनपद्धति सामाजिक बनावी लागते. सामुदायिक सामाजिक उत्पादनपद्धति आधुनिक उद्योगधंदे अतिशय उत्कर्षास पोंहोचल्याशिवाय अस्तित्वांत येत नाहीं. माणसाच्या वैय्यक्तिकपरिश्रमानें खाजगी सम्पत्ति पहिल्यांदा अस्तित्वांत येते. मालकानें केलेलें वैय्यक्तिक परिश्रम हा खाजगी सम्पत्तीचा नैतिक पाया आहे. स्वतःच्या मालकीच्या साधनांनी स्वतःश्रम करून उत्पन्न केलेल्या मालावर स्वतःची मालकी असावी, ही गोष्ट निर्विवाद बरोबर आहे. जेव्हां उद्योगधंदांची प्रगति अशा स्थितींत येऊन पोंहोचते कीं, त्या ठिकाणीं वैय्यक्तिक श्रमानें माल उत्पन्न होत नाहीं, अशावेळीं खाजगी संपत्ति या शब्दाला कांहीं अर्थ रहात

नाहीं. एवंच खाजगी सम्पत्ति, नैतिक हक्क व समाजोपयुक्त संस्था यादृष्टीनें केव्हांही नष्ट केली नाहीं. आर्थिक विकासाच्या एका विशिष्ट परिस्थितींत ती सहज लुप्त होऊन श्रेष्ठ पदवीच्या सामुदायिक मालकीच्या सम्पत्तीस अवसर करुन देते. जेव्हां सम्पत्तीच्या उत्पादनाचे श्रम सामुदायिक होतात, तेव्हां मालकीही सामुदायिकच असणें आवश्यक असते. हजारो मजूर एका औद्योगिक कारखान्यांत एक मोटार निर्माण करतात. श्रम करणाऱ्यांस त्या मोटारीचे तुकडे वाटून देणें वेडगळपणाचें होय. जो पर्यंत कारखाना खाजगी मालकीचा असतो तो पर्यंत ती मोटार ही खाजगी मालकाचीच असणार. वस्तुतः तो सगळा कारखानाच इतर मनुष्यांच्या सामुदायिक परिश्रमचे कार्य आहे म्हणून, खाजगी सम्पत्तीच्या संस्थेस नैतिक व कायदेशीर पाठबळ ज्या कारणानें प्राप्त होतें, त्याच कारणास्तव तो कारखाना ज्यांच्या सामुदायिक श्रमानें निर्माण झाला, त्यांच्या सामुदायिक मालकीचा व्हावयास पाहिजे. भांडवलशाही समाजस्थितीतच उद्योगधंद्यांची यांत्रिकता वृद्धिंगत होते व त्यामुळें सामुदायिक व सामाजिक उत्पादनपद्धति अस्तित्वांत येते; त्याचमुळें भांडवलशाहीच खाजगी संपत्तीचा नैतिक हक्क व आर्थिक स्वरूप नष्ट करते. समाजवाद कायदेशीर हक्काची भ्रांतिमात्र दूर करतो. भांडवलशाहीनें ज्यास ठार मारिलें त्यास केवळ मूटमाती देण्याचें कार्य समाजवाद करतो.

हिंदुस्थानांत हा ठार मारण्याचा कार्यक्रम सुरु व्हावयाचा आहे. म्हणून समाजवाद हा तूर्तचा प्रश्न नाहीं. पुरावयास लागणारे प्रेतच अजून हातीं आलें नाहीं. हल्लींच्या हिंदुस्थानच्या परिस्थितींत व जागतिक आर्थिक मंदीच्या काळांत प्रसिद्ध भांडवलशाहीपद्धतीनें उद्योगधंद्यांची त्वरित वृद्धि होणें अशक्य आहे. औद्योगिक वाढ विशिष्ट प्रमाणांत झाल्याशिवाय समाजवादी अर्थशास्त्रपद्धति अमलांत आणणें शक्य नाहीं. एका नव्या आर्थिक विकास पद्धतीचा अवलंब करण्याची सुसंधि हिंदुस्थानास प्राप्त होणार आहे. सामान्यतः प्रथमतः अत्यंत उपयुक्त उपाय म्हणजे शेतकरीवर्गावरील बोजा अत्यंत कमी करणें व खऱ्या-खरीच्या लोकसत्ताक राज्याच्या साहाय्यानें व त्याच्या आधिपत्याखालीं यांत्रिक उद्योगधंद्यांची वाढकरणें हा होय.

याकरितां दोन महत्वाच्या गोष्टी अमलांत आणिल्या पाहिजेत. ( १ ) जमीनीची मालकी शेत कसणाऱ्यांकडे गेली पाहिजे. ( २ ) सामान्य जनतेच्या हातीं संपूर्णराजकीयसत्ता आली पाहिजे. लोकसत्ताकपद्धतीचा हा पूर्ण कार्यक्रम होय. हा कार्यक्रम निश्चित करण्यांत व त्या करितां लढा लढविण्यांत कुचराई केल्यास नुसत्या स्वातंत्र्याच्या आरडाओरडींत कांहीं तथ्य नाहीं, असेंच उघडकीस येईल. खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे, लोसत्ताक स्वायत्ततेचे व सामान्यजनतेच्या प्रगतीचे जे पुरस्कर्ते असतील त्यांनीं खालील मागण्यांकरितां झगडलें पाहिजे.

( १ ) जनतेनें जनतेचें राज्य स्थापिलें पाहिजे. खऱ्या लोकसत्ताक राज्यांत जनतेस आपल्या अंतिम आधिपत्याचा हक्क कर कमीजास्त करण्याच्या, कराच्या विनियोगाच्या, कायदे करण्याच्या व अम्लदजावणीच्या बाबतींत प्रत्यक्षपणे वापरता येतो. सत्ता कोणाकडे तरी सोपवितां कामा नये. कायदे करणें व अम्मलबजावणी करणें या कार्याकरितां प्रातिनिधिक संस्थांची पिरॅमिडच्या पद्धतीची राज्यरचना व्हावयास पाहिजे. याच पद्धतीनें जनतेस जबाबदार व जनतेचें प्रतिनिधि असणारें सरकार अस्तित्वांत येऊं शकते.

( २ ) यांत्रिक उद्योगधंद्यांच्या द्वारें होणाऱ्या राष्ट्राच्या भरभराटीस आड येणाऱ्या सर्व अडचणी दूरकरणें.

( ३ ) राज्यकारभारास लागणारा खर्च वजा जाता राहिलेलें शेत कसणाऱ्या शेतकऱ्याच्या श्रमाचें फळ त्या शेतकऱ्याच्याच पदरांत पडेल अशा उपायांची योजना

( ४ ) ज्या सवलतीच्या हक्कांच्या योगें व संस्थांच्या योगें लोकसत्ताक स्वातंत्र्यास अडथळा होतो, राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर व्यर्थ बोजा पडतो, व एकंदरींत समाज कल्याणास विरोध उत्पन्न होतो, ते सर्व सवलतीचे विषम हक्क व संस्था नष्ट करणें.

( ५ ) जनतेची सर्वांगीण उन्नति होण्याकरितां, देशांत साठलेली सगळी संपत्ति उद्योगधंद्यांत भांडवल म्हणून गुंतविण्याकरितां व उत्पादन वाढविण्याकरितां निर्माण झालेल्या मालाची योग्य वाटणी करण्याकरितां लागणाऱ्या उपायांचा अवलंब करणें

दीर्घकालपर्यंत मागे पडलेल्या हिंदीजनतेच्या राष्ट्रीय नवजीवनाकरितां करावा लागणारा इतिहासप्राप्त क्रांतिकारक लढा चालविण्याकरितां ज्या कार्यक्रमाचा

आवश्यकता आहे, त्या कार्यक्रमाची ही संक्षिप्त रूपरेषा आहे. हा लढा चालविण्याकरितां राजकीय स्वातंत्र्य प्राप्तीचा व सामाजिक पुनर्घटनेचा हा कार्यक्रम अत्यंत जरुरीचा आहे. हा इतिहासप्राप्त लढा लढण्याचें साधन या नात्यानें राष्ट्रसभेस कार्य करावयाचें असेल, तर तिनें क्रांतिकारक उत्साहाला मूर्त स्वरूप दिलेंच पाहिजे. सामाजिक पुनर्घटनेचा व राष्ट्रीय लोकसत्ताक स्वातंत्र्याचा वरील कार्यक्रम पतकरून त्याच्या अम्मलबजावणीकरितां राष्ट्रसभेस लढलें पाहिजे. असें जर केलें नाहीं तर राष्ट्रसभेस साम्राज्यशाहीशी समेट करावा लागेल आणि तो समेट म्हणजेच 'पूर्ण स्वराज्य' होय, असें स्पष्टीकरण संपकपणानें व ढोंगीपणानें करावें लागेल. एवढेंच नव्हे तर, परंपरागत रूढ राष्ट्रवादाच्या ज्या प्रतिगामी ध्येयवादानें राष्ट्रसभेस स्वराज्य प्राप्तीकरितां करावयाचा क्रांतिकारक लढा संघटित करण्यापासून परावृत्त केलें आहे तोच प्रतिगामी ध्येयवाद फॅसिझमला, सुलतानशाहीला, जन्म देईल. हें प्रतिगामी राष्ट्रवादाचें राक्षसी अपत्य दडपलेल्या व पिळून काढलेल्या गरीब जनतेनें स्वातंत्र्यार्थ चालविलेल्या लढ्यास राक्षसी हिंसक साधनांनीं दडपून टाकील. कांग्रेसनें कोणता मार्ग पतकरावा, हाच आजचा आव्हान करणारा प्रश्न आहे. या प्रश्नाचा निर्णय क्रांतिकारक तरुणांनीं द्यावा. क्रांतिकारक-सामाजिक ध्येयांनीं प्रेरित झालेल्या-स्वातंत्र्याच्या युद्धाच्या बाजूचाच तो निर्णय असेल असा मला विश्वास आहे.

---

# भौतिकवाद व अध्यात्मवाद.

**( भाई मानवेंद्र रॉय यांनीं मद्रास युवक परिषदेपुढें केलेलें अध्यक्षीय भाषण. २९ जुलै १९३७. )**

**( अनुवादक:—जी. आर. इनामदार. )**

युवक परिषदा या अलीकडे नेहमींच भरत असतात. आपल्या देशांतील युवकांच्या जागृतीचें तें एक चिन्ह आहे, असें समजण्यास हरकत नाहीं परंतु या परिषदांच्या कार्याबद्दल मात्र बराचसा गोंधळ आहे. या गोंधळाचें कारण हेंच होय कीं, तरुणांचे एकंदर समाजाशीं काय संबंध असावेत, याविषयीं चुकीच्या

कल्पना लोकांच्या डोक्यांत आहेत. तरुणांना मार्ग दाखविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर पडली आहे अगर मान ज्यांना लाभला आहे अशा मंडळींनीं या चुकीच्या कल्पना प्रसृत केल्या आहेत. युवक परिषदांचे अध्यक्ष आपल्या श्रोत्यांची राष्ट्राचे उद्धारक म्हणून स्तुती करतात. मी तशी तुमची स्तुती करणार नाहीं, अगर तुमच्यापुढील राजकीय व सामाजिक प्रश्न सोडविण्याचा मार्ग न दाखवितां, त्यांविषयीं पोकळ विद्वत्तेचे सिद्धांत मांडीत बसून मी तुमचा वेळही फुकट घालवणार नाहीं.

आपल्यापुढें उभे राहिलेल्या सामाजिक व राजकीय प्रश्नांचे मूळ आपल्या देशाच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमींत आहे. म्हणूनच कांहीं लोकांना वाटतें तितक्या सुलभतेनें आपल्याला ते सोडवतां येणार नाहींत, कुठच्याही वाईट गोष्टीचें उच्चाटन करायचें म्हणजे तिचें मूळ शोधून काढून मुळापासूनच ती उखडून टाकली पाहिजे. याचेंच नांव पुरोगामित्व. 'पुरोगामी तरुण' हे अभिधान ज्यावेळीं तुम्ही पतकरतां त्यावेळीं एक अत्यंत कठीण–व ज्यासाठीं आवश्यक असणाऱ्या विवेचक बुद्धी व मूर्तिभंजक वृत्ती यांच्यामुळें लोकांच्या रोषाला तुम्ही पात्र व्हाल अशा तऱ्हेचें काम पार पाडण्याची–जबाबदारी तुम्ही शिरावर घेत आहांत ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. शिरावर घ्यावयाच्या जबाबदारीच्या मोठेपणाची प्रथमच कल्पना करा. पुरोगामित्व म्हणजे केवळ राजकीय जहालपणा नव्हे. पुरोगामित्व हें एक तत्वज्ञान, क्रांतीचें तत्वज्ञान आहे. क्रांति म्हणजे कांहीं केवळ देशाच्या राज्यकारभारांतील बदल नव्हे. क्रांती अधिक मूलगामी स्वरूपाची असते. क्रांतीनें जुनी समाजघटना जाऊन नवीन समाजघटना अस्तित्वांत येते. प्रत्येक समाजघटनेचें स्वतःचें असें एक तत्वज्ञान असतें. समाजघटनेच्या उच्छेदापूर्वी त्या समाजघटनेच्या तत्वज्ञानाची चिकित्सा सुरू व्हावी लागते. वरच्या दर्जाचे सामाजिक संबंध अस्तित्वांत येण्यासाठीं सर्व नाशास पात्र अशा जुन्या नष्ट होत चाललेल्या समाजघटनेच्या तत्वज्ञानाची चिकित्सा करणें हें पुरोगामी लोकांचें कर्तव्य होय.

हें कार्य जर तुम्हांला चांगल्या रीतीनें पार पाडायचें असेल तर तरुणांच्या चळवळीचा गोंधळ उडविणाऱ्या एक दोन मुद्यांविषयीं तुम्ही नीट समजूत घेतली पाहिजे. एक तर ही गोष्ट ओळखली पाहिजे कीं सर्व तरुणांचा

कांहीं एकजिनसी वर्ग नसतो. आणि म्हणून सर्वत्र तरुणांचें असें एक स्वतंत्र ध्येय असूं शकत नाहीं. आणि तरी देखील असंभाव्य अशा या गोष्टिबद्दल आपण पुष्कळांना नेहमीं बोलताना ऐकतों. या मूलभूत चुकीमुळेंच युवक परिषदा परिणामकारक कार्य करूं शकत नाहीं. कागदावरच राहणारे ठराव पास करणाऱ्या परिषदांचा काय उपयोग?

## युवकांचें समान अधिष्ठान-पुरोगामित्व.

तरुणांचा असा एक वेगळा सामाजिक वर्ग असूं शकत नाहीं. कारण समाजांतील हरएक वर्गांतील व्यक्ती तरुण या वयोविशिष्ट वर्गांत मोडूं शकतात. समाजांतील वर्गांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात, आणि म्हणूनच त्यांचीं उद्दिष्टेंही निरनिराळीं असतात. वयाच्या सारखेपणामुळें हितसंबंधांतील हा परस्परविरोध अगर उद्दिष्टांतील ही भिन्नता नाहींशी होणें शक्य नाहीं. आणि म्हणून युवक चळवळीला वयाखेरीज दुसरें कोणतें तरी समान अधिष्ठान शोधावें लागतें. पुरोगामित्व, म्हणजेच प्रतिष्ठित अशा साऱ्या कल्पनांकडे व उद्दिष्टांकडे चिकित्सक बुद्धीनें पाहण्याची वृत्ती, हेंच तें समान अधिष्ठान होय. पण तरुणांची चळवळ सदोदितच पुरोगामी असते असें नव्हे. ती प्रतिगामी स्वरूपाची असूं शकेल. दुर्दैवानें आपल्या देशांतील बहुसंख्य तरुणांच्या मनावर अद्यापदेखील प्रगतीच्या आड येतील अशाच कल्पनांचा आणि उद्दिष्टांचा पगडा आहे.

पुरोगामित्वाची ध्वजपताका धारण केली तरच तरुणांच्या चळवळीला कांहीं उपयुक्त काम करतां येईल. सांस्कृतिक विकास व आर्थिक भरभराट यांच्या नवीन युगांत पदार्पण करण्यासाठीं ज्या कल्पनांचा आणि उद्दिष्टांचा त्याग करणें अवश्य आहे. त्यांची चिकित्सा या भाषणरूपानें तुमच्यापुढें करावी असें मी योजिलें आहे, तें याचमुळें. माझी चिकित्सा पुष्कळांना आवडणार नाहीं. पण सत्य हें सांगितलें पाहिजे, आणि पुरोगामी तरुणांखेरीज दुसऱ्या कुणाला तें इतक्या चांगल्या रीतीनें करतां येईल ? मी तुमच्या भावनेला आळवणार नाहीं, तर बुद्धीला हाक मारणार आहे. मी तुमच्या मनोवृत्ती हलवणार नाहीं, तर विवेक जागृत करणार आहे. स्वतंत्र हिंदुस्थानचे भावी नागरिक म्हणून जे सामाजिक व राजकीय प्रश्न तुम्हांला सोडवावयाचे आहेत ते सोडविण्याचा मार्ग

स्वतंत्रपणें विचार करून व भावनेपेक्षां बुद्धीची कास धरूनच तुम्हांला सांपडेल, एरवी नाहीं.

पुरोगामी तरुणवर्गानें विवेकवादी बनलें पाहिजे, वास्तववादी बनलें पाहिजे व मूर्तिभंजकत्व स्वीकारलें पाहिजे. भविष्याची घडण करूं पहाणारांनीं भूतकाळाविरुद्ध बंड पुकारलें पाहिजे. परंपरा आणि शब्दप्रामाण्य यांच्याविरुद्ध तुम्ही बंड केलें पाहिजे. तुमच्या विचारसरणींत श्रद्धेची जागा ज्ञानानें पटकवायला हवी. राष्ट्रवाद सफळ व्हायचा तर जुन्याचें पुनरुज्जीवन करण्याच्या कल्पनेला त्यानें मूठमाती दिली पाहिजे.

## हिंदी राष्ट्रवादाची वैचारिक भूमिका.

हिंदुस्थानांतील सर्व पक्षांच्या राष्ट्रवाद्यांमध्यें एक समान गुण जर कोणता आढळून येत असेल तर तो म्हणजे पाश्चिमात्य संस्कृतीबद्दल तिटकारा. प्रतिगामी धर्माभिमान्यांमध्यें हा तिटकारा आढळून आला तर त्यांत नवल नव्हे. कारण, अज्ञान नष्ट करून धर्माचा पाया उखडून टाकणारें शास्त्रीयज्ञान व विवेचक बुद्धि हेंच पाश्चिमात्य संस्कृतीचे विशेष होत. पण नवल वाटतें तें याचें कीं, उदारमतवादी सुधारकांनीं पाश्चात्य संस्कृतीविषयीं तिरस्काराची वृत्ती बाळगून स्वतःची राजकीय व वैचारिकदृष्ट्या कुचंबणा करून घ्यावी. कारण वाचेनें बोलत असलेल्या तत्वांबद्दल जर त्यांना खरोखरच आस्था व प्रेम असेल तर त्या तत्वानुसार आचरण होण्यासाठीं समाजामध्यें जे सामाजिक व सांस्कृतिक बदल व्हावयास हवेत त्यांचा तिटकारा करणें योग्य नाहीं. पुरोगामी धोरणाबद्दल नावाजलेले लोकही देशांतील आजच्या सामाजिक रूढी व संस्था यांवर टीका करतांना पाशवी पाश्चिमात्य संस्कृतीचे आपण चाहते नाहीं, असें अट्टहासानें सांगतात, ह्याचेंही मला नवल वाटतें. पाश्चिमात्य संस्कृतीला अनुषंगिक अशा सामाजिक व राजकीय संस्थांचा प्रसार करतांना देखील हे अर्धवट समाजसुधारक, पाश्चात्य संस्कृतीबद्दल नापसंती व्यक्त करण्याची एकही संधी फुकट दवडत नाहींत. उदाहरणार्थ, युरोप व अमेरिकेंतील स्त्रियांप्रमाणें येथील स्त्रियांनाही स्वातंत्र्य व शिक्षण मिळावें असें त्यांना वाटतें. पण त्यांनीं ‘ जुन्या आर्यस्त्रीचा आदर्श ’ विसरूं नये व स्वातंत्र्याचा ‘ दुरुपयोग ’ करूं नये असेंही त्यांना वाटतें. जाती-

भेद मोडण्यासाठीं ते खटपट करतील, पण जातिसंस्थेवर उभारलेल्या संस्कृतीच्या परंपरेलाही चिकटून राहतील. भांडवलशाहीचे फायदे त्यांना हवेत. पण लोकांनीं पाश्चात्य देशांतल्याप्रमाणें "अधाशी" दनूं नये ही देखील त्यांची इच्छा. धर्माचें अत्यंत गढूळलेलें असें गांवंढळ स्वरूप त्यांना नष्ट व्हायला हवे व जीवनाकडे विवेचकबुद्धीनें पहाण्याची दृष्टी वाढावी, असेंही त्यांना वाटतें; पण प्रयोगसिद्धशास्त्र हेंच एक ज्ञानाचें खरेंखुरें साधन होय, हें मानायला मात्र त्यांची तयारी नाहीं. धर्म 'शुद्ध' स्वरूपांत टिकून रहावा असें त्यांना वाटतें. म्हणजेच गांवंढळ वेडगळ समजुतींना विवेचक बुद्धीचा मुलामा चढविण्यासाठीं त्यांची सारी खटपट. बुद्धिमांद्यास बुद्धिवादाचा पोषाख चढविण्याकरितां सगळी यातायात.

## समन्वयाचा सिद्धांत.

हिंदी समाजाचे कुठें तरी चुकतें आहे असें कुरकुरत कबूल करून जुन्या परंपरेंतून ती चूक सुधारण्याचा मार्ग आढळत नाहीं म्हणून हताश झालेल्यांची देखील ही मनोवृत्ती. मानवी प्रगतीचा उत्कृष्ट परिपाक, असे जे पाश्चात्य संस्कृतीचे फायदे ते अव्हेरणें त्यांना जड जाते पण त्याबरोबरच जुनें सोडून नवें अंगींकारण्याइतकें धाडसही त्यांच्या अंगीं नाहीं. म्हणून ते समन्वयाचा सिद्धांत पुढें मांडतात. प्रगति आणि परागति यांची सांगड घालूं पहातात. 'हिंदुस्थानच्या अध्यात्मिक संस्कृती'च्या पोकळ पायावर एक नवी तकलादी इमारत उभारू पहातात. हिंददेवीच्या पवित्र मंदिरांत पापी पाश्चात्य संस्कृतीला प्रवेश मिळूं देण्यापूर्वी जणू तिला प्रायश्चित्त देऊन पुनीत करण्याचा त्यांचा प्रयत्न. पापी पाश्चात्य संस्कृती अजिबात टाकून द्यावयाची नाहीं, कारण तिच्यापासून अनेक भौतिक फायदे मिळतात. पण पौर्वात्य अध्यात्मवादाचा मुलामा देऊन तिला अगोदर पावन करून घ्यावयाचे. 'अध्यात्मिक साम्राज्यवाद' असें जिचें वर्णन करतात अशा या चमत्कारिक कल्पनेच्या मोठ्या अभिमानानें गोष्टी बोलणाऱ्या लोकांना आपण काय बोलतो हेंच मुळीं समजत नाहीं. तात्त्विक ज्ञानाचा मोठा आव आणून ते हा समन्वयाचा सिद्धांत लोकांपुढें मांडतात. पण खरें पाहिलें तर हे जी गोष्ट करू पहातात ती एक अशक्य अशी गोष्ट आहे. दोन परस्परविरोधी अशा विचारपद्धति व संस्कृति यांचा मिलाफ करणें शक्य नाहीं.

कारण दोघांमध्यें उत्तर दक्षिण ध्रुवांइतकें अंतर आहे एवढेंच नव्हे, तर शतकांचें अंतर असलेल्या दोन भिन्न ऐतिहासिक कालखंडांत त्यांची उत्पत्ति झालेली आहे.

तत्वज्ञानाच्या भाषेंत बोलायचे झालें म्हणजे समन्वय म्हणजे एका विवक्षित वस्तूच्या विनाशांतून निर्माण झालेलें नवीन मूल्य होय. पदार्थविज्ञान शास्त्राच्या दृष्टीनें संयुक्तमिश्रणानें (compound mixture) समन्वयाचा उदय होतो. ती एक अजिबात नवीन वस्तू असते, जे जुने घटकावयव तिच्यामध्यें समाविष्ट होतात त्यांच्यापेक्षां अजिबात वेगळी अशी ती वस्तू असते. म्हणून पाश्चात्य संस्कृतीचा समन्वय निर्माण करावयाचा झाला, तर त्या संस्कृतीतील मानवजातीला उपकारक अशीं जीं मूल्यें आहेत त्यांच्यावर आधारलेली एक नवीन संस्कृतीच निर्माण करावी लागेल. दुसऱ्या शब्दांत हाच आशय असा सांगतां येईल कीं भांडवलदारी संस्कृतीनें निर्माण केलेलीं कल्याणप्रद मूल्यें घेऊन वरीष्ठ दर्जाची एक नवीन संस्कृति निर्माण केली पाहिजे. जे हिंदी लोक समन्वयाची भाषा बोलतात त्यांना मात्र यापेक्षां अजिबात वेगळा असा प्रकार साधायचा असतो. त्यांची सूचना अशी कीं पाश्चात्य संस्कृतींतील 'चांगला' असा भाग घेऊन त्याचा जुन्या हिंदी धार्मिक पैतृक संस्कृतीशीं मेळ घालवा. 'चांगला' या शब्दाचा अर्थ पुरोगामी असा केला तर भांडवलदारी संस्कृतीच्या दोन स्वरूपांना 'चांगला' हे विशेषण लावतां येईल. एक स्वरूप विध्वंसक होय. मध्ययुगीन सरंजामदारी सामाजिक व्यवस्था व त्या युगांतील धार्मिक विचारसरणी यांचा विध्वंस करून भांडवलशाहीनें एक 'चांगले' कार्य बजावलें आहे. दुसरें 'चांगलें' कार्य विधायक स्वरूपाचें—म्हणजे हें होय कीं, भांडवलशाहीने उद्योगधंद्यांची वाढ एवढ्या मोठ्या प्रमाणांत केली कीं समाजाला प्रगतीची वरची पायरी गाठणें शक्य झालें आहे. भांडवलशाहीचें विध्वंसक स्वरूपाचे 'चांगलें' कार्य आणि परंपरागत हिंदी संस्कृती यांचा मेळ घालणें शक्य नाहीं. कारण ज्या समाजपद्धतीशीं ती संलग्न झालेली आहे ती समाजपद्धत नाहींशी करणें हें तर भांडवलशाहीचें इतिहासदत्त कार्य. म्हणून समन्वय कल्पनेचे पुरस्कर्ते पाश्चात्य संस्कृतींच्या या 'चांगल्या' कार्याचे अभिनंदन करतील, ही गोष्ट संभवनीय नाहीं. भांडवलशाहीचें हें कार्य

'चांगलें' आहे अशी कबूली देणें म्हणजे पाश्चात्य संस्कृतीचा पुरेपूर अंगीकार करणें होय. त्यानंतर मग 'समन्वया' च्या पांडित्यपूर्ण गोष्टी बोलण्याचें कारण नाहीं. जे भांडवलशाहीच्या या विध्वंसक अशा 'चांगल्या' कार्याचा बिनतक्रार पुरस्कार करूं शकत नाहींत त्यांना तिच्या विधायक स्वरूपाच्या 'चांगल्या' कार्याचा, म्हणजेच उद्योगधंद्यांच्या वाढीचा, अंगीकार करणें व त्याचा उपयोग करून घेणेंही शक्य होणार नाहीं.

## भांडवलशाहीचें ऐतिहासिक कार्य

हिंदी लोक पाश्चात्य संस्कृतीवर टीका करतात याचा अर्थ असा नव्हे कीं भांडवलशाही त्यांना नको. हिंदी राष्ट्रवादी भांडवलशाहीचा अव्हेर करीत नाहींत. भांडवलशाहीचे खरेखुरे दोष–आजच्या अवनतीच्या काळांतील तिचे प्रतिगामी अवनतीकारक लांछनास्पद स्वरूप–यांच्यावर त्यांच्या टीकेचे प्रहार होत नाहींत. भांडवलदारी संस्कृतींत जें चांगलें आहे त्याचाच नेमका ते अव्हेर करतात. संस्कृतीच्या दृष्टीनें विचार व प्रयोग या दोन्ही क्षेत्रांतील शास्त्रीय ज्ञानाची प्रचंड वाढ हा भांडवलशाही युगाचा अत्यंत महत्वाचा परिणाम होय. या शास्त्रीय ज्ञानाच्या विकासामुळेंच युगायुगांच्या धार्मिक गुलामगिरीच्या पाशांतून मनुष्याची सुटका होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे.

नंतरच्या काळांत मनुष्य समाजाची ही अध्यात्मिक उन्नति थांबविण्याचा भांडवलशाहीने जो पद्धतशीर व नेटाचा प्रयत्न केला तो भांडवलशाहीचा अत्यंत महत्वाचा असा दोष होय. जरूर पडेल तेव्हां धर्माला नवीन स्वरूप देऊन, धर्मकल्पनावादी तत्वज्ञान व त्याच्याशीं संलग्न असे प्रतिगामी तात्विक विचार यांचा पाठपुरावा व प्रचार करून भांडवलशाहीनें हें काम केलें. आणि तेंही अशावेळीं कीं ज्यावेळीं शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीमुळें जुन्या युगाचे हे अवशेष नष्ट होत होते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, हिंदी राष्ट्रवाद्यांच्या दृष्टीनें पाश्चात्य संस्कृतीचा सर्वांत मोठा दोष कोणता असेल तर तो म्हणजे 'भौतिकवाद.' खरें पाहिलें तर परिस्थिति अजिबात वेगळी आहे. आज हिंदी राष्ट्रवाद्यांइतकीच पाश्चिमात्य देशांतील सत्ताधारी वर्गांना भौतिक तत्वज्ञानाची धास्ती वाटत आहे. त्याचें कारण असें कीं, भौतिक तत्वज्ञान हें मनुष्यजातीच्या आध्यात्मिक उन्नतीच

अमोघ साधन आहे. पुराण काळांतील महनीय विचारवंतांनीं भौतिकवाद निर्माण केला. परंतु त्याचें ओबडधोबड स्वरूप घासूनपुसून सुरेख करण्याचें कार्य भांडवलशाहीच्या वाढीमुळेंच होऊं शकलें. प्रगतीचा पुरस्कार करणाऱ्या व स्वातंत्र्यासाठीं झटणाऱ्या सगळ्या लोकांनीं मानवजातीच्या इतिहासांतील अत्यंत तेजस्वी भाग म्हणजे पाश्चात्य सुधारणा होय असें मानिलें पाहिजे. जुन्यापुराण्या जीर्ण संस्कृतीस चिकटून बसलेल्या पक्क्या प्रतिगामी लोकांनाच मनुष्यजातीच्या प्रगतीच्या ह्या भव्य मनोऱ्याची विशालता मान्य होणार नाहीं.

## हिंदुस्थानचे अध्यात्मिक बुद्धिवैभव.

हिंदुस्थानच्या असामान्य आध्यात्मिक बुद्धिमत्तेचा अनेक लोक गौरव करीत असतात, परंतु हिंदी संस्कृतीचें वर्चस्व सिद्ध करून दाखविण्याचा कोणीच प्रयत्न करीत नाहींत. ती एक केवळ अंधभक्तीची बाब झालेी असून, ते एक स्वयंसिद्ध सत्य आहे असे मानण्यांत येते. परंतु तत्त्वज्ञानाचा बारकाईनें अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यानें, हिंदु संस्कृतीच्या आध्यात्मिक स्वरूपाला कांहीं ऐतिहासिक आधार आहे किंवा नाहीं, या प्रश्नांची चौकशी करणें जरूर आहे. आणि अशा रीतीनें चौकशी केली असतां, आध्यात्मिक संस्कृती हे आमचे वैशिष्ठ्य आहे असे जे मोठ्या अभिमानानें सांगण्यांत येतें ते खरे नव्हे ही गोष्ट सहज कळून येण्यासारखी आहे.

अध्यात्मवाद अगर धार्मिक विचारपद्धती, ही मानव समाजाच्या विकासांत एका विशिष्ट काळांत सर्वत्र दिसून येणारी अशी एक **सामान्य अवस्था** आहे. आपल्या भोंवतालच्या सामाजिक परिस्थितींत स्थित्यंतर घडून आलें असतां, त्यावेळच्या विचारपद्धतींतहि बदल होत असतो. हा सामाजिक उत्क्रांतीचा अगदीं एक साधा नियम आहे. त्यामुळें अमुक एक विचारसरणी, एखाद्या देशाचे चिरंतन वैशिष्ठ्य आहे असें म्हणणें संयुक्तिक होणार नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रांनीं, जिर्ण झालेली पुरातन व टाकाऊ बनलेली एखादी विचार पद्धति सोडून देऊन नवीन विचार प्रवाहांना वाट दिल्यामुळें, पाश्चात्यांचा नैतिक अधःपात झाला आहे असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. किंवा आम्ही अद्याप त्याच पुरातन विचारमालिकेला कवटाळून बसलों आहोंत म्हणून आमचा आध्या-

त्मिक दर्जा श्रेष्ठप्रतीचा ठरत नाहीं. त्यामुळें फक्त एकच गोष्ट सिद्ध होते व ती म्हणजे ही कीं, निसर्गावर वर्चस्व स्थापन करण्याच्या मानवी प्रयत्नामुळें झालेली संस्कृतीची वाढ व मिळालेलें ज्ञान, याच्या योगानें पाश्चात्य लोक बुद्धिगामी व तर्कशुद्ध विचारसरणीला जास्त महत्त्व देतात. अंधश्रद्धा, केवळ मानासिक विचार व **दार्शनिक कल्पनातरंग** यांना पाश्चात्य देशांत स्थान नाहीं. यावरून हेंच सिद्ध होतें कीं, मनुष्यप्राण्याच्या विद्यमान परिस्थितींत फेरबदल झाला असतां, विचारक्रांतीहि होत असते. तशा तऱ्हेचे फेरबदल हिंदुस्थानच्या सामाजिक परिस्थितींत घडून आले नसल्यामुळें, धर्मावर आधारलेली विचार परंपरा अद्यापपर्यंत हिंदुस्थानांत कायम असल्याचें दिसतें. आधुनिक शास्त्राच्या झालेल्या प्रगतीमुळें पाश्चिमात्य जगांत **धार्मिक विचारपद्धति कोलमडून पडली**. पाश्चात्य राष्ट्रांत झालेल्या क्रांतिकारक सामाजिक स्थित्यंतरामुळें, त्यांच्या व आपल्या विचारसरणींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. हिंदुस्थानांतील परिस्थितींत तशाच स्वरूपाचा पालट झाल्यावर आज दिसून येणारे हें अंतर नाहींसें होईल यांत तिळमात्र शंका नाहीं. अंधश्रद्धेचें युग लयाला जाऊन, तर्कप्रधान विचारसरणीचा उदय होईल.

हिंदुस्थानच्या आध्यात्मिक बुद्धिवैभवाची तारीफ करणारे लोक कदाचित् असे सांगतील कीं, ही परिस्थिती टाळण्याचे तर आम्ही जाणूनबुजून प्रयत्न करीत आहोंत. पाश्चात्य राष्ट्रांत ज्या प्रकारचा फेरबदल झाला तशा प्रकारची उलथापालथ हिंदी समाजजीवनांत झाली नाहीं, हाच आमच्या आध्यात्मिक संस्कृतीचा विशेष आहे असेंहि सांगण्यास हे लोक मागेपुढें पाहणार नाहींत. आम्ही आध्यात्मिक संस्कृतीचे चहाते आहोत म्हणून तर आम्ही ऐहिक सुखाकडे कानाडोळा केला आहे.

वरील म्हणणे ठीक आहे पण पाश्चात्य राष्ट्रे ज्या आडमार्गाने गेली तो मार्ग हिंदुस्थानच्या लोकांनी खुशीने टाळला आहे काय? आमचा अध्यात्मिक हिंदुस्थान या मोहाला अजूनही बळी पडत नाहीं हें खरे कां? प्रचलित वस्तुस्थितीबद्दल व ऐतिहासिक सत्याची ज्याला काडीइतकी तरी चाड असेल, तो प्रत्येक माणूस वरील प्रश्नाला **नकारात्मकच उत्तर** देईल ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे.

आपली राष्ट्रीय चळवळ व हिंदी जनतेला राष्ट्रीय स्वातंत्र्याची लागलेली तळमळ, यावरूनसुद्धां हेंच अनुमान काढतां येईल कीं, इतर अनेक देशांप्रमाणेंच हिंदुस्थानसुद्धां ऐहिक सुखप्राप्तीकरतां अविरतपणें झटत आहे. गेल्या कित्येक शतकांत झालेल्या सामाजिक प्रगतीमुळें, पाश्चात्य देश पुढें गेले असून, त्यांची व आपली फारकत झाली आहे. ही परिस्थिती बदलून पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीनें हिंदुस्थानची प्रगती व भरभराट व्हावी या उद्देशानें आपण राष्ट्रीय स्वातंत्र्याकरतां लढत आहोंत. हिंदुस्थानच्या पुरातन आध्यात्मिक संस्कृतीला जी गोष्ट वावडी आहे, नेमकी तीच गोष्ट मिळविणें हे हिंदुस्थानच्या **राष्ट्रवादाचे ऐतिहासिक कार्य** आहे. आणि तसे जर नसेल तर आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीला काडीमात्र अर्थ नाहीं. ऐहिक सुखाची आभिलाषा व देशाची सर्वांगीण प्रगती व्हावी अशी जर आपली इच्छा नसेल तर गुलामगिरीचा टिळा कपाळीं लावून व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या परिस्थितीत खिचपत राहून आपण आपल्या आध्यात्मिक उच्च संस्कृतीचे व धार्मिक मनोवृत्तीचे प्रदर्शन करूं या! एकतर तुमची आध्यात्मिक वृत्ती हे ढोंग आहे, किंवा तुमचा राष्ट्रवाद चुकीचा आहे'

मानवी जीवनाच्या शारीरिक गरजा भागविणें यालाच जर भौतिकवाद असे म्हणावयाचे असेल तर जगांतील कोणत्याहि जातींतील लोकांच्या इतकेंच हिंदुस्थानातील लोक आधिभौतिक विचार प्रवृत्तीचे आहेत. जीवंत राहणें व प्रजोत्पादन करणें हा प्रत्येक प्राणिमात्राचा अगदीं **सर्व सामान्य गुणधर्म** आहे ही गोष्ट कोणाहि विचारी व समंजस माणसाला नाकबूल करतां येणार नाहीं. मनुष्य प्राण्याला बुद्धिदेवता प्रसन्न असल्यामुळें, ही नित्याची शारिरिक कृत्यें चांगल्या रीतीने पार पाडतां यावींत, म्हणून तो अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याकरतां धडपड करीत असतो. व अशा त-हेची अनुकूल परिस्थिती निर्माण करून त्यांत **दिवसेंदिवस सुधारणा** घडवून आणण्याची पात्रता मनुष्यप्राण्यांत असल्यामुळें त्याला जनावरापेक्षां जास्त वरचा दर्जा प्राप्त झाला असून, सर्वश्रेष्ठ समजण्यांत येते. वरील म्हणणे अमान्य करणे म्हणजे गुहेमध्यें राहणाऱ्या रानटी माणसाचे जिणे आदर्श व नमुनेदार आहे असे म्हणण्यासारखेंच आहे. सुखावह जीवन हे शारीरिकदृष्ट्या आवश्यक आहे ही गोष्ट एकदा कबूल केल्यास

सुखसंपादनाला कांहीं एक मर्यादा घालण्याचा प्रयत्न हा कृत्रिमच ठरतो. जिवंत राहण्याची तीव्र इच्छा, प्रजोत्पादनाची नैसर्गिक प्रवृत्ति व जगातील ऐहिक सुखाची लालसा या गोष्टी मानवी जीवनाला आवश्यक आहेत.

**चार पुरुषार्थः**—धर्म ग्रंथांत मानवी जीवनाचे ध्येय धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चतुर्विध स्वरूपाचें आहे असें सांगितलें आहे. धर्म व मोक्ष यांच्या दुहेरी कप्यांत लपवून ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी अर्थ व काम, यांचा अर्थ व स्वरूप बदलूं शकत नाहीं. अर्थ म्हणजे जगांतील सुख साधनांचे संपादन व काम म्हणजे वैषयिक वासनांची पूर्ती, या दोन गोष्टी केवळ धर्मसंमत आहेत इतकेंच नव्हे तर त्यांचा दर्जा धर्म व मोक्ष त्यांच्याहून मुळींच कमी प्रतीचा नाहीं. महाभारतांत धर्माची व्याख्या फारच सुबोध व विस्तृत अशी दिली आहे. अर्थ व काम ह्यांची उत्पत्ती धर्मातूनच झाली आहे, असें आपण महाभारतांत वाचतो.

वरील महत्वपूर्ण उद्गार **महर्षि व्यास** यांच्या अधिकारयुक्त वाणींतून बाहेर पडले आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यांसारखी आहे. महान् ऋषींचा धार्मिक दंडक असा आहे, 'तुम्ही धर्माचे परिपालन करा म्हणजे जगांतील सर्व सुख तुम्हाला मिळेल.' धर्मपालनामुळें, आत्म्याला मोक्ष मिळून, सद्‌गती प्राप्त होईल, असे वेदकालीन धर्म मार्तंडांचे सांगणे नाहीं, तर जगांतील सर्व सुखसमृद्धीचा उपभोग तुम्हाला घेतां येईल असेंच त्यांनीं सांगितलें आहे. असे असतांना, ऐहिक सुखोपभोगाची लालसा, हे पाश्चात्य संस्कृतीचे गमक आहे असें कोणाला बरें म्हणतां येईल? याच बाबतींत महाभारतांत याहिपेक्षां जास्त मजेशीर माहिती मिळते. धर्माची शिकवण वरीलप्रकारची आहे, असें सांगून 'मी सांगतों तिकडे कोणीच लक्ष देत नाहींत,' म्हणून व्यासांनीं खेद प्रदर्शित केला आहे. यावरून आध्यात्मिक संस्कृतीच्या या भरतखंडात सुवर्ण युगांत सुद्धां **अर्थ व काम यांचा हव्यास** मनुष्यप्राण्यानें धरूं नये असे बंधन धर्मानें घातले नव्हतें हेंच सिद्ध होते. कामवासनेबद्दल ब्रम्हसूत्रभाष्य काय म्हणतें ते आतां पाहा! 'लहानपणी मनुष्यमात्रांत वैषयिक वासना, ही बीजरूपाने असते व तो वयांत आल्यावर ती जास्त स्पष्ट व उघडपणे दिसून येऊं लागते' वैषयिकवासना

ही स्वाभाविकच असल्यामुळें विषयोपभोगानें ती तृप्त करणें जरूर आहे. धर्मानें त्याला आडकाठी केली नाहीं. योग्य विषयवासनांच्या रूपानें परमेश्वर मनुष्याच्या ठिकाणी वास करतो. असे भगवद्गीतेंत सांगितले आहे. व योग्य किंवा समंजस इच्छा म्हणजेच धार्मिक प्रवृत्ती. या ठिकाणी धर्म याचा अर्थ सामाजिक नीतिनियम असा असून, ते ठरविण्याकरितां, ( मानव प्रगतीच्या एका विशिष्ट काळांत ) एखाद्या काल्पनिक पवित्र व स्वर्गीय शक्तिचा आधार घेतला जात असतो. प्रचलित समाज व्यवस्थेंत रूढ असणारी कांहीं सामाजिक बंधनें पाळून, माणसानें ऐहिक सुखसमृद्धीचा फायदा घ्यावा व आपल्या वैषयिक वासना भागवाव्यात असेंच हिंदीसंस्कृतीच्या **नीतिनियमांचें सार** आहे. जगांतील सुधारलेल्या इतर कोणत्याहि देशांतील लोकांच्या आचार विचार अगर चालरीती पेक्षां हे नियम कांहीं विशेष आध्यात्मिक किंवा कर्मा आधिभौतिक स्वरूपाचे आहेत काय? माणसानें गजबजलेल्या हमरस्त्यावर दरोडा घालून पैसा मिळविणें अगर डोंगरांतील गुहेंत राहणाऱ्या रानटी माणसाप्रमाणें आपली सहचारिणी हुडकून काढणें, या मार्गाचा अवलंब ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील लोक आज करीत नाहींत, त्याप्रमाणें पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोकहि करीत नांहींत हे सांगायला कां पाहिजे? अर्थ व काम या व्यवसायांत निमग्न राहण्याचे बाबतींत पाश्चात्य लोकांनाही कांहीं सामाजिक निर्बंध पाळावेच लागतात. व आपल्या नैसर्गिक इच्छाशक्तींना मर्यादित करण्याकरतां तें बंधनें पाळतात, त्याला धर्म हीच संज्ञा आहे. मग त्याला धार्मिक दंडक म्हणा, नीती नियम समजा, अगर सामाजिक कायदे असे नांव द्या. एक गोष्ट नक्की कीं, पाश्चात्यांचे आचार-विचार हे बायबलमध्यें सांगितलेल्या दहा सूत्रांनीच गोंवलेले आहेत.

बरें मरणानंतर पुनर्जन्म आहे अगर नाहीं किंवा आत्म्याला मुक्ति मिळतें किंवा कसे, याबाबतींत युरोपियन व अमेरिकन लोक पाखंडी मताचें आहेत व आमची मात्र या गोष्टींवर पूर्ण श्रद्धा आहे असे म्हणणें आहे. आत्म्याची भेट हे ख्रिस्ती धर्माचे आद्य तत्व आहे व आपल्यापेक्षां युरोपियन लोक हे जास्त सुशिक्षित असल्यामुळें, त्यांच्या धर्माचे पालन ते जास्त चांगल्या रीतीनें करूं शकतात. एक सवय म्हणूनच हिंदू लोक धर्मपालन करीत असतात. व त्यामुळें आमच्या धार्मिक कल्पना म्हणजें केवळ अदभुत पौराणिक गोष्टींचे थोतांड बनलें आहे.

कोणताहि निःपक्षपाती मनुष्य, हें हिंदुस्थानच्या आध्यात्मिक श्रेष्ठतेचे लक्षण आहे असें म्हणणार नाहीं. सर्व सामान्य हिंदूमनुष्याच्या धार्मिक आचार विचारांत मोक्षाचा जवळ जवळ **संपूर्ण लोप झाला** आहे असे आढळून येते. अर्थ म्हणजेच जिवंत राहण्याकरतां, आवश्यक गरजा मिळविणें; यांतच त्याच्या जीवाची आटाआट होत आहे. व जीवनाच्या या निराशामय वातावरणांत अत्यंत नीरस स्वरूपाची वैषयिक वासना म्ह. काम उचल खात असतांना दिसून येते. जुन्यापुराण्या जातिसंस्थेच्या डबघाईस आलेल्या सार्वजनिक रूढी व जुलमी कायदे यावर अधिष्ठित झालेली परकीय ब्रिटिशसत्ता, यांनीं सध्या धर्माची जागा पटकावली आहे.

सत्याची थोडी जरी चाड राखून इतिहासाचे सूक्ष्म अवलोकन केले तरी आपल्या प्रत्ययाला हीच गोष्ट येते, कीं हिंदुस्थानमधील बहुसंख्याक जनता आज आयुष्याच्या अगदी निकडीच्या अशा शारीरिक गरजा भागविण्याच्या झटापटीतच अगदी गूंतून गेली आहे. आणि कोणत्याहि देशाची संस्कृती, त्या त्या देशांतील जास्तीत जास्त लोकांच्या आचार विचारावरूनच ठरत असते. मूठभर पढत पंडितांनीं कांहीं तत्वांचा उदो उदो करण्यास सुरवात केली तरी त्यावरून सामान्य जनतेच्या विचारसरणींची कल्पना होत नसतें. इतकेंच काय पण **अशी कल्पनामय तत्वे** लोकांच्या गळी उतरविण्याचा उपद्व्याप करणारे लोक सुद्धां आकाशाच्या पोकळींतून खाली उतरतांना दिसतात व मग त्यांना व्यावहारिक हालचालीचे चट्टे चपाटे बसल्या खेरीज रहात नाहींत. उदाहरणार्थ आमचा विद्यार्थी वर्गच पहाना! त्यांच्या पैकीं कित्येकांना अगदी मनापासून असे वाटत असेल कीं हिंदुस्थान, अखिल जगाला कांहीं तरी एक दिव्य असा आध्यात्मिकतेचा संदेश देणार आहे. हिंदुस्थानच्या आदर्श जीवनाची ते वाहवा करीत असतांना कोणाला हार जाणार नाहींत, त्यागाची भावना, कार्याची कळकळ, मनाचे मांगल्य वगैरे उदात्त गुण, हिंदी संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे असे ते समजत अतील.

**भौतिकवादानें जर्जर झालेल्या** जगाला या आपत्तीतून सोडविण्याची अनुपमेय कामगिरी करण्याचे भाग्य हिंदुस्थानला लाभले आहे असे मानून त्या कार्याला हातभार लावण्यास ते तत्पर राहतील. या सर्व गोष्टी दिसायला खरो-

खर किती सुंदर आहेत, परंतु आमचे हिंदुस्तानमधील विद्यार्थी प्रत्यक्ष ध्येयाच्या मागे लागलेले दिसतात कां? कांहीं तरी जुजुबी शिक्षण घ्यावयाचें व तें कशाकरितां, ज्ञानसंपादन करण्याकरतां नव्हे तर त्याला जगाच्या बाजारांत कांहीं किंमत येते कीं काय, एवढ्याच करतां. शिक्षणक्रम संपल्यानंतर संसार थाटून शारीरिक गरजा भागविण्याची ऐपत यावी व जीवनाच्या चाकोरींतून आयुष्याचे रहाटगाडगे पुढें ढकलतां यावे म्हणून लायक बनण्याकरतांच ना हा सगळा खटाटोप! मग याला तर उच्च आध्यात्मिक संस्कृतीचा ना वास ना गंध.

## भांडवलशाही व भौतिकवाद

कांहीं लोक असेहि आहेत कीं ज्यांना भौतिकवाद व भांडवलशाही यांत मुळींच फरक वाटत नाहीं व ते म्हणणें घटकाभर खरे आहे असे मानले तर भौतिकवाद म्हणजे एक पाश्चात्य राष्ट्रांत पैदास झालेली चीज आहे असे शिंतोडे उडवितां येत नाहींत. भांडवलशाही ही एक विशिष्ट स्वरूपाची आर्थिक पद्धती एका मोठ्या ऐतिहासिक कालांत विकसित झाली. जरी कांही कारणामुळें भांडवलशाहीची भरभराट फक्त जगांतील कांहीं भागांत झाल्याचे दिसून येत असले तरी तिची बीजे जगांतील सर्व देशांत थोड्याफार प्रमाणांत पसरली आहेत. हिंदुस्थान या पद्धतीपासून अलग राहिला नाहीं. उलट पाश्चात्य राष्ट्रांच्या आधीपासूनच हिंदुस्थानला हा रोग जडला आहे. आधुनिक युरोप खंडाचें पूर्वज हे ज्यावेळीं नागडेउघडे भटकत होते त्यावेळेपासूनच हिंदुस्थानांत व्यापार व हस्तव्यवसाय यांची चलती होत होती. याचा अर्थ काय होतो? ज्या वेळेला युरोपातील लोक मागासलेल्या सामाजिक व सांस्कृतिक विचारसरणीला चिकटून, आध्यात्मिक प्रवृत्तीच्या छत्राखालीं वावरत होते त्या वेळेला हिंदुस्थान भौतिक प्रगतीचा मार्ग आक्रमण करीत होता. मध्ययुगाच्या आध्यात्मिक अंधारांत युरोप ज्यावेळीं झोपीं गेला होता त्यावेळींच आपण भौतिकवादाच्या भेसूर मगरमिठींत सांपडलों होतो. युरोपनें या क्षेत्रांत उडी घेण्याच्या अगोदरच हिंदुस्थान पैशाच्या व नफेबाजीच्या पापी मोहजाळांत गुरफटून गेला होता.

हिंदुस्थानातील आध्यात्मिक प्रवृत्तीच्या लोकांना या पापी लालसेची लाज वाटत नाहीं. या धनलालसेला पवित्र व सोज्वळ स्वरूप देऊन, भांडवलदार व

कामगार यांचा सुखावह सुंदर मिलाफ करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. निराळ्या शद्बांत सांगायचे झाल्यास त्यांना भांडवलशाहीला आध्यात्मिक स्वरूप द्यावयाचे आहे. आणि भांडवलशाही, म्हणजेच जर भौतिकवाद असेल तर याचा अर्थ असा होता कीं त्यांना भौतिकवादाला आध्यात्मिकतेंत विलीन करावयाचे आहे. अर्थात्च हे अशक्य व मूर्खपणाचे आहे. विचारपद्धतींत गोंधळ झाल्यामुळें, कानाला गोड लागणाऱ्या शब्दजाळांत गुरफटून गेल्यामुळें हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकांनाहि अव्यवहार्य अशा गोष्टींचा हव्यास धरण्याचा मोह होतो. आपल्याला काय पाहिजे ते आधी नीट समजाऊन घेतले पाहिजे व नंतर इच्छित वस्तू प्राप्त करून घेण्याचे धाडस आपण दाखविले पाहिजे. आपल्या राजकीय स्वातंत्र्याला व आर्थिक उन्नतीला, परंपरागत रूढ कल्पना व मागासलेले विचार यामुळें अडथळा होत असेल तर त्या गोष्टी भूतकाळाच्या उदरांत जितक्या लौकर गाडून टाकतां येतील तितके बरें व तसे केल्यावर आपण आपली दृष्टी भविष्यकाळाकडे वळविली पाहिजे.

सामाजिक मुक्तिच्या ऐतिहासिक कार्यात पुरोगामी तरूण आघाडीला असले पाहिजेत. प्रत्येक राजकीय व सामाजिक क्रांति घडून येण्यास अगोदर तत्वज्ञानविषयक वैचारिक क्रांती होत असते; व हे कार्य करण्याची सर्व जबाबदारी पुरोगामी विचाराच्या सुशिक्षित तरुणावर पडते. जोंपर्यंत प्रगमनशील सुशिक्षित तरूण, जुन्यापुराण्या धार्मिक विचार पद्धतीला चिकटून राहिले आहेत तोपर्यंत त्यांना राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक नवजीवनाचे कार्य यशस्वी रीतीनें पार पाडतां येणार नाहीं. मोडकळीस आलेल्या जुनाट समाज पद्धतीचा इमला हा खालीं ओढला पाहिजे. कुजून गेलेल्या संस्कृती व रूढीबद्दल पोकळ अभिमान बाळगल्यास मानव प्रगतीची धुरा पुढें चालविण्यास अडथळा होतो. मेलेल्या भूतकाळांतील जुन्या कल्पनांना मूठमाती देण्यास लागणारे धारिष्ट शास्त्रीय ज्ञानामुळें निर्माण होणाऱ्या बंडखोरवृत्तीमधूनच अंगी बाणते.

## क्रांतिकारक तत्त्वज्ञान

हिंदी राष्ट्रवादाच्या कमकुवतपणाचे कारण आपल्या विचारसरणींत आहे. जुन्यापुराण्या विचारांनी व प्रतिगामी तत्त्वांनी, वस्तुतः प्रगतीपर असणाऱ्या हिंदु-

स्थानच्या सामाजिक उत्क्रांतीच्या चळवळीला खीळ घातली आहे. या चळवळींत सुप्तावस्थेंत असणाऱ्या पुरोगामी शक्तींना, प्रतिगामी तत्त्वज्ञानांनीं जखडून टाकण्यांत आले आहे. हिंदुस्थानच्या प्रगतिमान चळवळीला, क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची जोड देणें आवश्यक आहे. पुरोगामी तरुणांनीं अशा तऱ्हेच्या प्रभावी-विचारसरणीचा अवलंब करुन, पुढें येणें जरुर आहे. त्या बाबतींत दुसऱ्या राष्ट्राच्या इतिहासावरुन धडे घेण्यास, आमच्या तरुणवर्गाला कोणत्याहि दृष्टीनें कमीपणा वाटण्याचे कारण नाहीं, आपल्या देशांत अद्याप होणारी क्रांती युरोपमध्यें होऊन गेली आहे. या परिवर्तनकालांत युरोपला मिळालेला अनुभव, अखिल मानवजातीची बहुमोल ठेव आहे. त्याचा फायदा आपण करुन घेतला पाहिजे. आपल्या देशाची भरभराट होऊन, प्रगतीचे उत्तुंग शिखर गांठण्याकरतां, आपल्याला बुद्धिगामी विचारसरणी व शास्त्रीयज्ञान यांची जरुरी आहे.

भविष्यकाळांत आपले पाऊल पुढें पडावे असे जर आपणांस वाटत असेल तर आपण भूतकाळाशीं फारकत केली पाहिजे. भूतकाळातील गुण आजचे दोष बनले आहेत व म्हणून त्यांची थोरवी सांगत बसून, भूतकालाचे गुणगान करीत आपण घुटमळत बसलों तर भविष्यकाळांतील विजयापासून आपण दूर, अगदीं दूर, राहूं. भविष्यकाळांत महत्त्वाची कामगिरी करतां येण्यास भूतकालीन मोठेपणाचा जितका उपयोग होईल, तितकीच, त्याची थोरवी गाणें योग्य. स्वतंत्र होऊन, सतत पुढें पाऊल टाकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांस, भूतकाळांतील बाकीची बंधनें तोडावीं लागतील. सामाजिक प्रगतीला, उपयुक्त झालेला हिंदी संस्कृतींतील प्रत्यक्ष व चांगला भाग कोणता, तो शोधून काढण्याकरतां, आपल्याला इतिहासाचे मार्मिक, विवेचक, व निर्भीड परीक्षण केले पाहिजे. चटकदार काल्पनिक गोष्टींपेक्षां सत्य निराळे आहे हे समजणें जरुर आहे.

हिंदुस्थानच्या आध्यात्मिक बुद्धिवैभवाचे तत्त्वज्ञान म्हणजे, भूतकाळांतील इतिहासावर पडदा टाकून, भविष्य काळातील आशाकिरण अंधुक व अस्पष्ट करणारे अत्यंत मोहक असे कल्पनातरंग होत, हे तत्त्वज्ञान आपण सोडून दिले पाहिजे. कांहीं झाले तरी हिंदी लोक हे मानव प्राणीच आहेत व ज्या प्रमाणें इतर देशांतील लोकांना जीवनाच्या आवश्यक गरजा मिळविण्याकरतां धडपड

करावी लागते, त्याप्रमाणें त्यांनाहि ऐहिक गरजा मिळविण्याची जरूरी पडते. ही गोष्ट मान्य करण्यांत कमीपणा नाहीं. ते कांहीं देहविहीन हुतात्मे नाहींत अगर देवही नाहींत. आध्यात्मिक तत्वज्ञानानें आपला दर्जा उच्च प्रतीचा होण्याऐवजी त्यामुळें हिंदी जनता केवळ नशिबावर सर्वस्वी अवलंबून राहूं लागली आहे. ही गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे, हिंदुस्थानचें आदिदैवत बनलेल्या ज्या आध्यात्मिक संस्कृतीला डोक्यावर घेऊन, आपण तिचा उदो उदो करतो, त्या प्रतिगामी विचारसरणीमुळेंच, आपण सामाजिक दृष्ट्या मागासलेले बनलों असून, राजकीय गुलामगिरीच्या शृंखलेनें जखडून गेलों आहोंत. देव बनण्याच्या वेड्या लालसेनें आपण माणुसकीच्या हक्कांना पारखें झालों आहोंत. आत्म्याची मुक्ती करण्याच्या छंदांत, आपण सामाजिक गुलामगिरीला कवटाळुन बसलो आहोंत. परंतु अध्यात्मिक दृष्ट्या उन्नत अवस्थेला पोंचण्यापूर्वी, मनुष्यप्राण्याला शारीरिक दृष्ट्या जिवंत राहतां आले पाहिजे. त्यामुळें आपल्या देशाची सांस्कृतिक व आध्यात्मिक उन्नती करण्याकरतां प्रथम आपले शारीरिक जीवन सुखावह करणें आवश्यक आहे. व त्या कार्याकडे आपण आतां लक्ष दिले पाहिजे. जनतेच्या ऐहिक सुखाच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट मग ती कितीहि पवित्र असो, नष्ट झालीच पाहिजे. आपली आध्यात्मिक परंपरा या मार्गांत अडथळा निर्माण करीत आहे. ती आपल्याला शरणागती शिकवीत आहे. परिस्थितीनें अधोगत बनलेल्या व खच्ची झालेल्या लोकांना, आपण प्रतिकाराचा मार्ग दाखविला पाहिजे. परंपरागत सामाजिक सत्ता व रूढी याविरुद्ध बंड करण्याची मनोवृत्ती, व जीवनाच्या असह्य परिस्थितीशीं निकराचा सामना देण्याची लढाऊ शिकवण, हिंदी जनतेला देणें अत्यंत आवश्यक आहे. व ही कामगिरी करण्याची जबाबदारी तरुणांच्यावर आहे.

## राष्ट्रीय स्वातंत्र्य.

आपला राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून चालविला पाहिजे. या करतां तरुण वर्गानें नवीन तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे. ज्यांनीं आपल्या दृष्टीसमोर प्रचलित समाज रचनेंत क्रांतिकारक फेरबदल करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, त्यांनीं माणसाला दैववादी व निष्क्रिय बनविणाऱ्या **तत्त्वज्ञानाला कायमचा निरोप** दिला पाहिजे. आपल्या

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या नेहमी आघाडीला राहणाऱ्या तरुणांत, ऐहिक व जागतीक भौतिकवादाचें तत्त्वज्ञान संचारलें पाहिजे. भौतिकवाद या शद्बानें गांगरून जाऊं नका. भौतिकवाद आज नव्यानें जन्माला आला नसून तो मानवजाती इतकाच पूर्वापार चालत आलेला व मानव जाती इतकाच जुना आहे व मानव प्राण्याच्या इच्छा, आकांक्षा, चाल-चालणूक व कृति यांना भौतिकवाद हे नांव देऊन त्याची गंभीरपणानें अर्थात मूर्खपणानें कांहीं लोकांनी नालस्ती केली, तरी या गोष्टींत मानवी जीवनाचे सार सर्वस्व सामावलेले आहे हे पक्के लक्षांत ठेवा. माणसाला जर कोणता जन्मजात हक्क असेल तर तो म्हणजे जगण्याचा अर्थात स्वाभिमानानें व माणूसकीनें जग-ण्याचा; आपल्या देशांतील अखिल जनतेच्या या जन्मसिद्ध हक्काचा अपहार करण्यांत आला आहे. मानवजातीच्या प्रगतीला अनुकूल अशा परिस्थितींत जगतां यावें—म्हणून आपल्याला जी उत्कंठा लागली आहे, ती आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याला चेतना देणारी व त्यांत ओज निर्माण करणारी आहे. आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य एवढ्यांच करतां पाहिजे कीं त्याशिवाय हिंदी जन-तेची आध्यात्मिक **उन्नति व सांस्कृतिक विकास** होण्यास अनुकूल अशी भौतिक परिस्थिती निर्माण होत नाहीं. राष्ट्रिय स्वातंत्र्य हेंच कांहीं आपलें अंतिम ध्येय नाहीं. आपल्या राष्ट्राची आर्थिक भरभराट व सांस्कृतिक प्रगति याचे ते एक साधन आहे.

मनुष्याच्या कर्तृत्वाचे तेज फांकण्यास आर्थिक जीवन सुखावह असावें लागते. केवळ खाण्यास रोटी मिळाली म्हणजे कांहीं आपल्या आयुष्याची इति-कर्तव्यता झाली असे कोणालाहि खासच वाटत नाहीं. पण उपासमारीनें तडफडणाऱ्या जीवाला, उदात्त कल्पना किंवा जिवंत विचार सुचणेंच शक्य नाहीं हे तितकेंच खरे! त्यामुळें हिंदी राष्ट्रवादाचे कर्तव्य म्हणजे गरीब जनतेची **आर्थिक परिस्थिति सुधारणें** हें होय. पण हें करण्याकरतां राजकीय सत्ता काबीज करणें जरूर आहे.

आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत क्रांतिकारक तत्वज्ञानाच्या जीवनाचा झरा निर्माण करण्याची बहुमोल कामगिरी करीत असतांना हिंदुस्थानांतील तरुणानें त्या लढ्यांत **प्रत्यक्षपणें भाग घेतला पाहिजे**. आपल्या राष्ट्राला आराम

खुर्चीवर विराम करणाऱ्या क्रान्तिकारकाची गरज नाहीं. निसर्गातील व आयुष्यातील अनेकविध महत्वाच्या प्रश्नावर प्रकाश पाडणें एवढेंच तत्वज्ञानाचे मर्यादित स्वरूपाचें कार्य नसून, उच्च दर्जाच्या मानव प्राण्यानीं गजबजलेलें **नवीन जग निर्माण करणें** हें त्याच प्रभावी तत्वज्ञानाच्या कक्षेंत येतें. क्रांतिकारक तत्त्वज्ञान योग्य रीतीनें समजल्यास जास्त महत्त्वाची कामगिरी पार पाडतां येते. पुरोगामी अगर भौतिकवादाचें तत्वज्ञान हे केवळ विचारमूलक नसते. तर ते कार्यप्रवीण असते. स्वातंत्र्याच्या चळवळीवर प्रतिगामी व पुरातन विचारसरणींची पक्कड बसली आहे असे, म्हणून आमच्या तरुणांनीं त्या चळवळीपासून अलग राहणें योग्य नाहीं.

क्रांतिकारक विचार सरणीचा फैलाव करावयाचा असेल तर राजकीय दृष्ट्या कार्यशून्य राहून भागणार नाहीं. परंपरागत धार्मिक रूढ कल्पनांच्यामुळें सामाजिक विकासाला अडथळा होऊन आपल्याला राजकीय गुलामगिरींत खितपत पडण्याची पाळी आली ही गोष्ट खरी आहे. पण आपण **राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्याखेरीज** मागासलेली आर्थिक परिस्थिती सुधारून सध्यां होत असलेली आपली सामाजिक कुचंबणा दूर होणार नाहीं. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत चेतना उत्पन्न करून नवजीवन निर्माण करण्यांकरतां क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची गरज आहे. सर्व साधारण जनतेची आध्यात्मिक उन्नति व अखिल राष्ट्राची सांस्कृतिक प्रगती होण्यास, राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवून **लोकसत्ताक राज्यपद्धति** स्थापन करणे आवश्यक आहे. आपल्या देशाच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या आघाडीचे मानाचे स्थान इतिहासानें पुरोगामी तरुणांना दिलें आहे व तरुणवर्गाच्या **स्फूर्तिजन्य प्रेरणेमुळें** हिंदी राष्ट्रवादाची सनातन विचारसरणींतून सुटका होऊन, तो राजकीयदृष्ट्या प्रखर व सामाजिकदृष्ट्या तेजस्वी व परिणामकारक बनेल.

परंतु आमच्या तरुणांनीं केवळ मोहक कल्पनांमुळें दिपून जाऊन, सत्यसृष्टी आपल्या डोळ्याआड करूं नये असा माझा त्यांना सौम्य सल्ला आहे. कोणती गोष्ट करणें आवश्यक आहे याबद्दल नुसती कळकळ बाळगून कार्य न करतां, **विद्यमान परिस्थितीचा** योग्य विचार करूनच आपल्याला कार्याची दिशा

ठरवावी लागेल. ऐतिहासिक युगांत मनुष्य इतिहास करून दाखवितो हे तर खरेंच, पण याकरितां त्याला अस्तित्वांत असणाऱ्या साधनांचाच उपयोग करावा लागतो. म्हणून क्रांतीचे वेळापत्रक बनवून हुकमी क्रांति करण्याच्या **वेडानें भारले जाऊं नका.** स्वतःला जहाल म्हणवून घेणाऱ्या कांहीं अधीर मनोवृत्तीच्या तरुणांत अशा तऱ्हेची प्रवृत्ती असल्याचे दिसून येते.

ऐतिहासिक दृष्टीनेंच आपल्या देशांत सध्यां होणाऱ्या राजकीय व सामाजिक परिवर्तनामुळें हिंदुस्थानांत समाजसत्तावादाची स्थापना होणार नाहीं. युरोपमध्यें १७ व १८व्या शतकांत समाजरचनेंत ज्या तऱ्हेचा फेरबदल झाला, तशा स्वरूपाचीं अवस्था **लोकसत्ताक क्रांतीमुळें** हिंदुस्थानांत निर्माण होईल व हा फेरबदल प्रगतीपर स्वरूपाचा आहे पुरोगामी विचारसरणीचा पुरस्कार करणारा आहे. याच स्वरूपाच्या सामाजिक परिवर्तनामुळें युरोपमध्यें सरंजामशाही उध्वस्त झाली. सरदार दरकदारांच्या कांचातून सामान्य जनता स्वतंत्र झाली; धार्मिक वर्चस्वतेचा बुरूज ढासळून पडला व तर्कप्रधान बुद्धिवादाचा उदय होऊन शास्त्रीय ज्ञानांत बहुमोल अशी भर पडली. हिंदुस्थानला अद्याप **हा टप्पा गांठावयाचा आहे.** हिंदी समाज रचनेत वरील प्रकारचे क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणें हें आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लक्ष्याचें उद्दिष्ट आहे.

सामान्य जनतेला त्यांच्या जीवनांतील अनुभवानेंच तुम्हांला ही गोष्ट पटवून देतां येईल. त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या शाळेंत क्रांतिवादाचें धडे देऊन तुम्हीं त्यांना शहाणें केलें पाहिजे. हिंदुस्थानची स्वातंत्र्योन्मुख जनता आज कॉंग्रेसच्याच पाठीमागें आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. कॉंग्रेसच्या कर्तृत्वशक्तीवर सामान्य जनतेचा पूर्ण विश्वास आहे व यातच जनतेची राजकीय जागृती समावलेली आहे. आणि राजकीय जागृती हें सामाजिक अस्वस्थतेचें प्रतीक होय.

विमोचनाच्या क्रांतिकारक लक्ष्यांत योग्य मार्ग दाखविण्याकरितां स्वातंत्र्याच्या लक्ष्यांतील तरुणांच्या आघाडीच्या तुकडीनें आपल्या सबंध सैन्याशीं निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध जोडला पाहिजे. आघाडीची फौज कितीहि शूर वीरांची असली तरी केवळ बिनीच्या स्वारांच्या मर्दुमकीवर लढाई जिंकतां येणार नाहीं. त्याकरितां सबंध लष्करी सैन्याची पद्धतशीर हाल चाल करावी

लागते. अशा तऱ्हेची अनुकूल परिस्थिती निर्माण करून जनतेशीं जास्त निकटचा संबंध जोडून स्वातंत्र्याच्या लढ्याची जोमदार संघटना करण्याकरितां **काँग्रेस हेंच एक प्रभावी साधन** आहे. त्यामुळें तरुणांचें राजकीय क्षेत्र कॉंग्रेसचें राजकारण हेंच ठरतें. जनतेच्या लढ्यांतून निर्माण झालेल्या या राजकीय संस्थेतच तरुण वर्गानें तडफेनें सामील झाले पाहिजे. या ना त्या कारणावरून काँग्रेसच्या राजकारणांपासून अलग राहून तुटकपणानें वागण्याची सवय सोडून दिली पाहिजे.

हिंदी जनतेची, आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून सुटका करण्याकरितां साम्राज्यशाहीचें वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्र झाले पाहिजे. याकरितां काँग्रेसच्या नेतृत्वाखालीं चालू असलेल्या साम्राज्यशाहीचें विरोधी लढ्यांत आमच्या तरुण वर्गानें भाग घेण्यास पुढें यावें अशी मी त्यांना विनंति करतों. काँग्रेसला विरोध करणारी अगर प्रतिस्पर्धी बनेल अशी तरुणांची स्वतंत्र संघटना करण्याच्या मी विरुद्ध आहे.

काँग्रेसच्या स्वतंत्र लढ्याला पोषक बनेल अशीच तरुणांची संघटना असली पाहिजे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेण्यास तयार होणें हेंच पुरोगामी तरुणांचे आजचे कर्तव्य आहे. देशातील सर्वांत महत्वाच्या, अखिल जनतेच्या पूर्ण पाठिंबा असणाऱ्या व साम्राज्यशाहीबरोबर निकराचा सामना करण्यास समर्थ अशा प्रभावी राजकीय संस्थेत प्रत्यक्षपणें सामील होऊनच तरुणांना वरील कार्य सुलभ रीतीनें करतां येईल.

## राजकीय सत्ता काबीज करा.

कॉंग्रेसच्या अधिकार स्वीकाराच्या निर्णयानें, जहाल तरुणांना कार्य करण्यास प्रोत्साहन मिळालें पाहिजे. जनतेच्या दैनंदिन गाऱ्हाण्यांची दाद लावण्याकरतां प्राथमिक कॉं. कमिट्यामार्फत जोरदार चळवळ उभारली पाहिजे.

अर्थात यामुळें साम्राज्यशाही सरकारकडून जनतेच्या हिताच्या कांहीं भरीव गोष्टी मिळवितां येतील असा भ्रम बाळगूं नका. परंतु त्यामुळें जनतेला

५५६९

राजकीय शिक्षण मिळेल व कॉंग्रेसला, सत्ता काबीज करणारा असा एक **जनतेचा क्रांतिकारक पक्ष** संघटित करतां येईल.

आमच्या तरुण वर्गानें या कार्याला सुरवात करावी अशी माझी त्यांना विनंती आहे. तुमच्या पुरोगामी विचारांना यामुळें प्रत्यक्ष कार्याची जोड मिळेल. शहरांतील व खड्यांतील **प्राथमिक कॉंग्रेस कमिट्या तुमचें कार्यक्षेत्र बनवा.** तुमच्या कार्यानें जनतेच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत **नवजीवन निर्माण करा.** जनतेच्या दैनंदिन जीवनाशीं समरस होत असतांना त्यांना क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचे धडे द्या. क्रांतिकारक विचार सरणीचा अवलंब केल्याखेरीज क्रांतिकारक कर्तृत्व करून दाखवितां येत नाहीं, हे त्यांच्या रोजच्या जीवनांतील प्रत्यक्ष अनुभवानें त्यांना पटवून द्या. सध्यां हेंच काम तुम्ही करायला पाहिजे.

या पद्धतीनें, धैर्यानें व निश्चयपूर्वक कामाला लागल्यास तुम्हीं लवकरच प्रजासत्ताक क्रांतीच्या घटकांना क्रांतिकारक बनवाल आणि त्यामुळेंच पुढारीपण देखील लोकमतानुवर्ती बनेल.

हिंदुस्थानांतील पुरोगामी तरुणवर्गानें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याला क्रांतिवादाचा मार्ग दाखविण्यास पुढें आलें पाहिजे. कारण या मार्गानें जनतेची संघटना केल्यास; राजकीय सत्ता काबीज करण्याचा निकराचा लढा सुरू होऊन, प्रजासत्ताक क्रांतीच्या यशाचे किरण दिसू लागतील व लोकसत्ताक राज्यपद्धतीचा उदय होऊन, आपल्या देशाच्या सामाजिक प्रगतीचा मार्ग खुला होईल.